# जागतिकीकरण आणि शिक्षणक्षेत्र

सुधीर पानसे

MR
891.46
P 1952 J

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

Entered

# जागतिकीकरण आणि शिक्षणक्षेत्र

सुधीर पानसे

लोकवाङ्मय गृह

जागतिकीकरण आणि शिक्षणक्षेत्र / सुधीर पानसे

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 1952 J
00124289

म / ८८७

© सुधीर पानसे

पहिली आवृत्ती (I) : ६ जानेवारी २००४
दुसरी आवृत्ती (I) : ऑक्टोबर २००५

मूल्य : ६० रुपये
ISBN 81-88284-30-0

MR
891.46
P1952 J

मुखपृष्ठ : शांताराम पवार

124289
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना — रघुनाथ माशेलकर | पाच |
| | लेखकाचे मनोगत | अकरा |
| १. | शिक्षणक्षेत्र आणि भारत | १ |
| २. | एक सुखद अपघात | ८ |
| ३. | एक सनातन सिद्धान्त | १४ |
| ४. | दुसरा नियम उष्मागतिशास्त्राचा | २४ |
| ५. | उच्च शिक्षणाचे अर्थकारण | ३९ |
| ६. | एक दिवास्वप्न! | ५४ |
| ७. | काय करायला हवे? | ६३ |
| ८. | उपसंहार | ७२ |

# प्रस्तावना

जागतिकीकरण, त्यामुळे होऊ घातलेले बदल, तसेच या शतकात निर्माण होत असलेली ज्ञानाधिष्ठित समाजरचना व अर्थव्यवस्था हे माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचे विषय आहेत. ते माझ्या चिंतनाचे आणि अभ्यासाचे विषयदेखील आहेत. म्हणूनच गेल्या काही वर्षांत मी केलेली भाषणे याच विषयांशी निगडित आहेत. उदाहरणार्थ, १९९९ साली 'इंडिया इंटरनॅशनल सेंटर'मध्ये केलेले 'सी. डी. देशमुख स्मृती व्याख्यान' किंवा १९९८'साली मुंबई विद्यापीठात दिलेले दीक्षांत समारोहाचे भाषण. त्यानंतरही या विषयांवर मी बोललो आहे.

या नव्या शतकाच्या समाजरचनेचा आणि अर्थव्यवस्थेचा आधार कोणता असेल? माझ्या मताने 'ज्ञान' हाच आधार असेल. 'ज्ञानाधिष्ठित समाजरचना' व 'ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था' हेच भविष्यकाळात टिकून राहण्याचे मार्ग आहेत. ज्यांना हे उमजेल व जमेल तेच समाज आणि त्याच संस्कृती भविष्यकाळात शिल्लक राहतील. बाकीच्या काळाच्या उदरात गडप होतील, याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

'ज्ञान' या संस्थेचा नेमका अर्थ व त्यामागील संकल्पनांच्या चढत्या पायऱ्या प्रथम समजून घेतल्या पाहिजेत. सर्वात प्रथम असतो 'डाटा'. कोणत्याही क्षेत्रातील एखाद्या विवक्षित विभागाशी संबंधित अशी निरीक्षणे व मोजमाप यांतून गोळा केलेली निव्वळ आकडेवारी. 'डाटा' संख्यात्मक असू शकतो किंवा गुणात्मकही असू शकतो. प्रक्रिया न केलेल्या अशा निव्वळ 'डाटा'चे महत्त्व मर्यादित असते. पण त्यावर प्रक्रिया केली की त्याचे रूपांतर बहुमूल्य अशा माहितीत (information) होते. 'डाटा'चे रूपांतर 'माहिती'मध्ये केले की त्यातून जी क्षमता प्राप्त होते ते म्हणजे 'ज्ञान' (knowledge). एखाद्या व्यवस्थेचे 'ज्ञान' प्राप्त झाले की आपल्याला तिच्या वर्तणुकीचे नियम सापडतात. त्यातून तिच्या भविष्यकाळातील स्थितीविषयी अंदाज बांधता येतात आणि त्यायोगे तिच्यावर नियंत्रण ठेवणेही शक्य होते. प्रत्यक्ष काटेकोर प्रयोग करून त्यातून मिळालेले नेमके आणि वस्तुनिष्ठ ज्ञान हेच फक्त 'ज्ञान' या संज्ञेला योग्य आहे, असे जरी विज्ञानात मानले जात असले, तरी आता हीदेखील जाणीव होऊ लागली आहे की ज्ञानाचे अन्य अनेक प्रकार आणि शाखादेखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत आणि आपल्याकडे 'डाटा', 'माहिती' व 'ज्ञान' या तिन्ही गोष्टी असल्या तरी यातली

'तुर्यावस्था' ही जी मानवाच्या जाणिवेची चौथी पायरी आहे, त्यापासून आपण दूर असू शकतो. 'तुर्यावस्था' म्हणजे सुजाणपणा किंवा शहाणपणा (wisdom).

'आत्ता' आणि 'इथे' यांच्या बंधनातून मुक्त होणे हा सुजाणपणाचा खरा अर्थ आहे. सुजाणपणाचा अर्थ हा की प्रत्येक गोष्ट स्वतंत्रपणे आणि विलगतेने न बघता तिचा विचार साकल्याने आणि सर्व गोष्टींचा संदर्भ लक्षात ठेवून बघणे. जागतिक पातळीवर 'ज्ञाना'च्या निर्मितीचा जो यज्ञ चालू आहे त्यात वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय ज्ञानाची भर घालणे आणि त्याला सुजाणपणाची जोड देऊन मानवतेच्या भल्यासाठी या ज्ञानाचा उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न करणे हेच आजच्या जागृत भारत देशासमोरचे नियत कार्य आहे असे मी मानतो.

उघड आहे की यात शिक्षणक्षेत्राचे कार्य फार मोलाचे आहे. आपला समाज नुसता 'डाटा' गोळा करणारा समाज राहणार की, त्याचे 'माहिती' आणि 'ज्ञान' यात रूपांतर करणारा समाज होणार व त्यापुढे जाऊन सुजाणपणाचे नेतृत्व जगाला देणारा आपला देश होणार की नाही, हे शिक्षणविषयक आपण कोणती धोरणे अवलंबितो यावर ठरणार आहे.

भारतीय समाज हा ज्ञानाधिष्ठित समाज व्हावा यासाठी प्रत्येक भारतीय हा ज्ञानक्षेत्रातला कर्मचारी व्हायला पाहिजे. ज्ञानक्षेत्रातला कर्मचारी या संज्ञेला विस्तृत अर्थ आहे आणि तो आपण नीट समजून घ्यायला हवा. एखाद्या खेड्यातला छोटा शेतकरीसुद्धा ज्ञानक्षेत्रातला कर्मचारी असू शकतो. जर तो ज्या जमिनीत बीज पेरतो त्या जमिनीची त्याला नीट ओळख असेल, त्यासाठी मोजक्या प्रमाणात द्यायची खते आणि जंतुनाशके यांना त्याने समजून घेतले असेल आणि अगदी नजीकच्या व किंचित लांबच्या भविष्यकाळातील हवामानासंबंधीच्या अंदाजाची माहिती त्याला त्याच्या खेड्यात मिळत असेल व त्यांचा उपयोग तो शेतीच्या संबंधातील निर्णय घेण्यासाठी करीत असेल; हे तो करीत असेल, तर तो ज्ञान सातत्याने उपयोजित करणारा ज्ञानक्षेत्रातला कर्मचारी ठरतो. मी असे ऐकले आहे की महाराष्ट्राच्या काही खेड्यांत असा एक प्रयोग करण्यात आला की जनावरांच्या वैद्यकीचे थोडेफार शास्त्रीय ज्ञान काही खेडूत स्त्रियांना देण्यात आले; ज्यातून त्यांना जनावरांची अधिक चांगली देखभाल करण्याची क्षमता प्राप्त झाली आणि त्यांच्या कुटुंबाचे राहणीमान सुधारले. या खेडूत स्त्रियादेखील ज्ञानक्षेत्रातल्या कर्मचारी झाल्या. महत्त्वाचा मुद्दा हा की ज्ञानाधिष्ठित समाजरचनेत ज्ञान ही काही थोड्या लोकांची मक्तेदारी होऊन चालणार नाही. समाजातील प्रत्येकाला ज्ञान मिळवण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे, ज्यायोगे त्याला ज्ञानक्षेत्रातला कर्मचारी म्हणून काम करता येईल आणि हे घडणार की नाही हे आपल्या शिक्षणविषयक धोरणांवरून ठरणार आहे.

माझ्या वैयक्तिक आयुष्यातील एका गोष्टीचा इथे उल्लेख करणे अनुचित ठरणार नाही, असे मला वाटते. मी अत्यंत गरीब कुटुंबात जन्माला आलो. आजच्या तुलनेत त्या काळी अत्यंत कमी असणारे शिक्षणाचे शुल्क व अन्य खर्चही मला परवडण्यासारखे नव्हते. शिष्यवृत्त्यांचा आधार होता, पण तो पुरेसा नव्हता. अनेक वेळेला अनेक सहृदय सज्जनांनी मदतीचा हात पुढे केला, म्हणूनच माझे शिक्षण पूर्ण होऊ शकले. समाजाच्या या ऋणाची जाणीव माझ्या मनात जागी असते. भविष्यकाळात अशा सहृदय सज्जनांची इच्छा असली तरी ते मदत देऊन एखाद्या गरीब विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण करू शकतील का? शिक्षणाचे शुल्क त्यांच्याही आवाक्याबाहेरचे तर असणार नाही? असा मला कधी कधी प्रश्न पडतो.

ज्ञानाधिष्ठित समाजव्यवस्थेत ज्ञानक्षेत्रातले कार्यकर्ते विविध प्रकारची कामे करीत असतील. काहीजण ज्ञान जमा करतील, काही ते सर्वार्थाने समजून घेतील आणि काहीजण ते बाकीच्यांपर्यंत पोचवतील. ज्ञान जमा करण्यासाठी ते इथे निर्माण करावे लागेल किंवा विविध करारांच्या आधाराने ते जगातील विविध भागांतून आणावे लागेल. ज्ञान नीट समजून घेण्यासाठी सार्वत्रिक शिक्षण आवश्यक असेल, त्याप्रमाणे निरंतर शिक्षणाचे महत्त्व जाणून घ्यावे लागेल. खऱ्या अर्थाने ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करायचा असेल तर मुलींना आणि मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर नवीन प्रयोगासाठीचा व ज्ञानशाखांसाठीचा मोकळेपणा नसेल तर शिक्षणातून आर्थिक उन्नतीचा मार्ग सापडणार नाही. सोविएत रशियात जवळ जवळ १०० टक्के साक्षरता होती, पण प्रयोगशीलतेला असलेल्या मर्यादांमुळे त्यांचा आर्थिक ऱ्हास झाला. ज्ञान सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी अन्य गोष्टींबरोबरच माहिती आणि संदेशवहनक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. मात्र यासाठी गरीब वर्गालाही त्याचा फायदा मिळेल याची काळजी घ्यावी लागेल.

शिक्षणक्षेत्रासंबंधी विचार करताना या सर्व गोष्टी ध्यानात ठेवणे जरुरीचे आहे. ज्ञान जमा करणे, ते नीट समजून घेणे व ते सर्वांपर्यंत पोचवणे ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया असेल व त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षित मनुष्यबळ लागेल. त्यांचा दर्जा उत्तम असावा लागेल. हे सारे शिक्षणक्षेत्रातील आपल्या धोरणांशी निगडित आहे.

मला विश्वास आहे की एकविसावे शतक हे आशिया खंडाचे शतक आहे. मला विश्वास आहे की भारताला नेतृत्व करण्याची संधी आहे. मला अशीही खात्री आहे की, भारत एक महासत्ता बनेल. याचे मुख्य कारण असेल भारताची बौद्धिक क्षमता आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या तात्त्विक भागांवर व व्यावहारिक बाबींवर असलेले त्याचे प्रभुत्व. मला खरोखर अशी खात्री वाटते की स्वत:वर स्वत:च लादलेल्या

मानसिक गुलामीतून लाखो भारतीयांची निर्मितीची ऊर्जा मोकळी होईल. भारताच्या क्षमतेबद्दल आपण बराच काळ बोलतो आहोत. भारतीयांची सुप्त असलेली निर्मितीची ऊर्जा लवकरच एका फलदायी गतिशील ऊर्जेत रूपांतरित होईल. भारतातील एकमेवाद्वितीय अशी ज्ञानाधिष्ठित समाजरचना ही भारतीय संस्कृतीवर आणि मूल्यांवर आधारलेली असेल, अशी मला खात्री वाटते.

का नाही? आपल्याला हे स्वप्न पाहण्याचा अधिकार जरूर आहे. पण ते प्रत्यक्षात आणायचे असेल तर 'ज्ञान-शिक्षण-संशोधन' यांच्या संदर्भातली धोरणे विचारपूर्वक ठरवावी लागतील.

डॉ. सुधीर पानसे यांचे प्रस्तुत पुस्तक म्हणूनच फार महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. यातील अनेक मुद्दे फार लक्षणीय आणि विचार करण्यासारखे आहेत. "प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे" असे जरी आपण म्हटले व इच्छा व पात्रता असलेल्या प्रत्येकाला उच्च शिक्षणाची संधी मिळणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा हक्क आहे, असे जरी आपण मान्य केले तरी त्यासाठी प्रथम शिक्षणक्षेत्राच्या हक्कांची प्रतिष्ठापना व्हायला हवी असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी चर्चेकरता त्यांनी काही मुद्देही प्रस्थापित केले आहेत. या गोष्टीचा विचार गंभीरपणे व्हायला हवा.

शिक्षणक्षेत्राने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे मोजमाप करायला हवे व त्यातून मिळणाऱ्या मोबदल्याचा काही अंश या क्षेत्राला मिळायला हवा, हे त्यांचे म्हणणेही लक्षणीय आहे. बौद्धिक संपदेचा अधिकार हा उभरत्या समाजरचनेतला कळीचा मुद्दा आहे. अशा वेळी याबाबतीत शिक्षणक्षेत्राने केलेले योगदान किती आहे, याचा निश्चितपणे विचार करायला हवा.

विज्ञानाचा अभ्यासक म्हणून त्यांच्या पुस्तकातील 'दुसरा नियम उष्मागतिशास्त्राचा' हे प्रकरण मला खास उल्लेखनीय वाटते. भौतिकशास्त्रातला एक नियम आणि सामाजिक गतिशास्त्र यांचा संबंध कसा लावता येतो, हे पाहण्याचा त्यांचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातून त्यांनी काढलेले काही निष्कर्षही महत्त्वाचे आहेत.

तसेच 'एक दिवास्वप्न' हे प्रकरणही लक्षणीय आहे. नव्या युगात 'सुजाणपणा'च्या ज्या क्षेत्रात भारत जगाचे नेतृत्व करू शकेल असे मला वाटते, त्याची एक छोटीशी झलक इथे पाहायला मिळते.

विचारांच्या क्षेत्रात अंतिम शब्द कधीच लिहिला जाऊ शकत नाही. त्यात मत-मतांतरे नेहमीच संभवतात. चर्चेला नवे मुद्दे पुढे येऊ शकतात. प्रस्तुत पुस्तकाच्या बाबतीतही हे खरे आहे. असे घडणे हे योग्यच आहे आणि आवश्यकदेखील आहे. पण शिक्षणक्षेत्रासारख्या महत्त्वाच्या विषयात असे चर्चेचे अनेक नवे मुद्दे या पुस्तकातून

पुढे आले आहेत हे महत्त्वाचे आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणविषयक धोरण ठरवणारी मंडळी नक्कीच त्यांची दखल घेतील असे मला वाटते.

पण डॉ. सुधीर पानसे यांचे एका गोष्टीसाठी खास अभिनंदन केले पाहिजे. त्यांचे पुस्तक हे फक्त शिक्षणतज्ज्ञांसाठी आणि शिक्षणविषयक धोरणे ठरवणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांसाठी नाही. त्यांनी या चर्चेच्या परिघात विद्यार्थ्यांना, पालकांना आणि शिक्षणक्षेत्राविषयी कळकळ असणाऱ्या अन्य सामान्य नागरिकांनाही आणले आहे. कारण हे पुस्तक त्या साऱ्यांसाठीदेखील आहे. शिक्षणक्षेत्राच्या धोरणांसंबंधी चर्चा अशा विस्तारित परिघात नेणे हे निकोप वाढीच्या दृष्टीने योग्यच आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थी, पालक आणि अन्य सर्व शिक्षणप्रेमी या पुस्तकाची दखल घेतील, तसेच याची भाषांतरे होऊन भारतातील अन्य प्रांतांच्या लोकांच्या हातीदेखील हे पुस्तक जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

— **रघुनाथ माशेलकर**

# लेखकाचे मनोगत

१९६९ साली मी एम.एस्सी. केले आणि रुपारेल महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागात प्रयोगशाळेतील डेमॉन्स्ट्रेटर म्हणून कामाला लागलो. १९७१ साली पार्ले महाविद्यालयात (आताचे साठये महाविद्यालय) व्याख्याता म्हणून रुजू झालो. तिथे अध्यापनाचे काम करीत असतानाच शिक्षणेतर उपक्रमातील आणि महाविद्यालयाच्या प्रशासनातील काही जबाबदाऱ्या पार पाडल्या. १९९७ साली मी त्यां महाविद्यालयात प्राचार्य झालो आणि त्यानंतर २००१ पासून मुंबई विद्यापीठात संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ या पदावर काम करण्याची संधी मला मिळाली. अशा प्रकारे माझ्या साऱ्या आयुष्याचा कालखंड आजपर्यंत शिक्षणक्षेत्रातच विविध स्तरांवर काम करण्यात गेला आहे.

या कालखंडात शिक्षणक्षेत्रात होत जाणाऱ्या बदलांचा परिणाम त्यामुळे मी जवळून पाहिला आहे, अनुभवला आहे. विशेषत: गेल्या काही वर्षांत जे बदल होत आहेत, ते अत्यंत अस्वस्थ करणारे आहेत. प्राचार्य म्हणून काम करीत असतानाच्या काळातच या गोष्टींमुळे मी अस्वस्थ झालो होतो. आमच्या महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकात शिक्षणक्षेत्रातील बदलांविषयी मी एक लेख त्या वेळी लिहिला होता. (जो नंतर एका वृत्तपत्राने परत प्रकाशित केला होता.).

पण विद्यापीठात आल्यावर मला या बदलांचे स्वरूप अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. त्याचबरोबर शिक्षणक्षेत्रासंबंधी धोरणे ठरवणाऱ्या व निर्णय घेणाऱ्या विविध स्तरांवरील मंडळींशी प्रत्यक्ष संबंध आला. या साऱ्यांतून प्रकर्षाने हे जाणवू लागले की जागतिकीकरणाच्या युगात आज आपल्याकडे शिक्षणाच्या क्षेत्रात प्रभुत्व गाजवणारी विचारसरणी—रुलिंग पॅराडाईम—बदलत आहे. हा बदल अनिवार्य असला, तरी तो विचारपूर्वक घडताना दिसत नाही. अनेकदा जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे ज्या संकल्पना शिक्षणक्षेत्राला लावणे चूक आहे, अशा संकल्पनादेखील जबरदस्तीने लावल्या जात आहेत. त्यातून तात्कालिकदृष्ट्या त्रासदायक आणि दूरदृष्टीने हानीकारक असे निर्णय घेतले जात आहेत.

याचबरोबर विद्यापीठाचे वाचनालय उपलब्ध झाले. त्यातून शिक्षणविषयक नवीन धोरणे व विचारसरणी यांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त अशी पुस्तके व मासिके

हाताशी आली. त्यातून या प्रश्नाच्या अनेक बाजू समजण्यासाठी फायदा झाला.

पण सर्वांत महत्त्वाची ठरली ती विद्यापीठात विविध सहकाऱ्यांशी झालेली चर्चा. यात सर्वांत उल्लेखनीय म्हणजे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर व प्रकुलगुरू डॉ. विजय खोले. म्हणजे आम्ही तिघांनी एकत्र बसून 'शिक्षणविषयक प्रभुत्व गाजवणारी विचारसरणी', 'जागतिकीकरण' अशा विषयांची चर्चा कधीच केली नसेल. विद्यापीठ चालवण्याच्या आणि सातत्याने समोर येणारे प्रश्न सोडवण्याच्या धांदलीत ते शक्यही नाही. पण अशा प्रकारे रोजचे प्रश्न सोडवण्याच्या चर्चांमधूनच मला हे शिक्षणविषयक धोरणांसंबंधीचे सूत्र सापडत गेले. त्यातून कुलगुरू हे उत्तम शिक्षणतज्ज्ञ व प्रखर सामाजिक जाणीव असणारे आहेत; तर प्रकुलगुरू हे उत्तम वैज्ञानिक व प्रचंड प्रशासकीय अनुभव असणारे. त्यामुळे या दोघांशी होत असलेल्या चर्चा मला अधिकच उपयुक्त ठरल्या.

त्याचबरोबर विद्यापीठात भेटलेल्या अन्य काही सहकाऱ्यांचा या दृष्टीने उल्लेख करावा लागेल. विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. जयंत दिघे, कला शाखेचे अधिष्ठाता डॉ. अभय पेठे, मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या प्रा. मधू परांजपे, विद्यापीठाच्या रसायन-तंत्र संस्थेचे संचालक डॉ. ज्येष्ठराज जोशी आणि मुंबई विभागाचे उच्च शिक्षणाचे सह-संचालक डॉ. अरुण सावंत या सर्वांशी वारंवार होत असलेली चर्चा अत्यंत उपयुक्त ठरली. मात्र यात व्यक्त केलेली मते ही सर्वस्वी माझी वैयक्तिक मते आहेत. विद्यापीठातील ही सर्व मंडळी या मतांशी संपूर्णपणे सहमत आहेतच असे नाही. तसेच विद्यापीठाचे धोरणात्मक आणि प्रशासनात्मक निर्णय स्वतंत्रपणे घेतले जातात. त्यांचा आणि या मतांचा सरळ संबंध जोडणे योग्य ठरणार नाही.

आणखी एक उल्लेख करावा लागेल तो अनेक वर्षांपासून माझे मित्र असलेल्या प्रा. दिगंबर पाध्ये यांचा. शिक्षणक्षेत्राशी त्यांचाही अनेक वर्षांचा संबंध आहे आणि शिक्षणविषयक धोरणांची त्यांच्याशीही मी सविस्तर चर्चा केल्या आहेत.

वरील सर्व मंडळींचे मी औपचारिकरीत्या आभार मानीत नाही. पण त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे.

आणखी एक गोष्ट. विद्यापीठातील प्रशासनात जे अनुभव आले, त्यांचा हे पुस्तक लिहिताना खूप उपयोग झाला असला, तरी त्यातील कोणत्याही गोष्टींचे तपशील यात नाहीत. एकतर तसे करणे म्हणजे औचित्यभंग ठरले असते. शिवाय पुस्तकाचा विषय प्रभुत्व गाजवणाऱ्या विचारसरणीपुरता मर्यादित असल्याने त्याची आवश्यकताही नव्हती.

मात्र एक तपशील स्पष्टपणे नोंदवावा असे मला वाटते. आज महाराष्ट्रात असलेले उच्च शिक्षणाचे संचालक आणि मुंबई विभागाचे उच्च शिक्षणाचे सह-संचालक हे

दोघेही व्यक्तिशः सामाजिक दृष्टी असलेले आणि शिक्षणक्षेत्राची जाण असलेले आहेत आणि ही गोष्ट आपल्या भाग्याची आहे. कारण प्रभुत्व गाजवू पाहणारी नवी विचारसरणी अशी आहे की, या दोन्ही गोष्टी नसलेली व्यक्ती जर उद्या अधिकाराच्या जागेवर आली तर महाराष्ट्रातल्या उच्च शिक्षणाची व्यवस्था मोडीत निघायला वेळ लागणार नाही.

या पुस्तकाला डॉ. रघुनाथ माशेलकरांसारख्या थोर शास्त्रज्ञाची आणि शिक्षणतज्ज्ञाची प्रस्तावना लाभली हे माझे भाग्य आहे. डॉ. माशेलकर हे इतके कार्यमग्न असतात की ही प्रस्तावना देण्यासाठी त्यांनी वेळ काढला कसा, हे एक आश्चर्यच आहे. पण या प्रश्नासंबंधी त्यांनाही वाटणारी कळकळ हेच त्याचे कारण आहे, अशी माझी खात्री आहे. त्यांची प्रस्तावना मिळावी यासाठी माझे स्नेही डॉ. ज्येष्ठराज जोशी यांनी खास पुढाकार घेतला, याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

पुस्तक लिहिण्याच्या काळात माझ्या पत्नीने जे सहकार्य दिले, त्याचाही खास उल्लेख करायला हवा. किंबहुना महाविद्यालयाच्या प्रांगणातून मी विद्यापीठाच्या विस्तीर्ण आवारात गेलो, त्याचा हे पुस्तक लिहिण्यासाठी खूप उपयोग झाला. त्यामागची प्रेरणा तिचीच होती.

माझे मित्र प्रकाश विश्वासराव यांनी इतक्या चटकन हे पुस्तक प्रकाशित करण्याचे मान्य केले व अत्यंत अल्पावधीत त्याची इतकी सुबक छपाई केली याबद्दल त्यांचे आणि लेखनाची मुद्रणप्रत सुबकपणे तयार करून दिल्याबद्दल श्री. प्रज्ञेश लेले यांचे व आकर्षक मुखपृष्ठ केल्याबद्दल शांताराम पवार यांचेही आभार मानणे आवश्यक आहे.

शिक्षणक्षेत्रासंबंधी जी धोरणे सध्या अवलंबण्यास सुरुवात झाली आहे, त्यातून भविष्यकाळात कोणत्या शक्यता संभवतात आणि त्यातले धोके कोणते, किंवा त्यातून कोणत्या संधी हाताशी येऊ शकतात याची चर्चा या पुस्तकात आहे. परंतु हे पुस्तक म्हणजे विद्वज्जनांसाठी आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी लिहिलेला शोधनिबंध नव्हे. शिक्षकांनी, सर्वसामान्य विद्यार्थ्यांनी, त्यांच्या पालकांनी आणि शिक्षणाविषयी आस्था बाळगणाऱ्या अन्य सर्वांनी हे पुस्तक वाचावे अशी माझी अपेक्षा आहे. कारण शिक्षणविषयक धोरणे जरी तज्ज्ञ मंडळी आणि शासनातील मंडळी ठरवीत असली, तरी त्याचे परिणाम आपल्या मुलांच्या जीवनावर होत असतात. हे परिणाम ताबडतोब जाणवतात असे नाही; पण हे परिणाम दूरगामी असतात. म्हणून त्याबाबतची जाणीव विस्तृत वर्तुळात व्हायला हवी.

'आजचे शाळा-महाविद्यालयांमधले शिक्षण ही मध्यमवर्गाची आणि श्रीमंतांची चैन आहे. या देशात सर्वदूर पसरलेल्या बहुसंख्य दरिद्री, आदिवासी, मागासलेल्या

लोकांच्या जीवनाशी या शिक्षणाचा काय संबंध आहे? त्यांचे प्रश्न वेगळे आहेत आणि हे मध्यमवर्गीयांचे औपचारिक शिक्षण त्यासाठी काय करणार?' असा एक मुद्दा काही विचारवंत मंडळी मांडीत असतात.

पण मला असे वाटते की, यासंदर्भात थोडा वेगळा विचार करायला हवा. दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या असंख्य लोकांच्या जीवनाचा स्तर उंचावणे हाच भारताच्या समोरील एक-कलमी कार्यक्रम असायला हवा. यासाठी शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार आणि गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या संधी या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शिक्षणाचा प्रसार आणि उंचावलेला दर्जा यातून इथला दारिद्र्याचा प्रश्न आपोआप सुटणार नाही. पण त्यांच्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही, हे नक्की. गणिती भाषेत सांगायचे तर शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे आणि उच्च शिक्षणाच्या न्याय्य आणि पुरेशा संधी उपलब्ध असणे या दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक अटी आहेत, पण त्या पुरेशा नव्हेत. (Necessary but not sufficient conditions.). म्हणूनच आपल्या मुलाबाळांच्या वैयक्तिक आयुष्यातील भविष्यासाठी आणि आपल्या देशासमोरील सर्वांत महत्त्वाचा असलेला दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्यातला अनिवार्य घटक म्हणून शिक्षणक्षेत्रातील धोरणांविषयी सर्वांनी जागरूक असणे आवश्यक आहे.

वाचक त्या दृष्टीने या पुस्तकाचे स्वागत करतील अशी मला आशा आहे.

**— सुधीर पानसे**

# शिक्षणक्षेत्र आणि भारत

जमाना जागतिकीकरणाचा आहे; ग्लोबलायझेशनचा आहे. किंवा जमाना बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेचा आहे. साध्या शब्दांत सांगायचे तर जमाना स्पर्धेचा आहे; जीवघेण्या स्पर्धेचा आहे. प्रगतीसाठी स्पर्धा आहेच. पुढे जाण्यासाठीही स्पर्धा आहेच. पण नुसतं जगण्यासाठीही स्पर्धा आहे, टिकून राहण्यासाठीही स्पर्धा आहे. या स्पर्धेत जो हरला, तो नुसता मागे पडला असे नव्हे, तर तो संपला! मग तो देश असो, समाज असो अथवा व्यक्ती असो.

काळाच्या ओघात संस्कृतीच्या विकासाबरोबर मानवाने विकसित केलेले सूत्र होते 'जगा आणि जगू द्या!' आज ते लयाला गेले आहे. आजच्या जमान्याचे सूत्र आहे 'जीवो जीवस्य जीवनम्!' प्रतिस्पर्ध्याला खलास करा, त्याला स्पर्धेतून दूर करा आणि तुम्ही स्पर्धा जिंका.

हा तर आहे जंगलचा कायदा. तो माणसांच्या जगात आज प्रतिष्ठित पावला आहे. तो आजचा मान्यता पावलेला विचार आहे. तो रुलिंग पॅराडाईम आहे. एका अर्थाने मानवाच्या वाटचालीतील एक चक्र पूर्ण झाले आहे. जंगलातून हिंडणाऱ्या भटक्या टोळ्यांच्या मानवाने सुरुवात केली याच जंगलच्या कायद्यापासून. आज प्रचंड भौतिक आणि तांत्रिक प्रगती केल्यानंतर टी.व्ही.समोर बसणारा, मोबाईल घेऊन हिंडणारा, संगणकाला आज्ञा देणारा माणूस, एकविसाव्या शतकातला माणूस परत एकदा त्या जंगली माणसाच्या मानसिकतेत आहे.

म्हणूनच परत एकदा त्याला टोळ्यांचा आश्रय घ्यावासा वाटतो आहे. विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या अद्भुत शक्तींची कल्पना करून त्यांना शरण जावेसे वाटते आहे. त्याची मानसिकता झपाट्याने रानटी टोळ्यांमधल्या माणसाची मानसिकता बनते आहे. धर्म-पंथ, जात-जमात यांच्या आधाराने माणसे आपल्या देशात आणि साऱ्या जगात संघटित होऊ पाहत आहेत. अधिकाधिक कडवी होत आहेत. त्याचा उगम या मानसिकतेत आहे. देवा-धर्माकडे माणसांच्या जमावांचा ओढा वाढतो आहे आणि जगभर **अंधश्रद्धां**चा प्रभाव वाढतो आहे. या गोष्टींचा उगम याच मानसिकतेत आहे.

**थोडक्यात आणि** नेमक्या शब्दांत सांगायचे तर जमाना जंगलच्या कायद्याचा आहे. अशा जमान्यात आपल्याला एक समाज म्हणून टिकून राहायचे आहे. जगण्यात

यशस्वी व्हायचे आहे. जंगलचा कायदा जाऊन परत मानवी संस्कृतीकडे नेणारे वातावरण निर्माण व्हावे अशी समजा आपली कितीही तीव्र इच्छा असली तरी ते पुरेसे नाही. यासाठी या जागतिकीकरणाच्या वावटळीला विरोध करण्याची आपली तीव्र तळमळ असली तरी ते पुरेसे नाही. कारण या जीवघेण्या स्पर्धेच्या आणि 'जीवो जीवस्य जीवनम्' हा मंत्र जपणाऱ्या जमान्यामध्ये त्यासाठी प्रथम आपल्याला टिकून राहायला हवे. इतकेच नव्हे तर समर्थ व्हायला हवे. यशस्वी व्हायला हवे. त्यासाठी या जंगलच्या कायद्याचे नियम समजून घ्यायला हवेत.

कसे आहेत हे नियम? फार गुंतागुंतीचे मुळीच नाहीत. अगदी साधे आणि सरळ आहेत. फक्त ते समजून घेतले पाहिजेत.

लहानपणी वाचलेली ससा आणि सिंह यांची एक गोष्ट आठवते. तुम्हालाही कदाचित आठवत असेल. एका जंगलात एक सिंह उन्मत्त झाला. जनावरांना मारू लागला. सारी जनावरे भयभीत झाली. त्यांनी सभा घेतली. तेव्हा वाघ म्हणाला, 'मी करतो सिंहाचा बंदोबस्त. सिंह शूर आहे. उत्तम शिकार करतो. ते तर मलाही जमते. त्या क्षेत्रात मी अधिक प्रावीण्य मिळवतो आणि मग सिंहाचा बंदोबस्त करतो.'

सिंहाचा बंदोबस्त करायला वाघ गेला तो परत आलाच नाही.

मग कोल्हा गेला, अस्वल गेले आणि कोण कोण गेले.

कोणीही परत आले नाहीत.

शेवटी एक ससा म्हणाला, 'मी सिंहाचा बंदोबस्त करतो!'

सारे प्राणी हसले. म्हणाले, 'सिंहाची ताकद तुझ्याकडे आहे काय?'

ससा म्हणाला, 'नाही, पण माझ्याकडे माझी ताकद आहे. माझी बुद्धी आहे आणि माझा चेहरा अगदी निरागस आहे. तीच माझी ताकद आहे.' ससा सिंहाकडे गेला आणि म्हणाला, 'महाराज आपण एवढे सामर्थ्यवान आणि शूर, आपण जंगलचे राजे. पण मला आपली काळजी पडली आहे. कारण आपल्यापेक्षाही शूर आणि सामर्थ्यवान सिंह जंगलात आला आहे. तो भयंकर उन्मत्त झाला आहे. त्याचा बंदोबस्त केला नाहीत तर आपल्या स्थानाला आणि जीवाला धोका आहे.' सिंह चिडला. सशाबरोबर निघाला. सशाने त्याला एका विहिरीच्या काठाशी उभे करून आत डोकावायला सांगितले. सिंहाला दिसले आपलेच प्रतिबिंब! त्याने डरकाळी फोडली. आतून प्रतिध्वनी आला. सिंह खवळला. त्याला वाटले हा विहिरीतला सिंह आपल्याला आव्हान देतो आहे. त्याने विहिरीत उडी मारली आणि सिंह संपला. एका सशाने सिंहाला हरवले. संपवले.

तात्पर्य काय? जंगलच्या कायद्यात यशस्वी व्हायचे तर प्रतिस्पर्ध्याच्या बलस्थानाची नक्कल करून भागत नाही. ती माहीत करून घ्यायला हवीत. तशीच त्याच्या कमजोरीची स्थाने अभ्यासायला हवीत. पण त्याचबरोबर नेमकी हेरली पाहिजेत

आपली बलस्थाने. आपले सामर्थ्य कशात आहे ते ओळखले पाहिजे आणि ते वाढवले पाहिजे. जंगलात लहान कीटकांपासून महाकाय प्रचंड प्राणी राहतात. पण कोणीही दुसऱ्याच्या बलस्थानाची नक्कल करीत नाही. प्रत्येकाला आपआपले बलस्थान माहीत असते आणि त्याचा वापर करून प्रत्येक प्राणिजमात आपले अस्तित्व टिकवते, वाढवते.

हे खरे आहे की प्रत्यक्ष जंगलात काही जाणीवपूर्वक विचार करून, अभ्यास करून कोणतीही प्राणिजमात ही स्ट्रॅटेजी अवलंबीत नाही. ही जाणीव त्यांना उपजत असते. किंबहुना ज्यांना ही जाणीव उपजत असते तेवढ्याच प्राण्यांच्या जमाती टिकून राहतात. बाकीच्या उत्क्रांतीच्या लोंढ्यात बुडून नष्ट होतात.

पण माणसांच्या जगात तेव्हा जंगलचा कायदा सुप्रतिष्ठित होऊ लागतो, तेव्हा मात्र ही गोष्ट जाणीवपूर्वक करावी लागते. हे ज्याला समजले आणि जमले तो समाज या माणसांच्या जंगलात यशस्वी होणार. अन्यथा नष्टप्राय होणार. जागतिकीकरणाच्या फोर्सेसचा वाईट भाग हा आहे की त्यापासून दूर राहता येणार नाही. कोणाची इच्छा असो वा नसो हा लोंढा प्रत्येक समाजाला आपल्या कवेत घेणार. त्याला विरोध करायचा तर त्यासाठी सबळ व्हावे लागणार. त्यामुळे सर्वात पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक समाजाला आपली बलस्थाने ओळखावी लागणार व ती जोपासावी लागणार. त्यांचे संवर्धन करावे लागणार.

भारताच्या बाबतीत काय म्हणता येईल? भारताचे बलस्थान कोणते? या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात भारतीय समाजाला तारून नेणारी शक्ती कोणती?

या प्रश्नाचे उत्तर खरे तर सोपे आहे. पण तरीही ते चटकन आपल्याला देता येईलच असे नाही. याचे कारण आत्मविश्लेषण करताना कमजोरीच्या स्थानांवर भर देण्याचाच आम्हा लोकांचा प्रघात आहे. आत्मटीकेची आम्हाला जणू हौस आहे. आपल्याकडे काय नाही, याची यादी आपल्या चटकन आठवते. आपला देश मागे का पडतो याची कारणे आपण सहजपणे सांगू शकतो. 'आमची लोकसंख्या प्रचंड वाढली आहे', 'आमच्याकडे लोकांना कामाची शिस्त नाही, वर्क कल्चर नाही', 'भ्रष्टाचाराने सारा समाज पोखरला आहे' अशा गोष्टी सर्वमान्य आहेत. म्हणजे त्या खोट्या नाहीत. पण एवढ्याच गोष्टी आहेत का? जिथे आपण निर्विवादपणे आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे, जगाच्या पातळीवर सिद्ध केली आहे अशी कोणती गोष्ट आपल्याकडे आहे? असे कोणते क्षेत्र आहे? या प्रश्नाचे उत्तर फार मोलाचे आहे. कारण ते क्षेत्र हे आपले बलस्थान आहे. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी ती आपली गुरुकिल्ली आहे.

आणि थोडा विचार केला तरी लक्षात येईल की ते क्षेत्र आहे शिक्षणक्षेत्र! आज भारताची ओळख जगात कशामुळे आहे? इथले कोणते प्रॉडक्ट जगाला माहीत आहे?

ते आहेत इथले शिकलेले, उच्च विद्याविभूषित तरुण! 'मेड इन इंडिया'चा शिक्का असलेल्या अन्य कोणत्याही गोष्टींनी जागतिक बाजरपेठेवर आपला ठसा उमटवला नाही. पण आमच्याकडचे इंजिनियर्स, डॉक्टर्स, संशोधक, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातले तज्ज्ञ, संगणकक्षेत्रातले तज्ज्ञ यांच्यामुळे आधुनिक भारताची ओळख जगाला आहे. अन्य कोणत्याही प्रकारचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी आपले 'ब्रँड-नेम'. जगाच्या बाजारपेठेत प्रतिष्ठित केले नाही. पण आय.आय.टी. हे ब्रँड-नेम झाले आहे. 'आय.आय.टी.' प्रॉडक्ट्सना प्रचंड मागणी आहे आणि फक्त 'आय.आय.टी.'च नव्हे, दरवर्षी इथून हजारो उच्च शिक्षित तरुण परदेशात जातात. काहीजण तर छोट्या-मोठ्या शिक्षणसंस्थांतून शिकून आलेले असतात. लहान खेड्यातल्या शाळांतून शिकलेले, एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणच्या महाविद्यालयात शिकलेले असे अनेकजण असतात. त्यांची महाविद्यालये म्हणजे 'ब्रँड-नेम' नसतात. त्यांची विद्यापीठेही ख्यातनाम नसतात. तरीही असे हे तरुण परदेशात जातात. अगदी अमेरिकेसारख्या प्रगत आणि प्रचंड स्पर्धा असलेल्या समाजात जातात आणि निरपवादपणे सारे यशस्वी होतात! हे सातत्याने घडते आहे. वर्षानुवर्षे घडते आहे.

याचे श्रेय त्या तरुणांना आहेच. त्यांच्या बुद्धिमत्तेला, श्रम करण्याच्या तयारीला आहेच. पण एवढेच खरे आहे का? एक गोष्ट अगदी स्वच्छ आहे. जेव्हा हजारो तरुणांना, वर्षानुवर्षे निरपवादपणे असे यश मिळते आहे तेव्हा त्या व्यक्तींकडे असलेल्या गुणांपलीकडे याचे कारण दडलेले असले पाहिजे. याचे कारण आपल्या शिक्षणव्यवस्थेतच असले पाहिजे. हे सामर्थ्य, हे यश आपल्या शिक्षणक्षेत्राचे आहे असा निष्कर्ष काढणे तार्किकदृष्ट्या अनिवार्य आहे.

'एक्स्पोर्ट-क्वालिटी'चे उत्पादन बनविणे हा गुणवत्तेचा एक महत्त्वाचा निकष आहे. आपल्या शिक्षणक्षेत्राने वर्षानुवर्षे असे 'एक्स्पोर्ट-क्वालिटी'चे उत्पादन बनविले आहे. त्याची दखल घ्यायला नको का?

अशा प्रकारे उच्च शिक्षित तरुण परदेशात जातात. 'ब्रेन-ड्रेन' होतो. ही गोष्ट योग्य का अयोग्य हा एक चर्चेचा वेगळा मुद्दा आहे. फक्त परदेशात जाणाऱ्या तरुणांकडे कर्तृत्व असते; की त्याच शिक्षणव्यवस्थेतून बाहेर पडलेल्या आणि इथेच राहणाऱ्या तरुणांकडेही तेवढेच कर्तृत्व असते, पण त्याच्या आधाराने यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती आपल्या समाजात नसल्यामुळे ते तितके यशस्वी होऊ शकत नाहीत, हादेखील या संदर्भात एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. परंतु या संदर्भात हे जे काही गुण-दोष असतील, अधिक-उणे असेल त्याचा संबंध समाजातील अन्य क्षेत्रांशी आहे. शिक्षणक्षेत्रातील उत्पादनाची गुणवत्ता जगाच्या बाजारपेठेत कसाला उतरवण्याइतकी उत्तम आहे, हे सत्य त्यामुळे बदलत नाही. म्हणून शिक्षणक्षेत्र हे

भारताचे बलस्थान आहे हे मान्य करायला हवे.

या निष्कर्षाचा उपसिद्धान्त असा की, शिक्षणक्षेत्राचे हे यश हे त्यातील साऱ्या घटकांचे आहे. आणि शिक्षणक्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक! तेव्हा या यशातले त्यांचे योगदान मोलाचे आहे, हे मान्य करावेच लागेल. आधी म्हटल्याप्रमाणे आपल्या समाजाला आत्मटीकेची जणू एवढी हौस आहे की एखाद्या क्षेत्रात आपण सातत्याने यशस्वी झालो आहोत हे मान्य करणे अवघड आहे. त्या क्षेत्रातील बलस्थान आपल्याकडे आहे हे मान्य करणे आपल्याला सोपे असणार नाही आणि अशा यशाचे श्रेय समाजातील कोणत्या एका घटकाला देणे हे तर फारच अवघड आहे.

शिक्षकांबद्दल बोलताना आपण 'ते कशा पाट्या टाकतात', 'पैशाच्या मागे लागले आहेत', 'ते काम टाळण्याचा प्रयत्न करतात', 'त्यांना अधिकाधिक सुट्या कशा हव्या असतात' वगैरे अनेक गोष्टींवर आपली मते व्यक्त करतो. हे आपल्याकडे सतत घडत असते. शिक्षकांबद्दलच नव्हे, बहुतेक सर्वच समाजातील घटकांबद्दल.

बहुतांश शिक्षक कामचुकार, पाट्या टाकणारे व निव्वळ पैशाच्या मागे धावणारे असतील, तर त्या शिक्षणव्यवस्थेतून वर्षानुवर्षे इतके गुणवान आणि जगाच्या बाजारपेठेत यशस्वी होणारे विद्यार्थी कसे तयार होतात? या प्रश्नाचे तार्किक सुसंगती असलेले उत्तर देणे अवघड आहे.

हा प्रश्न कोणत्या एका घटकाचे गुणगान करण्याचा नाही. कोणाची आरती करण्याचा तर नाहीच नाही.

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वर:'

अशी शिक्षकदिनाला शिक्षकांच्या कौतुकाची भाषणे केली जातात. तसाही हा प्रकार नाही. अत्यंत शांतपणे विचार करून, परिस्थितीचे विश्लेषण करून आपण काही निष्कर्ष काढतो आहोत; कारण जंगलचा कायदा मानणाऱ्या या जगात ते अतिशय आवश्यक आहे आणि निष्कर्ष हा आहे की जीवघेण्या स्पर्धेच्या युगात भारतीय समाजाचे बलस्थान आहे शिक्षणक्षेत्र आणि त्याचे श्रेय आहे या क्षेत्रातील सर्व घटकांना — विशेषत: शिक्षकांना.

एखाद्या समाजाचे बलस्थान काही आपोआप निर्माण होत नाही. पोकळीतून पडत नाही. त्या समाजाच्या जडणघडणीत त्याची मुळे असतात. इतिहासात घडलेल्या घटनांमधून वर्तमानातील ही वस्तुस्थिती निर्माण झालेली असते. आपल्या समाजाच्या बाबतीतदेखील हे खरे आहे. शिक्षणाचे महत्त्व आपल्या समाजात अगदी मूळापासून आणि पूर्वापार आहे. त्यातूनच हे बलस्थान आज निर्माण झाले आहे.

जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था हा आपल्या समाजव्यवस्थेचा कलंक. त्यातील

उच्च-नीच भावना हे आपल्या इतिहासातले एक लांछन आहे. या जातिव्यवस्थेच्या उतरंडीत ब्राह्मणांना उच्च स्थान होते. हे स्थान त्यांना कसे लाभले? त्यांनी ते कसे टिकवले?

शिक्षणाच्या आणि ज्ञानाच्या आधारावर! त्या काळातील म्हणून जे काही ज्ञान होते त्याची मक्तेदारी ब्राह्मणवर्गाकडे होती. अन्य वर्णांना त्यांनी यापासून दूर ठेवले. शूद्रांना तर ज्ञान प्राप्त करण्याचा बिलकूल अधिकार ठेवला नाही. ज्ञानाच्या आणि शिक्षणाच्या या मक्तेदारीच्या आधारावर त्यांनी हे वर्चस्व शतकानुशतके टिकवून ठेवले. खरे तर ब्राह्मणवर्ग हा समाजातील धनवान वर्ग नव्हे. व्यापार-उदीम करणारा वर्ग नव्हे. हातात शस्त्र घेऊन रणांगण गाजवणारा वर्ग नव्हे. राजकीय सत्ता हातात असणारा वर्ग नव्हे. त्यामुळे सत्ता अथवा संपत्ती यांच्या आधाराने नव्हे, तर ज्ञान आणि शिक्षण यांतील मक्तेदारीच्या आधाराने ब्राह्मणांनी आपले वर्चस्व टिकवले. ही गोष्ट जगाच्या इतिहासात अन्य कोणत्याही समाजात घडलेली नाही. यातील मक्तेदारीचा भाग निश्चितच निषेधार्ह. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की केवळ ज्ञानाच्या आणि शिक्षणाच्या आधारावर निर्माण झालेले हे वर्चस्व बाकीच्या समाजाने मुकाटपणे स्वीकारले. पिढ्यान्‌पिढ्या स्वीकारले.

या समाजाची मानसिकता शिक्षणाला खूप महत्त्व देण्याची, किंमत देण्याची आहे. म्हणूनच ब्रिटिशपूर्व काळात या वर्णव्यवस्थेला आव्हान देण्याचे सारे प्रयत्न हे शिक्षणाशी निगडित आहेत. अगदी इतिहासकाळात भगवान बुद्धाने या व्यवस्थेला आव्हान उभे केले, ते कसे? तथागताची शिकवण समाजाला देण्यासाठी व समाजाला सुशिक्षित करण्यासाठी त्याचे शिष्य — बौद्ध भिक्खू — समाजात फिरू लागले. काही तर परदेशातही गेले. त्यांच्याकडे तलवार नव्हती, तागडी नव्हती. त्यांच्याकडे भगवान बुद्धाची शिकवण होती.

संतांनी पुढे जेव्हा जातिव्यवस्थेविरुद्ध बंड उभारले तेव्हा हेच केले. 'फोडिले हे भांडार ज्ञानाचे' ही त्यांची भूमिका होती. वेदांमध्ये बंदिस्त झालेले ज्ञान, गीतेमध्ये असलेले ज्ञान जनसामान्यांपर्यंत घेऊन जाणे हाच त्यांच्या बंडखोरीचा मार्ग होता. शिक्षणाच्या आधारे, ग्रंथनिर्मितीच्या आधारे, अभंग आणि काव्य यांच्या आधारे बंड करण्याचा इतिहास असलेला आपला देश हा जगातला एकमेव देश असेल!

ब्रिटिशांच्या आगमनानंतर इथल्या समाजाला एक प्रचंड धक्का बसला. ब्रिटिश व्यापारी म्हणून आले. मग त्यांनी लढाया लढल्या. अखेरीस सत्ता काबीज केली. पण आपल्या समाजाला महत्त्वाचे वाटले, ते त्यांच्याकडे असलेले आधुनिक ज्ञान, त्यांचे शिक्षण याच गोष्टींचे. ब्रिटिशांच्या जमान्याच्या सुरुवातीच्या काळात इथल्या विचारवंतांनी चर्चा केली ती भारतात कोणती शिक्षणव्यवस्था हवी याची. राजा

राममोहन रॉय यांच्यासारख्या विचारवंतांनी आधुनिक शिक्षणव्यवस्था हवी अशी मागणी केली. त्यानंतर स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या समाजाचे सारे नेतृत्व या आधुनिक शिक्षणातून सुशिक्षित झालेल्या लोकांच्या हाती होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानड्यांपासून, गोपाळ कृष्ण गोखल्यांपासून, लोकमान्य टिळकांपासून ते बॅरिस्टर असलेल्या आंबेडकरांपर्यंत किंवा महात्मा गांधींपर्यंत आणि पंडित नेहरूंपर्यंत सारे नेते उच्च विद्याविभूषित होते. किंबहुना त्यांचे शिक्षण हेच त्यांचे सामर्थ्य होते.

पुरातनकाळात शिक्षणाची आणि ज्ञानाची मक्तेदारी होती. त्यामुळे बहुजन समाजाला सत्ता आणि संपत्तीपासून वंचित व्हावे लागले. शतकानुशतके दारिद्र्याचे आणि उपेक्षेचे जिणे जगावे लागले. हे ओळखून १९व्या शतकात बहुजनांच्या नेत्यांनी आपल्या अनुयायांना संदेश दिला तो शिक्षणाचा! नव्या शिक्षणव्यवस्थेपासून आपला समाज वंचित राहू नये आणि जुनी मक्तेदारीची व्यवस्था परत येऊ नये, याची त्यांनी काळजी घेतली. महात्मा जोतीबा फुल्यांनी शिक्षणाचा संदेश दिला.

*'एका अविद्येने सारा घात केला!'*

हा त्यांचा समाजाला इशारा होता. बाबासाहेब आंबेडकरांनी तर दलितांसाठी क्रांतीचे आणि विद्रोहाचे रणशिंग फुंकले. पण त्यांचा दलितांना पहिला संदेश होता, 'शिका'! शिक्षणाचे महत्त्व हे आपल्या समाजात असे खोलवर रुजलेले आहे. पिढ्यान्‌पिढ्यांच्या संस्कारातून ते आपल्या मानसिकतेचा भाग झाले आहे.

आजदेखील काय घडते आहे?

जागतिकीकरणाच्या आणि बाजारपेठेच्या अर्थकारणाच्या लोंढ्यात आपण सापडलो आहोत. त्या नव्या व्यवस्थेचे नेमके नियम समजून न घेता आणि शांत डोक्याने विचार करून ते अमलात न आणता आंधळेपणाने या प्रवाहात पोहतो आहोत; कधी गटांगळ्या खातो आहोत. त्यातून अनेक विकृती निर्माण होत आहेत. पण त्यातली एक विकृती लक्षात घेण्याजोगी आहे. आज प्रत्येक राजकीय नेता 'शिक्षणसम्राट' बनू पाहतो आहे! प्रत्येकाला आपल्या अधिकारात एक तरी शाळा हवी; महाविद्यालय हवे. या विकृतीतूनही एक गोष्ट परत अधोरेखित होते. सत्ता, प्रतिष्ठा (आणि आता पैसाही) यांचा मार्ग आजही शिक्षणक्षेत्रातून जातो आहे.

तात्पर्य, शिक्षणक्षेत्र हेच आपले बलस्थान आहे. आपल्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशातून ते निर्माण झाले आहे आणि जागतिकीकरणाच्या जमान्यात, जंगलचा कायदा मानणाऱ्या आजच्या जगात आपले हे बलस्थान ओळखणे अत्यंत जरुरीचे आहे.

ඞ

# एक सुखद अपघात

तीव्र स्पर्धेच्या क्षेत्रात अपघाताने यश मिळण्याला जागा नसते. तिथे अपघात घडले तर ते दु:खद असतात; तापदायक असतात. अपघातांमुळे यश अधिक कठीण होते. प्रयत्नांचे प्रमाण वाढवावे लागते. यश प्राप्त करण्याचा काळ दूर जातो. याचे कारण सारेच प्रतिस्पर्धी प्रत्येक संधी साधण्यासाठी सजग असतात. तुमच्या प्रत्येक चुकीचा फायदा घेण्यासाठी टपलेले असतात. पण क्वचित कधीतरी अशा क्षेत्रातही सुखद अपघात घडतात. सुदैवाने असा एक अपघात आपल्या वाट्याला आला. त्याचे महत्त्व आपण जाणले तरी तो अपघात होता हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे आणि वारंवार असे सुखद अपघात घडणार नाहीत हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे.

हा सुखद अपघात म्हणजे संगणक आणि माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रात आपल्या देशाला मिळालेले लक्षणीय यश. संगणकाच्या युगाची सुरुवात होत होती त्या काळात आणि त्याच्या आधीच्या लगतच्या काळात इलेक्ट्रॉनिक्सचे युग होते. ट्रान्झिस्टर्स, त्यानंतर इंटिग्रेटेड सर्किट्स अशा गोष्टींचे शोध लागत होते. नवी नवी इलेक्ट्रॉनिक्सची साधने निर्माण होत होती. बाजारपेठ व्यापून टाकीत होती. आकाराने लहान लहान होत होती. इलेक्ट्रॉनिक्सचे चमत्कार ग्राहकांना आश्चर्यचकित करीत होते.

त्या वेळी इलेक्ट्रॉनिक्सच्या युगावर जपानचे अधिराज्य होते. अमेरिका आणि पाश्चात्त्य देश हे अर्थात तेव्हाही आघाडीवर होते. तसे ते आजही आहेत. त्यांची गोष्ट वेगळी आहे. बाजारपेठ इलेक्ट्रॉनिक्सची असो, की संगणकाची, किंवा जेनेटिक इंजिनियरिंगची. अमेरिका आणि पाश्चात्त्य देश हे अर्थात आपली आघाडी टिकवून आहेत आणि जोवर हा बाजारपेठेच्या अर्थकारणाचा आणि जीवघेण्या स्पर्धेचा जमाना अस्तित्वात आहे, तोवर ते आपली आघाडी टिकवून ठेवणार. कारण या जंगलच्या कायद्याचे मूलभूत नियम त्यांनी नीट आत्मसात केले आहेत. आता तर खेळाचे नियम तेच बनवीत आहेत.

संगणकाच्या युगाची तेव्हा सुरुवात होत होती. १९७०च्या दशकात संगणकाचा प्रवेश भारतात जाणवण्यासारखा सुरू झाला. तोपर्यंत संगणकाचा वापर अत्यंत आधुनिक प्रयोगशाळा किंवा आय.आय.टी.सारख्या संस्था वगैरे ठिकाणांपुरताच मर्यादित होता. त्या पलीकडे त्यांचे अस्तित्व नव्हते. पण सत्तरच्या दशकात संगणकाने

ही पायरी ओलांडली. संगणकाचा कार्यालयातील कामांसाठी, बँकेतील कामकाजासाठी वापर करण्याची कल्पना त्या वेळी मांडली जाऊ लागली. १९८०चे दशक उजाडेपर्यंत संगणक काही निवडक ठिकाणी व्यवहारात दिसूही लागला होता.

या सर्व काळात संगणकासंबंधी आपली भूमिका कोणती होती? संगणकाच्या रूपाने एक नवी संधी आपल्या समाजाला उपलब्ध होते आहे याची आपल्याला जाणीव होती काय? बिलकूल नाही. संगणकामुळे बेकारी वाढेल अशी भीती वाटणारा आणि त्यामुळे त्याच्याबद्दल साशंक असणारा एक मोठा वर्ग समाजात होता. (आता मागे वळून त्याबद्दल त्या वर्गाला दोष देण्यात अर्थ नाही. कारण संगणक कार्यालयात आले की त्याचा ताबडतोबीचा परिणाम तसाच होणार होता.)

शाळा-महाविद्यालये यांच्या शिक्षणात संगणकाच्या शिक्षणाला फारसे स्थान नव्हते. संगणकाचे सुरुवातीचे शिक्षण इथल्या काही शहरांमध्ये सुरू झाले ते क्लासेसच्या माध्यमातून! परंतु याच सुमाराला अमेरिका-युरोपमध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला होता. त्यासाठी संगणक हाताळू शकणाऱ्या, त्याची आज्ञावली लिहू शकणाऱ्या तंत्रज्ञांची गरज वाढू लागली होती. आणि त्यात भारतीय तरुणांना वाव मिळू लागला होता. संगणकाच्या क्षेत्रात काही नोकऱ्या आपल्या तरुणांना मिळू शकतील एवढेच त्या वेळी जाणवू लागले.

१९८०च्या दशकाच्या मध्यास राजीव गांधी यांनी संगणकाचा वापर आणि त्यासंबंधीचे शिक्षण यांना जोमाने प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले. त्या वेळेस त्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची 'कॉम्प्युटर बॉईज' अशी काहीशा हेटाळणीने जरी संभावना केली गेली, तरी हे धोरण मात्र नेटाने राबवले गेले. तसेच त्यानंतरच्या राजकीय उलथापालथींमध्ये हे धोरण कायम ठेवले गेले. दरम्यान संगणकाच्या किमतीही खाली आल्यामुळे त्यांचा प्रसार होत गेला व संगणक-प्रशिक्षणाला त्याचा हातभार लागला. १९९०च्या दशकात भारतीयांनी नि:संकोचपणे संगणकाचा आणि संगणक-प्रशिक्षणाचा स्वीकार केला. अमेरिकेत जाणाऱ्या संगणक-प्रशिक्षित तरुणांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आणि एकविसावे शतक उजाडण्याच्या सुमाराला 'भारत हा संगणकाच्या क्षेत्रात अग्रभागी आहे. या क्षेत्रातील जागतिक महासत्ता आहे' असे बिल गेट्स यांच्यासारखे या क्षेत्रातील दिग्गजही म्हणू लागले.

अगदी मोकळेपणाने मान्य करायचे, तर हा भारतीयांना सुखद आश्चर्याचा धक्का होता! संगणकाच्या क्षेत्रात आपल्या काही तरुणांना नोकऱ्यांचे नवीन क्षेत्र उपलब्ध होईल एवढीच त्यांची माफक अपेक्षा या क्षेत्राकडून होती. त्यात आपण जागतिक महासत्ता बनू शकू असे स्वप्नही त्या वेळी कोणी पाहिले नसेल. 'परम'सारखा अमेरिकेच्या तोडीसतोड संगणक आपले तंत्रज्ञ बनवतील असेही त्या वेळी वाटले

नव्हते.

दोन प्रश्नांचा विचार या संदर्भात महत्त्वाचा आहे. कारण जागतिकीकरणातील व जीवघेण्या स्पर्धेतील महत्त्वाचे घटक कोणते असतात व ते कशा प्रकारे कार्य करतात ते त्यातून समजून घेता येईल. पहिला प्रश्न हा की, हा सुखद अपघात नेमका याच क्षेत्रात आणि आपल्याच देशाच्या बाबतीत का घडला असावा? आणि दुसरा प्रश्न असा की यातून मिळणारे फायदे चिरस्थायी आहेत का?

यातील दुसऱ्या प्रश्नाचा विचार प्रथम करावा असे मला वाटते. आजच्या स्पर्धेच्या युगात कोणाचाही कोणताच फायदा चिरस्थायी टिकणाऱ्या स्वरूपाचा नसतो. आज एका क्षेत्रात आपण आघाडीवर असलो, तरी उद्या दुसरा एखादा स्पर्धक आपल्यापुढे बाजी मारून आपल्याला मागे टाकू शकतो. शिवाय तांत्रिक प्रगती होत राहते. त्यामुळे आज महत्त्वाची वाटणारी व प्रचंड मागणी असणारी तंत्रे आणि कौशल्ये उद्या कालबाह्य ठरू शकतात व त्यांना मागणी राहत नाही. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचे महत्त्व कायम असेच अबाधित राहील व त्यातल्या आघाडीच्या स्थानावर आपण नेहमीच कायम राहू असे समजणे हा भाबडेपणा ठरेल. जीवघेण्या स्पर्धेच्या काळात अशी चूक आपल्याला फार महागात पडेल. एकच चिरस्थायी स्वरूपाचा फायदा आपल्याला यातून मिळू शकतो. तो म्हणजे हा सुखद अपघात आपल्याच बाबतीत का घडला आणि याच क्षेत्रात का घडला याचे विश्लेषण केले तर काही महत्त्वाचे निष्कर्ष हाती लागतील. या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी आपण कशावर भर दिला पाहिजे व काय टाळले पाहिजे हे कळेल. असे नेमकें तार्किक निष्कर्ष काढले, ते स्वीकारले व अमलात आणले तर होणारा फायदा हा चिरस्थायी स्वरूपाचा असेल. त्यामुळे आपण आपल्या पहिल्या प्रश्नाकडे येतो.

हा सुखद अपघात आपल्याच बाबतीत आणि याच क्षेत्रात का झाला, या प्रश्नाचे उत्तर शोधताना आणखी काही गोष्टींची नोंद घ्यायला हवी. ज्याबद्दल आपण अभिमान बाळगावा आणि जगातील प्रमुख स्पर्धकांनी आपली नोंद घ्यावी अशी आणखीही काही क्षेत्रांत आपली कामगिरी आहे. अण्वस्त्रनिर्मितीच्या क्षेत्रात आपल्या देशाने यश मिळवले आहे.

अण्वस्त्रांची निर्मिती करण्याचा निर्णय राजकीयदृष्ट्या परिपक्वतेचे लक्षण होता काय आणि त्यातून आपल्या सुरक्षिततेत वाढ झाली काय हा मुद्दा वादाचा आहे. त्या विषयात आता शिरणे योग्य होणार नाही, कारण आता आपण लक्ष केंद्रित करीत आहोत ते आपण कोणत्या क्षेत्रात यश मिळवले आहे, ते बघण्यावरच. अवकाशात भू-स्थिर उपग्रह सोडण्यात यश मिळवणाऱ्या काही मोजक्या राष्ट्रांमध्ये आपला समावेश आहे. या साऱ्याची कारणे काय आहेत?

या साऱ्या गोष्टींचा संबंध उच्च शिक्षणातील आणि संशोधनातील आपल्या यशाशी आहे. ज्या ज्या वेळेस आपल्या तरुणांना संधी मिळाली — परदेशात किंवा स्वदेशात — त्या त्या वेळेला आपल्या तरुणांनी अशा ठिकाणी लक्षणीय यश मिळवले आहे. संगणकाचे क्षेत्र हे तर निखळ ज्ञानाचे आणि शिक्षणाचे क्षेत्र आहे. या क्षेत्राच्या भरभराटीबरोबरच 'नॉलेज इंडस्ट्री' ही संकल्पना उदयाला आली आहे आणि ज्ञानाच्या आणि शिक्षणाच्या या क्षेत्रात आपले तरुण जगातील कोणत्याही देशाला मागे टाकतील अशी ताकद त्यांच्याकडे नक्कीच आहे.

शिवाय आपल्या सुदैवाने स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात शिक्षणाला पुरेसे महत्त्व दिले होते. खरे तर १९५० नंतरचा काळ हा पंचवार्षिक योजनांचा काळ होता. तो समाजवादी धोरणांचा काळ होता. 'लोककल्याणकारी राज्य' ही संकल्पना तेव्हा सर्वमान्य होती. सरकारने काय करायचे? फक्त कायदा-सुव्यवस्था सांभाळण्याचे व संरक्षणासाठी सज्ज राहण्याचे काम करायचे नाही, तर समाजाचा विकास करण्यासाठी, देशाचा आर्थिक विकास करण्यासाठीदेखील काम करायचे हे धोरण तेव्हा प्रभावी होते.

त्या काळात उच्च शिक्षणाचा प्रसार आणि विकास व्हावा यासाठी सरकारने धोरणे आखली. संशोधनाला — अगदी मूलभूत संशोधनाला — मदत करण्याचा, प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. आय.आय.टी.सारख्या अद्ययावत आणि गुणवत्तापूर्ण तंत्रसंस्था उभारण्यासाठी पुढाकार घेतला. शिक्षणाचा — उच्च शिक्षणाचादेखील — प्रसार मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्याच्या ठिकाणीदेखील महाविद्यालये उभी राहिली. खेड्यापाड्यांत शाळा उभ्या राहिल्या. शिक्षण आणि उच्च शिक्षण ही धनवंतांची मिरासदारी न राहता व ते शहरापुरते सीमित न राहता खालपर्यंत पोचले.

खरे तर स्वातंत्र्यानंतरचा सुरुवातीचा काळ हा किती अनंत अडचणींचा होता. आजच्या तुलनेत अधिकच वाईट होता. दळणवळणाची साधने, रस्ते, पाटबंधारे, शेतीचे उत्पादन, खते, वैद्यकीय सोयी साऱ्यांच बाबतीत आनंद होता. सर्वत्र साधनांची कमतरता होती. जेवढे पैसे खर्च करावे तेवढे कमीच होते. शिवाय अशा अन्य सर्व क्षेत्रांत खर्च केलेल्या पैशांची फळे ताबडतोब दिसण्यासारखी होती. त्याचा लाभ समाजाला लगेच होणार होता. उच्च शिक्षणाचे तसे नव्हते. संशोधनाचे तसे नव्हते.

आय.आय.टी.काढल्या तेव्हा संगणक आणि माहिती-तंत्रज्ञानाचे युग क्षितिजावरही नव्हते. 'नॉलेज इंडस्ट्री'ची संकल्पना जन्मालाही आली नव्हती. या क्षेत्रात प्रचंड आर्थिक उलाढाल होईल हे कोणाच्या स्वप्नातही नव्हते. भूस्थिर उपग्रहाच्या माध्यमातून संदेशवहनाच्या क्षेत्रात प्रचंड उद्योगक्षेत्र विस्तारेल हेदेखील कोणी कल्पिले नव्हते. पण

अशा काळात शिक्षणाच्या आणि उच्च शिक्षणाच्या विस्तारासाठी धोरणे आखली गेली.

संगणकाच्या क्षेत्रात आपल्याला यश मिळवता आले; कारण ते क्षेत्र शिक्षणाशी संबंधित होते आणि त्यातील संधीचा उपयोग करून घेण्यासाठी आवश्यक अशा शिक्षणाच्या सुविधा आपल्या देशात विकसित झाल्या होत्या.

याचा अर्थ असा नव्हे की देशात झालेला हा शिक्षणविषयक सुविधांचा विस्तार अगदी योग्य प्रकारे आणि निर्दोष पद्धतीने झाला. त्यात अनेक उणिवा होत्या; चुका होत्या. समाजातील मोठा वर्ग असा होता की जो आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नव्हता. शाळेत जाणाऱ्या मुलांपैकी अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडीत असत. शिक्षणातील गळतीचे प्रमाण प्रचंड होते. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या पायरीवर पोचणारी मुले फारच थोडी होती. आजही या परिस्थितीत फरक पडलेला नाही. या उणिवांची दखल घेतलीच पाहिजे. त्या दूर करण्यासाठी धोरणे आखलीच पाहिजेत.

पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट हीदेखील आहे की या साऱ्या उणिवांसहित जो काही शिक्षणाचा विस्तार या देशात झाला, त्यातून हा सुखद अपघात घडला. जर या उणिवा नसत्या तर चित्र अधिकच उठावदार दिसले असते. संगणकाच्या क्षेत्रात आपल्याला महासत्ता बनण्याची क्षमता आहे हे आधीच लक्षात आले असते तर कदाचित मायक्रोसॉफ्टसारखी कंपनी भारतात जन्माला आली असती!

पण या जर-तरच्या गोष्टी सोडा! पंडित नेहरूंसारख्या दूरदृष्टीच्या नेत्याने पंचवार्षिक योजनांच्या सुरुवातीच्या काळात जी धोरणे आखली त्याचे सुपरिणाम आपल्याला आणि जगाला १९९० च्या दशकात जाणवले. शिक्षणाच्या धोरणाच्या बाबतीत ही अगदी प्राथमिक गोष्ट आहे. त्याची धोरणे आखण्यासाठी दूरदृष्टीची गरज असते. आजच्या चांगल्या धोरणांचे परिणाम काही वर्षांनी जाणवतात आणि वाईट धोरणांचे दुष्परिणाम जाणवायलादेखील काही वर्षे जावी लागतात. अत्यंत गरिबीतदेखील आपल्या मुलाला शाळेत पाठवण्याचा आग्रह धरणाऱ्या आई-बापांना जर एखाद्याने विचारले की, 'आज तुमचा मुलगा शाळेत जो धडा शिकला किंवा जी कविता शिकला त्याचा त्याला पुढच्या आयुष्यात काय उपयोग होणार आहे? त्याऐवजी तो जर शेतावर राबला असता, त्याने विड्या वळल्या असत्या, हॉटेलात कप-बशा विसळल्या असत्या तर त्याला आज संध्याकाळी चार आणे मिळाले असते!' तर यावर ते आई-बाप काय बोलणार?

शिक्षणविषयक धोरणांकडे असे बघून चालत नाही. सारे काही 'इन्स्टंट' असण्याच्या आजच्या जमान्यातही शिक्षण ही गोष्ट अशी आहे की त्यातून 'इन्स्टंट' परिणाम मिळवण्याचा आग्रह घातक ठरेल. त्याचा विचार दूरदृष्टीनेच केला पाहिजे. पंचवार्षिक योजनांचे युग जणू संपल्याचे सध्या मानले जाते. कारण पूर्वीचा काळ

समाजवादी धोरणांचा काळ होता. कल्याणकारी योजनांचा काळ होता. आता जागतिकीकरणाचा जमाना आहे. बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेचा जमाना आहे. पण अशा या तीव्र स्पर्धेच्या काळात तर नियोजनाची गरज अधिकच आहे. एका बाजूला दूरदृष्टी ठेऊन आणि दुसरीकडे लवचीकता ठेऊन योग्य धोरणे अंगीकारली तरच येणाऱ्या प्रत्येक संधीचा आपल्याला फायदा उठवता येईल.

संगणकाच्या क्षेत्रात जो सुखद अपघात आपल्याबाबतीत घडला त्यावरून हेच लक्षात येते की निखळ ज्ञानाचे आणि शिक्षणाचे क्षेत्र जेव्हा आर्थिक उलाढालीचे क्षेत्र म्हणून पुढे येते तेव्हा त्यात आपण सर्वात यशस्वी ठरतो. तांत्रिक प्रगतीबरोबर अशी अधिकाधिक क्षेत्रे निर्माण होण्याची शक्यता आहे. संगणकापाठोपाठ माहिती-तंत्रज्ञानाचे क्षेत्र आले. आता 'बायो-इन्फॉर्मेटिक्स'चे क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. आज क्षितिजावरही दिसत नसलेली क्षेत्रे भविष्यात येत राहतील. अशा क्षेत्रात आघाडी घेण्यासाठी आपण सतत सज्ज राहिले पाहिजे. शिक्षणक्षेत्राचा विस्तार, त्याची गुणवत्ता आणि उच्च शिक्षणाच्या पुरेशा संधी यांच्या आधारानेच आपण अशी आघाडी सतत टिकवून ठेऊ शकतो.

# एक सनातन सिद्धान्त

जीवघेणी स्पर्धा नसलेली जुनी समाजव्यवस्था असो की आजच्या जागतिकीकरणाच्या युगातील जंगलचा कायदा पाळणारी येऊ घातलेली नवी जागतिक व्यवस्था असो. प्रत्येक व्यवस्थेचे काही नियम असतात. ते सर्वांनी मान्य केलेले असतात. त्यानुसार आचरण करणे आवश्यक आहे, याबद्दल सर्वसाधारण सहमती असते. नियम पक्के असतील तर व्यवस्था भक्कम असते. नियमांना धक्का लागू लागला की व्यवस्था डळमळीत होऊ लागते. मग नियम बदलावे लागतात. नवे नियम करावे लागतात. कोणतीही व्यवस्था अशा नियमांच्या आधारे आपले अस्तित्व टिकवून ठेवते.

पण नियमांना पाठबळ असते, ते एका विचारसरणीचे. ही सर्वमान्य विचारसरणी — रुलिंग पॅराडाईम — हा कोणत्याही व्यवस्थेचा आत्मा असतो. कोणतीही व्यवस्था त्या पायावर उभी असते. नियम थोडेफार बदलले तरी चालतात, पण रुलिंग पॅराडाईमला धक्का लागून चालत नाही. तो बदलला की जुनी व्यवस्थाच कोसळते व नवी पुढे येऊ लागते.

या जगाचा एक सनातन सिद्धान्त हा आहे की रुलिंग पॅराडाईम हा प्रस्थापित आणि बलशाली ठरवीत असतात. व्यवस्थेचे फायदे ज्यांना मिळतात त्यांच्या मतानुसार रुलिंग पॅराडाईम ठरतो. मग स्वाभाविकपणेच नियम त्यांना फायदा होईल.असेच निर्माण होतात. नियमात फेरफार झाले तरी बिघडत नाही. नवीन नियम बलशाली घटकांच्या फायद्याचेच असतात. हा सिद्धान्त पूर्वापार चालत आला आहे आणि आजही तो तेवढाच सत्य आहे.

'स्त्री-जन्माची इतिकर्तव्यता मुलांना जन्म देण्यात आणि वाढवण्यात आहे' ही विचारसरणी दृढमूल झाली आणि पुरुषप्रधान संस्कृतीला उपकारक असे नियम आपोआप बनू लागले. मग तो 'स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल आहे' हा पुरातन नियम असो किंवा 'स्त्रीने बाहेर करियर केले तरी घर सांभाळण्याची जबाबदारी तिचीच आहे' हा आधुनिक नियम असो. साऱ्यांचे मूळ त्या विचारसरणीत आहे; रुलिंग पॅराडाईममध्ये आहे. आणि त्यातून नियम बदलले तरी ते पुन्हा पुरुषप्रधान संस्कृतीला उपकारक आहेत.

कर्मविपाकाची विचारसरणी आपल्या समाजात दृढमूल झाली. त्यामुळे

वर्णव्यवस्था टिकवून ठेवण्याला मदत झाली. जातींच्या उतरंडीतील अगदी खालच्या थरावर असणाऱ्या जातीतील माणसे 'हा सारा आपल्या गतजन्मातील पापांचा परिणाम आहे' असे मानून आपल्यावरील अन्याय शांतपणे सहन करीत राहिली. त्याविरुद्ध बंड करण्याचा विचार तर दूरच, पण त्याबद्दल संतापही त्यांच्या मनात येणार नाही याची व्यवस्था झाली.

कोणत्यांही व्यवस्थेमध्ये बलशाली घटकांना उपयुक्त असेच नियम बनतात याचे खरे कारण त्यांच्याकडे पैशाची किंवा शस्त्रांची ताकद असते हे नव्हे. खरे कारण हे आहे की, त्यांना उपयुक्त होईल अशी विचारसरणी त्यांनी हुशारीने निर्माण केलेली असते आणि ती सर्वांनी मान्य करण्यासाठी आपली सारी बुद्धिमत्ता आणि चातुर्य वापरलेले असते. 'सर्वांनी' हा यातला कळीचा शब्द. ज्यांच्यावर या व्यवस्थेत अन्याय होतो, ज्यांची पिळवणूक करणारे नियम अशा व्यवस्थेत बनलेले असतात तेदेखील अशा नियमांच्या विरोधात बोलत नाहीत. तसा विचार त्यांच्या डोक्यात येत नाही. अन्याय्य नियम ते बिनतक्रार मान्य करतात. कारण ते नियम ज्यातून येतात ती विचारसरणी त्यांनी मान्य केलेली असते.

जागतिकीकरणाच्या जमान्यात एक नवी व्यवस्था निर्माण होते आहे. ती साऱ्या जगात राष्ट्रांच्या उतरंडीच्या स्वरूपात निर्माण होते आहे. हळूहळू प्रत्येक राष्ट्रामध्ये ती विषमता समाजात निर्माण करण्यात आणि दृढमूल करण्यात परावर्तित होईल यात शंका नाही.

यासाठी नवी विचारसरणी, नवे मुद्दे अविकसित राष्ट्रांमध्ये प्रसारित करण्यात येत आहेत. तेही (नेहमी घडते त्याप्रमाणे) इतक्या हुशारीने आणि इतक्या चतुराईने की त्या राष्ट्रातील जनतेनेही त्याचा स्वीकार करावा. त्यातून निर्माण होणारे अन्याय्य नियम बिनतक्रार मान्य करावेत. त्यासाठी शब्दांचे अर्थ बदलले जात आहेत. नवे शब्द प्रचलित केले जात आहेत. काही गोष्टींचे संदर्भ उलटेपालटे केले जात आहेत. कोणतीही नवी व्यवस्था निर्माण करताना जसे घडते तसेच हे होत आहे. पण आपण याबाबत वेळीच सावध व्हायला हवे. नवी विचारसरणी, नवी मूल्ये स्वीकारताना त्यांचा अर्थ तावूनसुलाखून पाहिला पाहिजे.

एक उदाहरण आहे 'मानवतावादी धोरणांचे'. आता हे तत्त्व किती गोंडस आहे. त्याला विरोध कोण करणार? आणि त्याचा वापर केला जाण्याचे एक स्थान आहे, 'बाल-कामगारांचा' प्रश्न. हा तर अगदी काळजाला भिडणारा मुद्दा. जे वय लहान मुलांचे खेळण्याबागडण्याचे आहे; शाळेत जाऊन शिकण्याचे आहे त्या वयात त्यांना कामाला जुंपले जाते, हे किती भयानक आहे. त्याच्याविरोधात ठाम उभे राहिलेच पाहिजे. या विचारसरणीतून कोणता नियम येतो आहे? ज्या देशांमध्ये आणि ज्या

उद्योगधंद्यांमध्ये बाल-कामगारांकडून काम करून घेतले जाते, त्या देशांवर आणि त्या उत्पादनांवर बंदी घातली पाहिजे. आंतरराष्ट्रीय बाजारात त्यांना प्रवेश देता कामा नये.

याचा परिणाम काय होईल? त्या बाल-कामगारांना कामावरून काढून टाकले जाईल, मग ती काय करतील? ती खेळायला-बागडायला जातील का? शाळेत शिकायला जातील का? की ती भुकेने उपाशी राहतील?

कारण ही दुर्दैवी वस्तुस्थिती मान्यच केली पाहिजे की अनेक अविकसित देशात जीवनसंघर्ष इतका तीव्र आहे की काम करून अन्न न मिळवणाऱ्या मुलांना जगणेच अशक्य व्हावे. याउलट अशा नियमांचा आणखी एक परिणाम काय होईल? अशा अविकसित देशांत बनणारा स्वस्त माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकत घेतला जाणार नाही. म्हणजे बहुराष्ट्रीय बड्या कंपन्यांना त्याच्याशी स्पर्धा करावी लागणार नाही. अर्थात त्या अविकसित राष्ट्रांची अर्थव्यवस्था आणखीनच खालावेल व तिथल्या मुलांची परिस्थिती आणखीनच दयनीय होईल.

मानवतावादाला विरोध कोण करेल? बाल-कामगारांची प्रथा योग्य आहे असे कोण म्हणेल? त्या प्रथेचे समर्थन करण्याचा प्रश्नच नाही. पण अत्यंत हुशारीने ही विचारसरणी अशा ठिकाणी मांडली व ती सर्वांनी मान्य केली की त्याचा परिणाम बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्यामध्ये नेमका होतो (आणि अविकसित राष्ट्रातील मुलांचे आयुष्य अधिक खडतर करण्यात होतो) हे लक्षात घेण्याजोगे आहे. दुसऱ्या ठिकाणी हेच मानवतावादाचे तत्त्व वापरणे शक्य आहे. पण तिथे विचारसरणी कशी बदलते तेदेखील पाहण्यासारखे आहे.

जे काम करण्यासाठी अमेरिका-युरोपमधील कामगारांना व तंत्रज्ञानांना भरमसाठ पगार दिला जातो, तेच काम तेवढ्याच कौशल्याने करणाऱ्या एखाद्या विकसनशील देशातील कामगारांना व तंत्रज्ञांना तुलनेने नगण्य पगार दिला जातो. आता एकाच प्रकारच्या व तेवढ्याच कौशल्याने करण्याच्या कामाला असा नगण्य पगार देणे न्याय्य आहे काय? हा उघड अन्याय आहे. तो मानवतावादाच्या विरोधात आहे.

पण इथे चतुराईने वेगळी विचारसरणी मांडली जाते. अशा प्रकारे कमी पगारावर काम करायला लोक मिळत असल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या तिथे कारखाने काढतात. त्यातून रोजगार वाढतो आणि त्या देशांच्या अर्थकारणाला फायदा होतो. म्हणून अशा विकसनशील राष्ट्रांनी सवलती देऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांना आमंत्रण द्यावे! म्हणजे इथे मानवतावादाचा विचार नाही. इथे निखळ अर्थकारणाचा विचार. बाल-कामगारांच्या बाबतीत अर्थकारणाचा विचार नाही. तिथे निव्वळ मानवतावादाचा विचार. दोन्हीचा परिणाम एकच! जे बलशाली आहेत त्यांनाच फायदा होईल असे नियम त्यातून येतात आणि ज्यांच्यावर अन्याय होतो, त्या देशातील लोकही या विचारसरणीचा स्वीकार

केल्यामुळे हे नियम बिनतक्रार स्वीकारतात.

हीच गोष्ट शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत घडते आहे. नवीन विचारसरणी, नवी आरग्युमेंट्स लोकांच्या गळी यशस्वीरीत्या उतरवण्यात येत आहेत आणि त्यातून आपले एकमेव बलस्थान असलेल्या शिक्षणक्षेत्रातच आपण कमजोर बनणार असूनही आपण ही विचारसरणी स्वीकारतो आहोत. आपल्याच समाजातले अनेक लोक या विचारसरणींना पाठिंबा देत आहेत.

यातील एक विचारसरणी म्हणजे प्राथमिक शिक्षण हीच फक्त सरकारची जबाबदारी आहे. उच्च शिक्षण नव्हे. त्यामुळे सरकारने आपली सारी मदत प्राथमिक शिक्षणासाठी करावी. त्यासाठी फक्त खर्च करावा. उच्च शिक्षणावरचा खर्च कमी करून (आणि जमल्यास त्यातून पूर्णपणे अंग काढून घेऊन) सारे लक्ष प्राथमिक शिक्षणावर केंद्रित करावे. आधी सांगितल्याप्रमाणे गेली अनेक वर्षे सरकारने शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराचे व त्याची गुणवत्ता वाढवण्याचे धोरणही अवलंब्रले आहे. यात काही उणिवा आहेत. समाजातील फार मोठा वर्ग शालेय शिक्षणापासून वंचित राहिला आहे. शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण चिंताजनक आहे. त्यावर उपाय करण्याची आवश्यकता आहे यात शंका नाही. शालेय शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा व त्याची गुणवत्ता वाढायला हवी. त्यासाठी अधिक खर्चही करायला हवा हे खरे आहे. पण हे करण्यासाठी काय करायला हवे?

शिक्षणावरचा एकूण खर्च वाढवायला हवा. शालेय शिक्षणाचा प्रसार जेवढा वाढेल तेवढी अधिकाधिक हुशार मुले शिक्षणाच्या प्रांगणात येणार. त्यांना अधिकाधिक शिकण्याची आकांक्षा उत्पन्न होणार. उच्च शिक्षणासाठी त्यांनाही आस उत्पन्न होणार. त्यांच्यामधल्या गुणी मुलांसाठी उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हायला नको? थोडक्यात, शिक्षणाच्या प्रसारात पूर्वीच्या काळात ज्या उणिवा राहिल्या त्यावर उपाय असा आहे की शिक्षणावरचा एकूण खर्च वाढवला पाहिजे. त्यात शालेय शिक्षणावरचा खर्च अधिक प्रमाणात वाढवला पाहिजे.

पण आजची विचारसरणी कशी बनवली आहे पाहा. ज्या प्रमाणात शालेय शिक्षणावरचा खर्च वाढत जाणार त्याप्रमाणात उच्च शिक्षणावरचा सरकारचा खर्च कमी होत जाणार. ते शिक्षण महाग होत जाणार. तिथल्या संधी कमी कमी होत जाणार. एका बाजूने उच्च शिक्षणाच्या दारावर धडका मारणाऱ्या विद्यार्थ्यांचा रेटा वाढत जाणार तर दुसऱ्या बाजूला तिथल्या वाटा अरुंद आणि कठीण होत जाणार. यातून सामाजिक तणाव आणि अस्वस्थता वाढीला लागणार नाही का? विशेषत: आपल्या समाजात, जिथे शिक्षणाचे महत्त्व अपरंपार आहे. इथल्या मध्यमवर्गाची इच्छा एकच असते. आकांक्षा एकच असते. त्यांचे स्वप्न एकच असते. मुलांना चांगले शिक्षण द्यायचे.

अगदी झोपडपट्टीत राहणाऱ्या दरिद्री पालकांना एकच आशेचा किरण आपल्या समाजात आहे. 'पोरंग साळंला जाईल, शिकंल आणि मोठं होईल.' त्यांना भविष्यकाळाविषयी आशा वाटावी असं दुसरं काय आहे इथे? इथंल्या असंख्य दारिद्री कुटुंबांच्या आयुष्यात भोवतालच्या खडतर वास्तवात मनोधैर्य टिकवून ठेवणारा एकमेव आशेचा तंतू म्हणजे त्यांच्या मुलांचे शिक्षण. शालेय शिक्षणाच्या प्रसाराबरोबर अशांची संख्या वाढत जाणार आहे.

ज्यांच्या कुटुंबात शिक्षणाची परंपरा नाही असे 'फर्स्ट जनरेशन लर्नर्स' अधिकाधिक संख्येने पुढे येत राहणार. त्यातल्या अनेकांकडे 'स्पार्क' असेल हे नक्कीच. हुशारी असेल. शिकण्याची जिद्द असेल. सध्याच्या परिस्थितीत हा स्पार्क विझलेलाच राहतो. ही हुशारी कामाला न येता हरवून जाते. ही जिद्द मार्ग न मिळाल्यामुळे तशीच जिरून जाते. शालेय शिक्षणाचा प्रसार करून ही जिद्द आणि हुशारी शोधून काढण्याचा, प्रकाशात आणण्याच्या जणू एक मोठाच राष्ट्रीय प्रकल्प हाती घेतला जाईल. हे फारच अभिनंदनीय आहे. ते आवश्यकदेखील आहे.

पण मग पुढे काय? या साऱ्याची फलश्रुती काय? स्वत:मधली हुशारी आणि जिद्द यांची जाणीव झालेल्या या मुलांना पुढच्या वाटा खुणावू लागतील. उच्च शिक्षणाची शिखरे त्यांच्या दृष्टिपथात येतील आणि अशा वेळी त्यांच्या मार्गातले अडसर वाढत जातील. उच्च शिक्षणाच्या संधी दुरावत जातील. ते अधिकाधिक महाग होत जाईल. उच्च शिक्षणासाठी गुणवत्ता नव्हे तर आर्थिक क्षमता हा निकष बळावत जाईल.

अधिकाधिक विद्यार्थी शाळांमधून शिकून बाहेर पडू लागले तर खरे म्हणजे उच्च शिक्षणाच्या संधी त्याप्रमाणात वाढत जायला हव्यात. गुणांच्या निकषावर विद्यार्थ्यांमध्ये होणारी स्पर्धा अधिक तीव्र होत गेली, तर ते समजण्यासारखे आहे. पण इथे निकष बदलणार आहे. हे चित्र फार भयानक असेल. कोवळ्या विद्यार्थ्यांना त्यांच्यातील हुशारी आणि जिद्द यांची जाणीव करून देऊन मग त्यांना निराशेच्या गर्तेत लोटणारे हे चित्र असेल. संवेदनशील वयाची लाखो मुले ज्या समाजात निराशेच्या गर्तेत ढकलली जात असतील, तो समाज आणि त्यातली ती व्यवस्था जणू ज्वालामुखीच्या तोंडावर बसल्यासारखी असणार नाही का? एखाद्या देशातल्या राज्यकर्त्यांना समाजाच्या या अतिसंवेदनशील गोष्टींबद्दल बेफिकीर राहून कसे चालेल? तिथल्या गरिबांच्या आणि मध्यमवर्गीयांच्या आयुष्यातला आशेचा एकमेव किरण नष्ट करून कसे चालेल? नवीन येणाऱ्या 'फर्स्ट जनरेशन लर्नस'ना असे निराशेच्या गर्तेत लोटून कसे चालेल? विशेषत: त्या देशात लोकशाही राज्यव्यवस्था असताना!

पण हे घडते आहे. झपाट्याने आपली पावले त्या दिशेला पडत आहेत. हा

ज्वालामुखी आपणच आपल्या निर्णयातून, धोरणातून निर्माण करतो आहोत. 'शालेय शिक्षणाचा प्रसार अधिक झाला पाहिजे. त्यावर सरकारने खर्च वाढवला पाहिजे' या निर्विवादपणे योग्य असलेल्या धोरणाला 'उच्च शिक्षणावरचा खर्च कमी केला पाहिजे. सरकारने उच्च शिक्षणातून अंग काढून घेतले पाहिजे' या चुकीच्या सूत्राची जोड देऊन हे घडते आहे.

याचे कारण जागतिकीकरणाच्या जमान्यात असलेली आणखी एक विचारधारा; जी आपण सर्वांनी मान्य केली आहे. ती म्हणजे 'सरकारी अनुदाने ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. अर्थशास्त्राच्या नियमांनुसार अशा अनुदानातून अर्थव्यवस्थेवर ताण पडत राहतो. त्यातून बांडगुळे तयार होतात; जी मूळ अर्थव्यवस्थेला धोका निर्माण करतात. म्हणून अनुदाने देण्याचे ताबडतोब बंद करायला हवे. निदान अनुदाने कमी कमी करत नेली पाहिजेत.' आता पुढची तर्काची साखळी सोपी आहे. शालेय शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे. उच्च शिक्षण ही सरकारची जबाबदारी नव्हे. म्हणजे उच्च शिक्षणावरचा खर्च हे अनुदान आहे. म्हणून ते बंद व्हायला हवे.

बाजारपेठेच्या अर्थशास्त्राच्या तत्त्वानुसार अनुदाने देण्याचे धोरण अर्थव्यवस्थेला घातक आहे. म्हणून सरकारने उच्च शिक्षणावरचा खर्च कमी केला पाहिजे व त्यातून बाहेर पडले पाहिजे. ही तर्क-प्रक्रिया अशी अगदी सरळ भासते. वारंवार हे आर्ग्युमेंट केले जाते. पण त्यात काही विसंगती आहेत आणि त्या नीटपणे समजून घेतल्या पाहिजेत.

पहिली गोष्ट अशी की, निव्वळ अर्थशास्त्राच्या नियमांच्या आधारावर समाजाची धोरणे ठरत नसतात; ठरवून चालत नाहीत. त्याला सामाजिक परिस्थितीचे भानही हवे. ज्या अमेरिकेसारख्या देशात बाजारपेठेचे अर्थशास्त्र—मार्केट इकॉनामी—सुरुवातीपासून अधिराज्य गाजवीत आहे; तिथेदेखील वृद्धांची जबाबदारी सरकारने घेणे आवश्यक मानले गेले आहे. वृद्धांसाठी सोशल सिक्युरिटीची योजना आहे. त्यासाठी सरकार खर्च करते आहे. याचे कारण तिथल्या सामाजिक वास्तवामध्ये ते आवश्यक आहे. आपल्या वृद्ध आई-बापांची काळजी मुलांनी घ्यावी असा संकेत तिथे निर्माण झालेला नाही. तो आपल्याकडे आहे. त्यामुळे वृद्धांची काळजी घेण्याची जबाबदारी सरकारची आहे असे आपण म्हणत नाही. याउलट आपल्याकडे मुलांच्या शिक्षणाला फार महत्त्व आहे. साऱ्या गरीब वर्गाच्या आशा या गोष्टीवर केंद्रित झालेल्या असतात. हे इथले सामाजिक वास्तव आहे. ते नाकारून चालणार नाही. म्हणून आपल्या देशात सरकारने शिक्षणावर खर्च करणे—शालेय आणि उच्च शिक्षणावरदेखील—हे आवश्यक मानले गेले पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी की, अनुदाने अर्थव्यवस्थेला घातक असतात असे म्हणताना

आपण सर्व प्रकारचे खर्च एकाच मापाने मोजणार काय? रॉकेल, डिझेल, स्वयंपाकघरातील जळणाचा गॅस, खते, वीज इत्यादी गोष्टींवर दिलेले अनुदान आणि शिक्षणासाठी केलेला खर्च यांचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम सारखाच असतो? इंग्रजीत एक सुंदर वाक्य आहे, `Money spent on education is not wasted, it is invested.' आजच्या आपल्या आर्थिक धोरणामध्ये उद्यासाठीचा विचार कोणता आहे? उद्यासाठी आपण कोणती तरतूद करून ठेवीत आहोत? देशावरच्या कर्जाचा बोजा वाढतो आहे, अशा वेळी आपण दूरदृष्टीने उद्याची कोणती तरतूद करतो आहोत? देशाच्या दृष्टीने उद्याची तरतूद म्हणजे काय पैशांची साठवण? परकीय गंगाजळीचा अस्थिर असणारा निधी? रस्ते, पूल, इमारती यांतून उभारली जाणारी सिमेंट-कॉंक्रिटची जंगले?

देशाच्या दृष्टीने उद्याची तरतूद म्हणजे उद्याच्या नागरिकांवर केलेला खर्च. त्यांच्या शिक्षणावर केलेला खर्च. अन्य अनुदानांबरोबर या खर्चालाही अनुदान म्हणणे व ते अर्थव्यवस्थेला घातक आहे असे म्हणणे चूक आहे. विशेषत: आपल्या देशात शिक्षणाचे आणि ज्ञानाचे क्षेत्र हेच आपले एकमेव बलस्थान आहे. संगणक आणि माहिती-तंत्राच्या क्षेत्रातील आपल्या यशाने हे दाखवून दिले आहे की 'नॉलेज-इंडस्ट्री'च्या क्षेत्रात आपण आघाडीवर राहू शकतो. (आणखी एक गोष्ट आहे. जरा खोलवर विचार केला तर सरकारने उच्च शिक्षणावर केलेला खर्च हे अनुदान नव्हेच. त्याचे स्वरूप वेगळे आहे. पण त्याचा विचार आपण 'शिक्षणाचे अर्थशास्त्र' या प्रकरणात करणार आहोत.)

नवी व्यवस्था निर्माण करताना नवी विचारसरणी प्रथम पेरावी लागते, सर्वमान्य व्हावी लागते. मग त्यातून बलशाली घटकांना उपकारक असे नियम आपोआप तयार होतात, अशी धोरणे आपोआप निर्माण होतात हा जगाचा सनातन सिद्धान्त आहे. इथे ते कसे घडते आहे?

पहिला लगेच जाणवणारा परिणाम हा की उच्च शिक्षण ही देशातील धनवंतांची मिरासदारी होईल. उच्च शिक्षण ही कधी नव्हे इतकी धनाची खाण झाली आहे. लक्ष्मी आणि सरस्वती यांचे अतूट नाते आज निर्माण झाले आहे. अशा वेळी धनवंतांना आपली स्थिती मजबूत करायची असेल तर सरस्वतीलाही आपल्या ताब्यात ठेवले पाहिजे. 'सर्वांनीच उच्च शिक्षणासाठी कशाला जायला पाहिजे'? असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. प्रश्न योग्य आहे पण त्याचे उत्तर काय आहे? कोणी जावे? गुणवंतांनी जावे की धनवंतांनी जावे? आवश्यकतेनुसार महाविद्यालयांची संख्या ठरवून त्यांना सरकारने साहाय्य करावे की भरमसाठ खाजगी महाविद्यालये काढायला देऊन सरकारने त्यांना साहाय्य न करता सारा खर्च विद्यार्थ्यांकडून वसूल करण्याइतकी फी

आकारण्यास सांगावे?

सध्या दुसऱ्या प्रकारचे धोरण पुढे येते आहे. याचा अर्थ 'उच्च शिक्षण कोणी घ्यावे?' या प्रश्नाचे आपले उत्तर 'धनवंतांनी घ्यावे', असे आहे. उदाहरणार्थ, कोणत्याही डॉक्टरला आपल्या मुलाला डॉक्टर करण्याची इच्छा असतेच. शिक्षणाला गुणवत्तेचा निकष असला की याची खात्री नसते. आर्थिक निकष ठेवला की ही चिंता नाही!

पण मग गरीब आणि मध्यमवर्गातून पुढे येणाऱ्या हुशार मुलांचे काय करायचे? त्याचे उत्तरही तयार आहे. ते म्हणजे, अशा मुलांसाठी छोटे छोटे उपयोजित कौशल्ये शिकवणारे अभ्यासक्रम असावेत. हे अभ्यासक्रम पूर्ण केले की त्यांना नोकऱ्या मिळतील. म्हणजे त्यांच्या आयुष्यातला प्रश्न सुटेल. 'शिक्षण नुसते पुस्तकी नसावे. त्याचा जीवनाला उपयोग असावा' असे शिक्षणतज्ज्ञ पूर्वीपासून सांगत आहेत. पण त्याचा आता बाजारपेठेचे अर्थशास्त्र स्वीकारणाऱ्या समाजाने लावलेला हा अर्थ आहे. शालेय शिक्षण संपले की मुलांनी छोटासा कोर्स करावा आणि नोकरीला लागावे. परिणाम काय होईल? शिक्षणक्षेत्रासंबंधी विचार करताना नेहमी दूरवरचा विचार करावा लागतो. कारण शिक्षणविषयक धोरणांचे चांगले किंवा वाईट परिणाम जाणवायला, लक्षात यायला १५ ते २० वर्षे जावी लागतात.

या धोरणांचा परिणाम असा होईल की भारत देश हा एक निव्वळ दुसऱ्या दर्जाचे तांत्रिक आणि यांत्रिक कारागीर पुरवणारा देश बनेल. त्या पलीकडे उभारी घेण्याच्या त्याच्या स्वप्नाचे खच्चीकरण होईल. इथल्या कॉल-सेंटर्समधून अमेरिकन कंपन्यांसाठी आपले गुणवान तरुण काम करीत राहतील. आपले संगणकक्षेत्रातले तरुण बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी संगणकात डोळे खुपसून तासन्तास खुर्चीवर बसून राहतील. त्यांच्या डॉक्टरांसाठी 'मेडीकल ट्रान्सक्रिप्शन' लिहिण्याचे काम करतील आणि तेदेखील कमी पैशांवर. या पलीकडे ते उडी मारणार नाहीत. डॉक्टर होण्याचे स्वप्न ते पाहणार नाहीत. ते कॉम्प्युटर इंजिनियर, सॉफ्टवेअर इंजिनियर असणार नाहीत. अमेरिकेने महासंगणक (सुपर कॉम्प्युटर) देण्याचे नाकारले तर 'परम'सारखा महासंगणक निर्माण करण्याचे आव्हान ते पेलू शकणार नाहीत. ते 'मायक्रो-सॉफ्ट'शी स्पर्धा करू शकेल अशी कंपनी काढण्याचा विचारही करणार नाहीत आणि अशाच प्रकारे भविष्यात निर्माण होणाऱ्या नवीन 'नॉलेज इंडस्ट्रीज'मध्ये ते दुय्यम स्थानांवर काम करीत राहतील. ब्रिटिशांनी इथल्याच लोकांना भरती करून घेऊन सैन्य बनवले. त्यांना रणांगणावर लढायला लावले. पण त्यांना अधिकारी कधीच केले नाही, हा इतिहास आपण विसरलो आहोत का?

नव्या व्यवस्थेत तीच गोष्ट अधिक चतुराईने घडून येईल. ब्रिटिशांनी तेव्हा त्यांच्या



INSTITUTE OF ADVANCED ... 124289

आवश्यकतेप्रमाणे 'बाबू' लोक बनवणारी शिक्षणपद्धती आणली. नवीन व्यवस्थेत प्रस्थापित बड्या राष्ट्रांसाठी आणि कंपन्यांसाठी आवश्यक असणारे 'घिसाडी' बनवण्याची शिक्षणपद्धती आज आपण आणतो आहोत का? पाश्चात्त्यांच्या अर्थव्यवस्थेचे इंजिन चालविणारे टेक्निशियन्स पुरवणारा हा देश असेल. इथे शास्त्रज्ञ नसतील. संशोधक नसतील. जागतिक दर्जामध्ये स्पर्धा करू शकतील असे इंजिनियर्स नसतील. उत्तम अर्थतज्ज्ञ तयार होणार नाहीत. इतिहासाचे अभ्यासक अभावाने आढळतील. समाजशास्त्रज्ञ दुर्मीळ होतील. आपला देशदेखील एक दुय्यम दर्जाचे बनाना रिपब्लिक होईल.

सरकारने शिक्षणव्यवस्थेतून अंग काढून घ्यायला सुरुवात अशा वेळी केली आहे की, जेव्हा परकीय शिक्षणसंस्थांना इथली दारे उघडून द्यावी लागणार आहेत. 'गॅट' करारानुसार हे घडणार आहे. 'त्या परकीय शिक्षणसंस्थांशी स्पर्धा करायला तयार व्हा. गुणवत्ता वाढवा' असे इथल्या शिक्षणसंस्थांना व विद्यापीठांना वारंवार सांगितले जाते आहे आणि त्याच वेळेला त्यांचे आर्थिक साहाय्य कमी कमी केले जाते आहे. खरे म्हणजे, कोणत्याही परकीय संस्थांशी स्पर्धा करण्याची क्षमता आमच्या शिक्षणसंस्थांमध्ये जरूर आहे. त्यांना या परकीय संस्थांचे भय बाळगण्याचे बिलकूल कारण नाही. आमचा शिक्षकवर्गही आवश्यक त्या गुणवत्तेचा आहे.

पण आज निधीच्या अभावी विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये शिक्षकांच्या जागा भरता येत नाहीत. नवीन शिक्षकांना पूर्ण पगार देता येईल अशी खात्री नाही. विकासासाठीच्या योजना प्रत्यक्षात आणता येत नाहीत. महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याची गरज आहे. नवे अभ्यासक्रम आणण्याची गरज आहे. पण या प्रत्येक गोष्टीचा अर्थ सरकारला उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातून बाहेर पडण्याची संधी असा प्रत्यक्षात केला जात आहे. त्या अनुभवामुळे अशा गोष्टींना शिक्षणसंस्थांचा प्रतिसादही थंड आहे. अशा परिस्थितीत या परकीयांच्या लोंढ्याला तोंड देण्यासाठी सज्ज व्हायला आपण आपल्या शिक्षणसंस्थांना सांगतो आहोत. त्याला काय अर्थ आहे? पैशाचे पाठबळ आटत असताना त्यांनी ही उडी मारावी कशी?

एक छोटीशी गोष्ट आठवते. एका गावाबाहेर एका मठीत एक साधूमहाराज आणि त्यांचा शिष्य राहत होते. शिष्य रोज गावात जाऊन भिक्षा मागून शिधा आणायचा आणि भाकरी करायचा. रात्री त्यातली एक भाकरी सकाळच्या न्याहरीसाठी तो गाठोड्यात बांधून ठेवायचा. एके दिवशी त्याने पाहिले, उंदराने ती भाकरी खाल्ली होती. त्याने ही गोष्ट साधूमहाराजांना सांगितली. ते म्हणाले, 'भाकरी उंच कोनाड्यात ठेव.'

तरीदेखील उंदराने भाकरी खाल्लेली! मग भाकरी आणखी उंच कोनाड्यात ठेवली.

तरी उंदराने खाल्ली. मग आढ्याला काठी अडकवून त्याला भाकरी टांगली. तरी उंदीर तिथपर्यंत पोचला!

मग साधूमहाराजांनी शिष्याला त्या उंदराचे बीळ खणायला सांगितले. शिष्य येऊन सांगू लागला, 'बीळ खणले, त्यात पैशांची पुरचुंडी सापडली.' साधूमहाराज म्हणाले, 'ती पुरचुंडी काढून घे आणि भाकरी खालच्या कोनाड्यात ठेव.'

त्या रात्री उंदराने भाकरी खाल्ली नव्हती.

शिष्याला काही कळेना. त्यांने साधूमहाराजांना विचारले, 'काय झाले?' साधूमहाराज म्हणाले, 'पैशाचे पाठबळ असल्याशिवाय कोणीही उंच उडी मारू शकत नाही. ते पाठबळ होते तोवर उंदीर उंच उडी मारत होता.' शिक्षणसंस्थांमध्ये उंच उडी मारण्याचे सामर्थ्य आहे. आपल्या शिक्षणक्षेत्रामध्ये उंच भरारी घेण्याचे सामर्थ्य आहे. 'नॉलेज-इंडस्ट्री'च्या काळात या देशाला आर्थिक महासत्ता बनवण्याचे सामर्थ्य आहे. सध्याच्या महासत्तांसाठी प्रबळ प्रतिस्पर्धी बनण्याचे सामर्थ्य आहे पण ते खच्ची करण्याचा हा सोपा मार्ग आहे.

पूर्वीच्या काळी भारतात विणलेल्या कापडाची आपल्या देशातील कापडाशी स्पर्धा नको म्हणून ब्रिटिशांनी इथल्या विणकरांचे अंगठे कापले असे म्हणतात. आज असे काही करावे लागणार नाही. पैशाचे पाठबळ काढले की उंच उडी मारण्याची, भरारी घेण्याची शक्यता आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी योग्य ती विचारसरणी इथे पेरली, रुजवली आणि इथल्या लोकांना ती पटवली की झाले. हे काम सुरू झाले आहे. बऱ्यापैकी यशस्वी होते आहे. त्याला बळी पडायचे की आपले सामर्थ्य आपण कायम ठेवायचे हे आपले आपणच ठरवायचे आहे.

# दुसरा नियम उष्मागतिशास्त्राचा

पदार्थविज्ञानाची एक शाखा आहे उष्मागतिशास्त्र — थर्मोडायनॅमिक्स. यात उष्णता कशी वाहते याचा अभ्यास केला जातो. अगदी साधे उदाहरण द्यायचे तर थंड पाण्यात लोखंडाचा तापवलेला गरम तुकडा टाकला तर काय होईल? लोखंड गार होईल व पाण्याचे तापमान थोडे वाढेल. याउलट गरम पाण्यात थंड लोखंडाचा तुकडा बुडवला, तर लोखंड गरम होईल व पाण्याचे तापमान थोडे कमी होईल. याचे कारण उष्णता नेहमी गरम पदार्थाकडून थंड पदार्थाकडे वाहते. उष्णतेच्या या आणि अशाच काही गुणधर्मांचा अभ्यास करत उष्मागतिशास्त्र ही शाखा निर्माण झाली.

अर्थात वर दिलेले उदाहरण अगदी प्राथमिक आहे. हा अभ्यास पुढे पुढे अर्थातच अधिकाधिक व्यामिश्र होत जातो. या शाखेतला दुसरा नियम — द सेकंड लॉ ऑफ थर्मोडायनॅमिक्स — हा पदार्थविज्ञानातला एक महत्त्वाचा नियम आहे. पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्राच्या सर्व अभ्यासकांना तो माहीत असतो. या निसर्गाच्या नियमामधून आपल्याला जी एक दृष्टी मिळते त्याचा संबंध शिक्षणक्षेत्रासंबंधी अवलंबावयाच्या धोरणांशी आहे, म्हणून या भौतिकशास्त्राच्या नियमाचा आपण इथे विचार करीत आहोत.

उष्णता जेव्हा गरम पदार्थाकडून थंड पदार्थाकडे वाहते, तेव्हा असेही घडू शकते की तिच्या साहाय्याने यांत्रिक कार्य घडू लागते. म्हणजे एखाद्या दट्ट्या (पिस्टन) मागे-पुढे हालू लागतो. एखादे चाक गोल फिरू लागते. वाफेच्या इंजिनात हेच घडते. कोळसा जाळला की उष्णता निर्माण होते. पाणी ती उष्णता घेते आणि त्याचे रूपांतर वाफेत होते. वाफ इंजिनातंला दट्ट्या पुढे-मागे सरकवू लागते व त्यामुळे त्याला जोडलेले एक चाक फिरू लागते. तांत्रिक परिभाषेत बोलायचे तर उष्णता (हीट) यांत्रिककार्यात (मेकॅनिकल वर्कमध्ये) रूपांतरित होते. हे रूपांतर ज्याच्यायोगे होते (म्हणजे उदाहरणार्थ, वाफेचे इंजिन) त्याला 'हीट-इंजिन' असे म्हणतात.

वाफेच्या इंजिनाचा शोध जेम्स वॅटने लावला. वाफेच्या या शक्तीचा शोध हा मानवी इतिहासातील एक अतिशय महत्त्वाचा टप्पा. वाफेच्या इंजिनाचे चाक हातमागाला जोडले गेले आणि यंत्रमाग कापड विणू लागले. त्यातून कापडाच्या गिरण्या निघाल्या आणि कापडाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात निघू लागले. कापडाच्या गिरण्या या यांत्रिक

पद्धतीने प्रचंड उत्पादन काढणाऱ्या पहिल्या गिरण्या. तिथून साऱ्या यांत्रिक प्रगतीची सुरुवात झाली. भांडवलशाहीचा उदय झाला.

वाफेच्या इंजिनाचे चाक पाण्यात फिरू लागले आणि वाफेवर चालणाऱ्या आगबोटीचा जन्म झाला. शिडांच्या साहाय्याने चालणारी जहाजे इतिहासजमा झाली. माणूस अधिक वेगाने आणि आत्मविश्वासाने साता समुद्रांना पार करू लागला. युरोपमधली माणसे आशिया, आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा खंडांवर जाऊन पोचली. साम्राज्यवादाचा उदय आणि विस्तार झाला.

याच वाफेच्या इंजिनाने रुळावर धावत आगगाडीचे डबे ओढायला सुरुवात केली आणि दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांती झाली. पृथ्वीवरची अंतरे आक्रसू लागली.

वाफेच्या इंजिनाने पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रातही एक मोलाची भर घातली. त्याने उष्मागतिशास्त्रातल्या दुसऱ्या नियमाला जन्म दिला. जेम्स वॅटच्या अगदी पहिल्या इंजिनाची क्षमता (एफिशियन्सी) अगदी कमी होती. म्हणजे समजा, एक किलो कोळसा जाळून त्याची सारी उष्णता वापरली, तर फारच थोड्या उष्णतेचे रूपांतर यांत्रिककार्यात होत असे. बाकीची उष्णता फुकट जात असे. या इंजिनात नंतरच्या संशोधकांनी छोट्या-मोठ्या सुधारणा करायला सुरुवात केली. एखादी झडप वाढवली. कुठे दट्ट्यामध्ये फेरफार केले. असे छोटे छोटे बदल. त्यातून त्या इंजिनाच्या क्षमतेत वाढ होऊ लागली.

'कारनॉ' नावाच्या शास्त्रज्ञाला असा प्रश्न पडला की ही क्षमता किती वाढवता येईल? ती अगदी १०० टक्के करता येईल का? या प्रश्नाचा त्याने अगदी शास्त्रशुद्ध अभ्यास केला तेव्हा त्याला उत्तर सापडले की 'नाही! कोणत्याही हीट-इंजिनाची क्षमता १०० टक्के असू शकत नाही.' यातून त्याने जो नियम तयार केला तो असा, 'कोणतेही हीट-इंजिन कोणत्याही उष्णतेच्या साठ्यातून सातत्याने उष्णता घेत राहून तिचे रूपांतर यांत्रिककार्यात करत राहू शकणार नाही.'

हा नियम नंतर अन्य काही प्रकारांनी, वेगळ्या पद्धतींनीसुद्धा लिहिला गेला. त्यातून त्याचे स्वरूप विस्तारत गेले. तो विश्वात घडणाऱ्या साऱ्या घटनांना नियमित करतो असे लक्षात आले. रासायनिक प्रक्रियांशी, अंतराळातील घटनांशी, कृष्ण-विवरासारख्या संकल्पनांशी, पदार्थविज्ञानाच्या दृष्टीने 'काळा'ची संकल्पना समजून घेण्याशी अशा अनेक गोष्टींशी त्याचा संबंध आहे. त्याचे स्वरूप विस्तारत गेले पण त्याच्या मूलभूत स्वरूपात फरक पडला नाही. (जाता जाता : हा नियम जर निसर्गात नसता तर मानवजातीला ऊर्जेच्या प्रश्नाने कधीच भेडसावले नसते.) असो! या नियमाच्या अभ्यासातून समाजशास्त्राविषयीसुद्धा एक नवी जाण येते. काही महत्त्वाचे निष्कर्ष हाती येतात. आत्ताच्या आपल्या चर्चेच्या संदर्भात सांगायचे तर शिक्षणक्षेत्रात

अवलंबावयाच्या काही धोरणांवर हा नियम प्रकाश टाकतो.

या नियमाचा अर्थ असा की कोणत्याही हीट-इंजिनची क्षमता १०० टक्के असू शकत नाही. प्रत्यक्षात ती किती असते? ४०टक्के, ५०टक्के! आपली मोटरकार हेसुद्धा एक हीट-इंजिन आहे. पेट्रोल किंवा डिझेल जळते. त्यातून उष्णता निर्माण होते. त्यामुळे मोटारीला गती मिळते. म्हणजे उष्णतेचे यांत्रिककार्यात रूपांतर होते. आता वर जो दुसरा नियम आपण बघितला त्याचा साध्या शब्दांत अर्थ काय होतो? जेव्हा मोटारीत १० लिटर पेट्रोल जाळले जाते तेव्हा त्यातील ५ लिटर पेट्रोलचाच उपयोग होतो आणि ५ लिटर पेट्रोल फुकट जळते. त्यापासून लाभ होत नाही. हा निसर्गाचा नियम आहे. ५ लिटरऐवजी थोड्या जास्त पेट्रोलच्या जळण्यापासून लाभ मिळवता येईल. पण फार मोठा फरक पडणार नाही. निसर्गाचा नियम डावलणारी मोटार (किंवा अन्य कोणतेही हीट-इंजिन) आपण बनवू शकणार नाही.

आता समजा जर कोणी तंत्रज्ञ म्हणू लागला, की 'ज्या ५ लिटर पेट्रोलच्या जळण्यापासून लाभ होतो आहे, तेवढेच नेमके वेचून काढून मी ते वापरेन आणि फुकट जळणारे ५ लिटर पेट्रोल मोटारीत टाकणारच नाही.' तर त्याचा अर्थ काय असेल? तो एक असंभाव्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करीत असेल. निसर्गाचा नियम डावलण्याचा तो प्रकार असेल. तो यशस्वी होणारच नाही.

समाजशास्त्राचा विचार करतानासुद्धा ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कोणत्याही गोष्टीसाठी केलेले प्रयत्न, त्यासाठी केलेला खर्च आणि त्यापासून मिळणारा अंतिम लाभ याचे एक गुणोत्तर ठरलेले आहे. प्रयत्न आणि खर्च यांचा काही भाग हा वाया जाणे हे अपरिहार्य असते. यांत्रिक जगात कदाचित हे गुणोत्तर — म्हणजे कार्यक्षमता — जास्त चांगले आणि जास्त फायदेशीर असू शकेल. पण माणसांच्या जगात, समाजात, ते तितके चांगले आणि फायदेशीर ठेवणे कठीण आहे. शंभर टक्के कार्यक्षमता मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हीट-इंजिनचे कार्य बंद करणे! शून्य इंधन जळले, शून्य यांत्रिक कार्य झाले! (झिरो इनपुट, झिरो आउटपुट. म्हणून इनपुट = आउटपुट)

याचा संबंध शिक्षणक्षेत्रातील धोरणांशी कसा येतो? शिक्षणासंबंधी एक विचार बऱ्याचदा मांडला जातो. सर्वांना शिकवण्याची काय जरुरी आहे? आपल्या प्रचंड देशात जिथे लोकसंख्या इतकी बेसुमार वाढली आहे, तिथे सर्वांना शिकवण्याचे अभियान हाती घेणे म्हणजे किती पैसे आणि साधनसामग्री लागेल. किती श्रम आणि वेळ यांचा खर्च होईल. आणि त्याचा फायदा काय? सर्वांना त्या शिक्षणाचा थोडाच फायदा होणार आहे? शिक्षणासाठी उत्तम बुद्धिमत्ता लागते; अभ्यासूवृत्ती लागते. ती सर्वांकडे नसते.

त्यापेक्षा असे करावे की समाजात असलेली अत्यंत हुशार मुले लहानपणीच

निवडावीत. ती अगदी खेड्यापाड्यांतून, गरीबवर्गातून, झोपडपट्ट्यांमधूनही निवडावीत. त्यांच्यावर लक्ष केंद्रित करावे. बाकीच्यांना लिहिता-वाचता येईल, थोडेफार अंकगणित वगैरे येईल इतपत शिकवले की झाले! या मुलांना मात्र उत्तम दर्जाचे शिक्षण द्यावे. त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. त्यांच्यातून उद्याचे शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, इतिहाससंशोधक, डॉक्टर, वकील, इंजिनियर वगैरे तयार होतील. समाजाची गरज पूर्ण होईल आणि शिक्षणावर जो पैसा खर्च केला जाईल त्याचा पुरेपूर लाभ पदरात पडेल.

हे म्हणजे, ज्या ५ लिटर पेट्रोलमुळे मोटारीला गती मिळते, तेवढे पेट्रोल वेचून काढावे असे म्हणण्यासारखे झाले! असे करता येत नाही. असे घडू शकत नाही. यांत्रिक जगतातही ते अशक्य आहे आणि माणसांच्या जगातही ते चुकीचे आहे.

याचे कारण काय? वर दिलेली विचारधारा अगदी तर्कसुसंगत वाटते. सहज शक्य वाटते. पण त्यात पहिल्याच पायरीला एक मोठी अडचण आहे. समाजात असलेली अत्यंत हुशार आणि अभ्यासू मुले लहानपणीच निवडणार कशी? आणि कोण? हे करताच येणार नाही.

अशा गोष्टींसाठी काही चाचण्या वगैरे सध्या उपलब्ध आहेत. पण त्यातून १०० टक्के विश्वासार्ह असे निष्कर्ष मिळत नसतात. शिवाय त्या चाचण्या बनवणे, त्याला मुलांनी दिलेल्या उत्तरांचे अर्थ लावणे वगैरे गोष्टी शेवटी माणसेच करतात. ती कितीही तज्ज्ञ आहेत असे मानले, तरी त्यांना मर्यादा आहेत. मानवी भावभावना, राग-लोभ आणि मोह यांपासून ही सारी माणसे संपूर्णत: मुक्त असू शकणार नाहीत. मग त्यातून विकृती निर्माण होतील, ज्यांची परिणती फार भयानक असेल. फक्त ती लक्षात येण्यासाठी बराच काळ जावा लागेल.

यासाठी एक उदाहरण तर उपलब्ध आहे. आणि ते आपल्याच समाजात, आपल्याच इतिहासात आहे. जातिव्यवस्था निर्माण होण्यामागची विचारधारा काय होती? लोहाराच्या घरात जन्माला आलेला मुलगा लहानपणापासून लोहार-कामासाठी आवश्यक असलेली कौशल्ये बघत बघतच मोठा होत असतो. मग त्याला लोहार-काम शिकवणे जास्त सयुक्तिक आहे. ब्राह्मणाच्या घरात जन्माला आलेल्या मुलाच्या कानावर लहानपणापासून वेद-सुक्ते पडत असतात. म्हणून त्याला तेच ज्ञान द्यावे. चांभाराच्या मुलाला कातडी कमावण्याचे बाळकडू मिळते. त्या कामाबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण झालेली नसते. त्यामुळे त्याने ते काम शिकावे. किती सरळ सोपा तर्क!

लोहाराच्या मुलाला जर वेद-विद्या शिकवायची म्हटले, तर त्यासाठी अधिक श्रम करावे लागतील आणि ब्राह्मणाच्या मुलाला लोहार-काम शिकावेसे वाटले, तर ते

जास्त कष्टाचे, श्रमाचे असेल. तेव्हा शिक्षणासाठी समाजाने खर्च करायचा पैसा आणि श्रम कमीतकमी खर्च करून तत्कालीन समाजाच्या साऱ्या गरजा भागवणारी ही समाजव्यवस्था होती. त्यात चुकीचे काय होते?

त्यात चुकीचे काय होते, हे आज आपल्याला कळते आहे. या जातिव्यवस्थेत कुचंबलेला आपला समाज जेव्हा एका अंधारयुगात लोटला गेला; जेव्हा इथल्या अगणित बुद्धिमान मुलांच्या फुलण्याला वाव शिल्लक राहिला नाही; जेव्हा इथले असंख्य तरुण एकलव्य आपले अंगठे या समाजव्यवस्थेला दान करून निमूटपणे विस्मृतीत विलीन झाले आणि जेव्हा एकेकाळी जगात प्रगतिपथावर असलेला आपला समाज पार पिछाडीला पोचला तेव्हा आज आपल्याला कळते आहे, की यात काय चुकले होते. त्यासाठी एवढ्या पिढ्या बरबाद व्हाव्या लागल्या. इतिहासाची एवढी पाने उलटून जावी लागली! जातिव्यवस्थेच्या निर्मितीची विचारसरणी उष्मागतिशास्त्राच्या दुसऱ्या नियमाच्या विरुद्ध होती. कारण दुसरा नियम असे सांगत नाही की हीट-इंजिनाची कार्यक्षमता वाढवता येणार नाही. किंबहुना त्यासाठी कोणता घटक महत्त्वाचा आहे आणि कार्यक्षमतेची मर्यादा किती असू शकते, हेच हा नियम सांगतो.

पण एक निश्चित. जळणाऱ्या इंधनाचे प्रमाण कमी करून कार्यक्षमता वाढवता येत नाही असे हा नियम सांगतो. इनपुट कमी केला तर तेवढ्याच प्रमाणात आउटपुट कमी होणार!

जगाच्या इतिहासातही याची कितीतरी उदाहरणे आहेत. शिक्षणाच्या आणि उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत्या म्हणून अनेक प्रतिभावंत पुढे मानवजातीच्या संस्कृतीला आपले योगदान करू शकले. किंबहुना शाळा-महाविद्यालयांत न चमकलेले कितीतरी जण पुढे महान झाले आहेत. आइनस्टाईनचे नाव याबाबतीत सर्वांना ठाऊक आहे. कार्व्हर आहे. आपल्याकडचे अब्दुल कलाम आहेत. ही यादी कितीतरी वाढवता येईल आणि ही गोष्ट फक्त असे शिखर गाठणाऱ्या प्रतिभावंतांच्या बाबतीतच खरी आहे असे नव्हे. आपल्या रोजच्या आयुष्यातही अशा अनेक व्यक्ती भेटतात की ज्या शाळा किंवा महाविद्यालयांत चमकत नाहीत. परीक्षेच्या चढाओढीत फार पुढे नसतात. पण त्याच शिक्षणाच्या आधाराने पुढील आयुष्यात कर्तृत्व गाजवतात.

तात्पर्य, शिक्षण बुद्धिमान आणि हुशार मुलांपुरते मर्यादित ठेवण्याचे धोरण घातक आहे. उच्च शिक्षणाच्या संधी परीक्षेत अत्युच्च हुशारी दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांपुरत्याच मर्यादित ठेवण्याचे धोरण घातक आहे. यात ताबडतोब दृष्टीस पडणारा लाभ हा की शिक्षणावर खर्च करावा लागणारा पैसा कमी कमी होत जाईल. त्या वेळी स्वत:ला

फसवणारा आभास हा असेल की तरीदेखील शिक्षणक्षेत्रापासून समाजाला मिळणारा लाभ हा कमी झालेला नसेल, किंबहुना वाढलेलाच असेल. त्यामुळे कार्यक्षमता वाढलेली असेल. पण वस्तुस्थिती ही असेल की यातून समाजाचे अधिकाधिक नुकसान होत जाईल आणि ते लक्षात येईपर्यंत खूप काळ हातातून निसटलेला असेल.

याचा अर्थ असा आहे काय की शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढवण्याचा विचार करू नये? खर्च होणाऱ्या पैशातून अधिकाधिक लाभ कसा मिळेल, याचा विचारच करू नये? पैसा वाया जात असेल, उधळपट्टी होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करावे? बिलकूल नाही! उष्मागतिशास्त्राचा दुसरा नियमही असे सांगत नाही. किंबहुना या नियमातून हीट-इंजिनच्या कार्यक्षमतेची मर्यादा कळत असली तरी कार्यक्षमता वाढवण्यासाठी नेमके काय करावे; प्रयत्न कोणत्या दिशेने असावेत हेदेखील कळते. त्याचा वापर करूनच अधिकाधिक कार्यक्षम हीट-इंजिन्स नंतर बनवली गेली. कारनॉने जेव्हा हीट-इंजिन्सच्या कार्यक्षमतेसंबंधी अभ्यास करून उष्मागतिशास्त्रातला दुसरा नियम मांडला; त्या काळापेक्षा आजची हीट-इंजिन्स कितीतरी पटीने कार्यक्षम आहेत. याचे कारण कार्यक्षमता वाढवण्यासाठी काय करावे आणि काय करू नये याची जाण या दुसऱ्या नियमामुळे शास्त्रज्ञांना आली आहे.

आज जागतिकीकरणाच्या जमान्यात, जीवघेण्या स्पर्धेच्या जमान्यात कार्यक्षमता वाढवणे आत्यंतिक गरजेचे आहे यात शंका नाही. पण यासाठी धोरणे काळजीपूर्वक ठरवली पाहिजेत. विशेषत: शिक्षणक्षेत्रात! कारण इथे चुकीच्या धोरणाचे आभासात्मक फायदे ताबडतोब दिसतात, पण त्याचे दुष्परिणाम कळायला वेळ लागतो आणि कधी कधी त्यातून अपरिवर्तनीय नुकसान होऊ शकते.

एक उदाहरण बघा. मध्यंतरी महाराष्ट्र सरकारने एक निर्णय घेतला, 'ज्या शाळांचा निकाल शून्य टक्के लागतो, त्या शाळांचे अनुदान बंद करणार!' इनपुट कमी करून कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न कसा केला जातो त्याचे हे लक्षात घेण्याजोगे उदाहरण आहे! अनुदान बंद केले म्हणजे इनपुट कमी झाला. शाळेचा निकाल शून्य टक्के होता, म्हणजे आउटपुटमध्ये फरक पडला नाही. तो तेवढाच राहिला. परिणामी कार्यक्षमता वाढली! हिशोबाचे गणित अगदी सोपे आणि सरळ आहे. पण प्रत्यक्षात परिणाम काय होऊ शकतो?

शून्य टक्के निकाल लागलेल्या शाळा या खेड्यापाड्यांत, दुर्गम भागात असणार हे उघड आहे. अनुदान बंद झाल्यावर या शाळा चालवण्याची क्षमता तिथल्या लोकांमध्ये नसणार. किंबहुना त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहीत नसणार. आपल्या वस्तीत शाळा असावी अशी त्यांची खास इच्छाही नसणार. परिणामी अशा शाळा बंद पडणार. त्या भागात एकदा अशी गोष्ट घडलेली असली की तिथे नवी शाळा

नजीकच्या भविष्यकाळात निघणार नाही. म्हणजे तिथे वाढणाऱ्या मुलांना शिक्षणाची संधी नाकारली जाणार. त्या खेड्यापाड्यांत जन्माला आलेली बुद्धिमान मुलेही शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर फेकली जाणार. यात समाजाचा फायदा आहे की नुकसान? शिक्षणक्षेत्रापासून होणारा लाभ अंतिमत: वाढेल की कमी होईल?

काय करता येईल? अशा शाळांची माहिती गोळा करून प्रसिद्ध करता येईल. या प्रश्नावर चर्चा घडवून आणता येईल. सामाजिक संस्थांना त्यात सामील करून घेता येईल. अशा शाळांची गुणवत्ता वाढावी म्हणून अशा संस्थांचे कार्यकर्ते तिथे जाऊन काम करू शकतील. या शाळांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांची चौकशी करता येईल. शून्य टक्के निकाल शिक्षकांच्या हलगर्जीपणामुळे आहे की त्या भागातल्या सामाजिक परिस्थितीमुळे आहे हे पाहता येईल. शिक्षकांचा हलगर्जीपणा असेल, तर त्यांच्या वेतनवाढी थांबवता येतील. त्यांना नोकरीतून काढताही येईल. पण असे उपाय केले तर त्या शाळा जिवंत राहतील, त्यांचा दर्जा सुधारेल. परिणामी शिक्षणक्षेत्रातला आउटपुट वाढेल.

मात्र यातले काहीही करायचे झाले तरी त्यासाठी खर्च करावा लागेल. प्रयत्न करावे लागतील. इनपुट वाढवावा लागेल आणि त्यातून मिळणारा गुणात्मक फायदा काही लगेच मिळणार नाही. त्यासाठी काळ जावा लागेल. म्हणजे ताबडतोबीचे चित्र असे असेल की इनपुट वाढलेला असेल व आउटपुट तेवढाच असेल. गणिती समीकरणाच्या दृष्टीने कार्यक्षमता कमी झाली! पण प्रत्यक्षात शिक्षणक्षेत्रातली कार्यक्षमता याच पद्धतीने वाढू शकते.

जागतिकीकरणाच्या काळात कार्यक्षमता वाढवण्याच्या नावाखाली इनपुट कमी करण्याचे हे धोरण हळूहळू इथे मान्यता पावते आहे. ते विविध प्रकारांनी मांडले जाते आहे. शिक्षणविषयक धोरण ठरवणारी सरकारी अधिकारी मंडळी आणि काही नेते मंडळी या धोरणांचा उच्चार करीत आहेत. याचा गंभीरपणे प्रतिवाद केला नाही, तर ही धोरणे अमलात येण्याचा काळ दूर असणार नाही. उदाहरणार्थ, शून्य टक्के निकाल असणाऱ्या शाळांचे अनुदान बंद करायचे असेल, तर एक किंवा दोन टक्के निकाल लागणाऱ्या शाळांचा अपवाद का करावा? तो निकालही तितकाच वाईट आहे व हा नियम तिथेही लागला पाहिजे. किंबहुना शिक्षणक्षेत्रात कोणत्याही विषयात उत्तीर्ण होण्याचा निकष किमान ३३ टक्के गुणांचा असतो. म्हणून त्यापेक्षा कमी टक्केवारी असलेल्या शाळा अनुत्तीर्ण ठरवाव्यात व अनुत्तीर्ण शाळांना अनुदान देऊ नये असे या धोरणाचे अंतिम स्वरूप असू शकते! (शिवाय गुणवत्ता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी शाळांना उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली ही टक्केवारी भविष्यात वाढवता येईल!)

महाविद्यालयांना त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी 'विद्यापीठ अनुदान आयोग' अनुदान देत असते. तिथेदेखील महाविद्यालयांची काही निकषाच्या आधारावर वर्गवारी करावी आणि पुरेशी गुणवत्ता नसलेल्या महाविद्यालयांचे अनुदान बंद करावे अशी कल्पना मूळ धरते आहे. गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याचे धोरण समजू शकते. ते योग्यच आहे. पण त्याचा मार्ग कमी गुणवत्ता दाखवणाऱ्यांना शिक्षा देणे हा नव्हे!

प्रश्न असा आहे की या सर्व धोरणांचा परिणाम म्हणजे शिक्षणाच्या आणि उच्च शिक्षणाच्या सोयी फक्त शहरात आणि पुढारलेल्या वस्तीच्या विभागात शिल्लक राहतील. तिथे विकसित होत राहतील. अन्य सर्व ठिकाणी त्या दुर्मीळ आणि कठीण होत जातील. त्यातून शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढणार नाही, तर माणसाच्या अंगभूत गुणांना आणि सामर्थ्याला फुलण्यासाठी दिशा दाखवणे हे जे शिक्षणाचे मूलभूत कार्य आहे त्यापासून आपल्या समाजातील अनेक बुद्धिमान मुले वंचित राहण्याचे युग परत सुरू होईल. निदान शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशाने अशा प्रकारे इनपुट कमी करण्याचे निर्णय घेणे हे अशास्त्रीय आहे. उष्मागतिशास्त्राच्या दुसऱ्या नियमाच्या हे विरोधी आहे.

मग कार्यक्षमता वाढवण्यासाठी काय करावे लागेल? आउटपुटवर लक्ष केंद्रित करावे लागेल. शिक्षणक्षेत्रात असणाऱ्या महत्त्वाच्या घटकांकडे लक्ष द्यावे लागेल. यातल्या प्रत्येक गोष्टीसाठी अधिक पैसा खर्च करण्याची आवश्यकता आहेच असे नाही. फार परिश्रम करण्याची जरुरी आहेच असे नाही. फक्त दृष्टिकोनात काही फरक करावे लागतील.

पहिली गोष्ट म्हणजे शिक्षणक्षेत्रातला सर्वांत महत्त्वाचा घटक कोणता? तर तो म्हणजे शिक्षक! ही गोष्ट म्हणजे खरे तर अगदी बाळबोध सत्य आहे. शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढवायची तर प्रथम शिक्षकावर लक्ष केंद्रित करावे लागेल. मग ते शालेय शिक्षण असो की उच्च शिक्षण असो. उत्तम बांधलेल्या चकाचक इमारती, तिथे असलेल्या आधुनिक सुविधा, प्रयोगशाळेत असलेली महागडी उपकरणे यांचे महत्त्व आहे. नाही असे नाही. पण ते मर्यादित आहे. खरे महत्त्व आहे ते शिक्षकाला! चांगल्या सुविधा असतील तर उत्तम शिक्षक पहिल्या दर्जाचे शिक्षण देईल. त्या नसतील तर दुय्यम दर्जाचे शिक्षण देईल. पण शिक्षक चांगला नसेल तर कितीही चांगल्या सुविधा असल्या तरी तो दुय्यम दर्जाचेच शिक्षण देणार. त्याचा उपयोग शून्य आणि त्या सुविधांवर आणि उपकरणांवर केलेला खर्च वाया जाणार. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात कार्यक्षमता वाढवायची तर पहिले लक्ष केंद्रित केले पाहिजे शिक्षकांवर.

त्यासाठी काय करावे लागेल? पहिली गरज आहे ती विश्वास टाकण्याची. प्रोत्साहन देण्याची. समाजाने हे मान्य करण्याची व मोकळेपणाने मोठ्याने सांगण्याची

गरज आहे की 'शिक्षणाच्या क्षेत्रात आपण देदीप्यमान यश मिळवले आहे. आपले विद्यार्थी अत्यंत स्पर्धाशील आणि प्रगत समाजातही यशस्वी ठरत आहेत. प्रचंड संख्येने परदेशात जाणारे विद्यार्थी निरपवादपणे यशस्वी होत आहेत आणि याचे श्रेय शिक्षकांना आहे. आपले शिक्षक मुळात अतिशय चांगले आहेत. अनेकदा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही ते अत्यंत उत्तम रिझल्ट देत आहेत.' दुर्दैवाने असे घडत नाही. शिक्षकांना त्यांच्या कार्याचे श्रेय मोकळेपणाने दिले जात नांही. उलट त्यांचा अवसानघात करण्याचे प्रमाण वाढत आहे.

कोणत्याही क्षेत्रात १०० टक्के चांगली माणसे मिळणारच नाहीत. पण त्यांचे प्रमाण वाढवता येईल. असलेल्यांना चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहित करता येईल आणि त्यासाठी पहिली आवश्यकता ही आहे — ज्यासाठी अधिक पैसे खर्चावे लागणार नाहीत — की शिक्षकांबद्दल आदराने बोलले पाहिजे. त्यांच्या कामाचे महत्त्व जाणले पाहिजे. 'सगळे शिक्षक कामचुकार आणि सामान्य दर्जाचे आहेत व त्यांच्यात काही चांगले आहेत' असे न म्हणता याउलट म्हटले पाहिजे. समाजाने हे व्रत स्वीकारले तर जादू केल्यासारखा परिणाम होईल. शिक्षक अधिक जीव तोडून काम करू लागतील.

अर्थात ही सुरुवात आहे. पण तेवढे पुरेसे नाही. अशा कौतुकाच्या शब्दांबरोबरच काही ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आज महाराष्ट्रासारख्या राज्यात शाळेतल्या नव्या शिक्षकांना 'शिक्षणसेवक' या नावाखाली कंत्राटी पद्धतीने नेमण्याची पद्धत सुरू झाली आहे. तेही अत्यंत कमी पगारावर. किती कमी? तर शाळेतल्या शिपायापेक्षा शिक्षकांचे पगार कमी आहेत. महाविद्यालयांत आणि विद्यापीठांत शिक्षकांच्या रिकाम्या जागा भरणे अधिकाअधिक कठीण होत आहे. खाजगी महाविद्यालये शिक्षकांच्या जागा रिकाम्या ठेऊन पैसे वाचवीत आहेत. शाळा-महाविद्यालयांत शिक्षकांचे महत्त्व जाणण्याचे हे लक्षण नव्हे.

शिक्षक हा शिकवण्याच्या क्षेत्रात सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. पण अनुदानित शाळा-महाविद्यालयांच्या बाबतीत सरकारची भूमिका काय, किंवा खाजगी शाळा-महाविद्यालयांच्या बाबतीत व्यवस्थापनाची भूमिका काय, दोन्हीकडे शिक्षकांच्या जागा भरण्यावर, त्यांना पगार देण्यावर आणि पगार दिलेच तर ते वेळेवर देण्यावर गदा येत आहे. या सर्व गोष्टी शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढवण्याला घातक आहेत. यातून पैसे वाचल्यासारखे वाटत असतील. पण प्रत्यक्षात अशा धोरणांमुळे जे वातावरण तयार होते; शिक्षकवर्गाच्या मनोधैर्यावर जो विपरीत परिणाम होतो, त्यामुळे शिक्षणामधून मिळणाऱ्या आउटपुटची गुणवत्ता कमी कमी होत जाते. जो पैसा या क्षेत्रावर खर्च केला जातो आहे, त्यापासून समाजाला मिळणारा लाभ कमी कमी होत

जातो. शिक्षकांवर खर्च करण्याच्या पैशात विचारहीनतेने कपात करीत जाणे म्हणजे 'पेनी वाईज, पाउंड फुलीश' या इंग्रजी म्हणीचे उत्तम उदाहरण आहे. थोडा पैसा वाचतो आणि त्यातून अधिक खर्च होणारा पैसा कमी कमी लाभ देऊ लागतो.

शिक्षकांची साधारण पाच वर्षांच्या नियत कालावधीसाठी नेमणूक करणे ही कल्पना वाईट नाही. विशेषत: उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात. त्यातून या क्षेत्रात जे चलनवलन होत राहील; नवे ज्ञान, नवे अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचा मार्ग मोकळा होईल. त्याचा या क्षेत्राला खूप फायदा होईल. हे क्षेत्र कुचंबलेल्या अवस्थेत राहणार नाही. मात्र त्यासाठी देण्यात येणाऱ्या पगाराची रक्कम तुटपुंजी असून चालणार नाही. बाहेरच्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी इथे येण्यास तयार होतील, इतपत ती रक्कम चांगली असायला हवी. तसेच पाच वर्षे शिक्षणक्षेत्रात काम करून बाहेर जाणाऱ्यांना मानाने कुठेही कामावर घेतले जाईल अशी परिस्थिती हवी. शिक्षकांवर आवश्यक तो खर्च करणे हा शिक्षणक्षेत्रातील गुणवत्ता सुधारण्याचा पहिला मार्ग आहे.

खर्च वाचवण्यासाठी उपाय जरूर करावेत. अशा गोष्टी शक्यही आहेत. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अशा अनेक गोष्टी सांगता येतील. अत्यंत कमी विद्यार्थी असलेल्या विषयांची विविध ठिकाणी विखुरलेली केंद्रे एका ठिकाणी आणता येतील. यातून खर्च वाचेल आणि तो विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकत्रितपणे जास्त असल्यामुळे शैक्षणिक वातावरण सुधारेल. (मात्र असे करताना विद्यार्थिसंख्या कमी असल्याच्या कारणामुळे बाजारामधील मागणीच्या दृष्टीने कमकुवत, पण समाजाला महत्त्वाच्या असणाऱ्या विषयांचे शिक्षण बंद पडणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.) विविध शैक्षणिक संस्थांतील वाचनालयांचा एकेमकांशी संपर्क ठेऊन महत्त्वाची पुस्तके आणि संशोधनपर नियतकालिके यांची देवाणघेवाण करता येईल. संशोधनासाठी आणि विद्यार्थ्यांच्या नियत अभ्यासक्रमात प्रयोग शिकवण्यासाठीही लागणारी महागडी उपकरणे आपापसात सहयोग करून वापरता येतील. त्यामुळे अशी उपकरणे स्वतंत्रपणे प्रत्येक संस्थेने विकत घेण्याचा खर्च वाचेल. 'सिम्युलेशन'चे नवे तंत्र वापरून संगणकाच्या साहाय्याने काही प्रयोग शिकवता येतील. शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची किती आवश्यकता आहे, याचा काळजीपूर्वक आढावा घेऊन त्यांच्या संख्येवर नियंत्रण आणता येईल. अशा गोष्टींमधून खर्चामध्ये बचत होईल आणि शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होणार नाही. शिक्षणक्षेत्राची कार्यक्षमता वाढवायची तर या क्षेत्राकडून कोणत्या अपेक्षा ठेवायच्या याची नेमकी जाणीव ठेवली पाहिजे. त्या अपेक्षा पूर्ण होतील या दिशेने पावले टाकली पाहिजेत व चुकीच्या आणि अवास्तव अपेक्षांचे ओझे या क्षेत्रावर टाकण्याचे टाळले पाहिजे.

शिक्षणाने विद्यार्थ्यांना जगण्यासाठी सक्षम बनवले पाहिजे ही या क्षेत्राकडून अपेक्षा

आहे आणि ती योग्य आहे. जे शिकवले जाते त्याचा व्यवहाराशी संबंध हवा. सामाजिक जीवनाशी संबंध हवा. त्यातून विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळण्याची, कामधंदा करण्याची क्षमता यायला हवी. यासाठी अभ्यासक्रम सतत अद्ययावत व्हायला हवेत. अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया असायला हवी. मात्र हे करीत असताना शिक्षणक्षेत्रावर अवास्तव अपेक्षांचे ओझे नको. चुकीच्या कल्पनांमधून होणारे आरोप नकोत.

उदाहरणार्थ, आज शिक्षणक्षेत्रावर एक आरोप केला जातो. आजचे शिक्षण कुचकामी आहे. ते शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतात कुठे? आजचे शिक्षण निव्वळ बेकारांची फौज निर्माण करीत आहे. आता यातली जी अपेक्षा आहे की शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी नोकरी करण्यासाठी आणि कामधंदा मिळवण्यासाठी समक्ष व्हावे, ती योग्य आहे. पण शिक्षणानेच विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून द्याव्यात ही जी अपेक्षा या आरोपात आहे, ती चुकीची आहे! शिक्षण विद्यार्थ्यांना सक्षम करू शकेल पण नोकऱ्या देण्याचे काम अर्थव्यवस्थेचे आहे. अर्थव्यवस्था समर्थ असेल, त्यात नोकऱ्यांची संख्या वाढती असेल, तर मग त्या अर्थव्यवस्थेच्या किंवा तिथल्या कारखान्यांच्या आणि उद्योगधंद्यांच्या मागण्या शिक्षणक्षेत्रातले अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत की नाहीत हा प्रश्न योग्य ठरतो.

पण जेव्हा एकूणच बाजारातील नोकऱ्यांची संख्या कमी होण्याचा काळ असतो; जेव्हा अनेक वर्षे नोकऱ्या करणारे, उद्योगधंद्यात काम करणारे लोक सरळ किंवा आडमार्गाने दिलेल्या सक्तीच्या 'ऐच्छिक' सेवानिवृत्तीमुळे घरी बसवले जाण्याचा काळ असतो; जेव्हा नवीन नोकरभरती केली जाणार नाही असे धोरण सरकारने, बँकांनी आणि अशाच सर्व आस्थापनांनी जाहीर केलेले असते तेव्हा नोकऱ्या न मिळण्याची जबाबदारी कोणाची? अर्थव्यवस्थेची की शिक्षणक्षेत्रातील उणिवांची? ही गोष्ट लक्षात घेतली नाही तर जी चर्चा अर्थव्यवस्थेच्या त्रुटींवर व्हायला पाहिजे ती निष्कारण शिक्षणक्षेत्राच्या दिशेने घसरते.

अर्थव्यवस्थेत नोकऱ्यांचा दुष्काळ पडलेला असताना विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्याची जणू जबाबदारीच शिक्षणक्षेत्राची आहे, असे मानले की त्यातून काही चुकीच्या धोरणांचा जन्म होऊ शकतो. तशा शक्यता आत्ताच दृष्टीस येऊ लागल्या आहेत. अभ्यासक्रम अद्ययावत ठेवण्याचे धोरण वेगळे आणि नोकऱ्यांचे नवे क्षेत्र उदयाला आले की लगेच त्याचा अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना प्रवेश देणे वेगळे. अद्ययावत शिक्षणक्रमातून विद्यार्थी एका विषयात सक्षम होईल. त्यातून त्या विषयाशी संबंधित अशी जी जी क्षेत्रे आज अस्तित्वात आहेत, किंवा उद्या निर्माण होतील, तिथे तो काम करू शकेल. विवक्षित कामांसाठी जी कौशल्ये अपेक्षित आहेत ती त्याला शिकावी

लागतीलही. कदाचित भविष्यकाळात अशा प्रकारे कौशल्ये शिकण्याचे काम आयुष्यभर निरंतर करीत राहावे लागेल. पण त्यासाठी मुळात काही विषयांचे रीतसर शिक्षण घेऊन पाया मजबूत करावा लागेल. ते काम शिक्षणक्षेत्राने करायचे आहे.

पण भीती अशी आहे की शिक्षणक्षेत्राचे कार्य हे फक्त अशी विवक्षित कौशल्ये शिकवण्याचे आहे, असे आपल्याकडे सर्वसंमत होऊन बसेल आणि मजबूत पाया निर्माण करण्याचे मागे पडेल. किंबहुना बऱ्याच कमतरता असूनही आणि सुधारणांना बराच वाव असूनही काही विषयांचे रीतसर शिक्षण देऊन पाया मजबूत करण्याचे कार्य आपल्या शिक्षणव्यवस्थेत खूपच यशस्वीपणे केले जाते असे दिसते. कारण ज्या पाश्चात्त्य देशांच्या अर्थव्यवस्थेत आजही नोकऱ्या उपलब्ध होत आहेत, तिथे आपल्या तरुणांनी लक्षणीय कामगिरी केली आहे. त्या नोकऱ्यांसाठी आवश्यक असणारी विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्यात त्यांनी यश मिळवले आहे. याचा परिणाम इतका आहे की भारतीय तरुणांना नोकऱ्या देण्याच्या धोरणाच्या विरोधात आता तिथे चळवळी उभ्या राहू लागल्या आहेत.

पण भीती अशी आहे की, काही चुकीच्या कल्पनांच्या प्रभावांमुळे आपल्या शिक्षणव्यवस्थेचे हे पाया मजबूत करण्याचे सामर्थ्य आपण गमावून बसू. गावातल्या बाजारपेठेत काही दुकाने अशी असतात की मोसमाप्रमाणे ती आपली स्वरूपे बदलत राहतात. गणपती जवळ आले की मखराचे सामान विकतात. दिवाळी आली की फटाके विकतात आणि आंब्याचा मोसम आला की तिथे आंब्याची अढी लागते. आपल्याकडच्या शिक्षणसंस्थांचे स्वरूप अजूनपर्यंत असे झालेले नाही. पण ते तसे होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. कारण ते पाऊल कार्यक्षमता कमी करणारे असेल. आपल्याच हाताने आपले सामर्थ्य कमी करणारे असेल.

शिक्षणक्षेत्राकडून आणखी दोन अपेक्षा आहेत. यातली पहिली ही आहे की शिक्षणातून विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्याची शक्ती लाभावी. इथे मात्र आपला पूर्ण पराभव आहे. किंबहुना विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती खच्ची करण्याचे कामच आपल्या शिक्षणव्यवस्थेत होत असते! अगदी शालेय शिक्षणापासून. कारण आपल्याकडे शिक्षणव्यवस्थेत सर्वांत महत्त्व आहे ते परीक्षेतील गुणांना आणि त्यासाठी सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे ठरावीक प्रश्नांची ठरलेली उत्तरे नेमक्या शब्दात लिहिण्याची सवय करणे. अशी उत्तरे नुसती घोकंपट्टी करून तयार केली की झाले! त्यासाठी ती उत्तरे विद्यार्थ्याने स्वत:च्या शब्दांत लिहिण्याचा प्रयत्नही करायला नको. किंबहुना असा प्रयत्न केला तर परीक्षेत गुण कमी मिळण्याची शक्यताच अधिक. म्हणून ठरावीक पद्धतीने विचार करणे; ठरावीक शब्दात आणि भाषेत ते मांडणे यालाच आपल्या शिक्षणपद्धतीत महत्त्व आहे.

मुळात आपल्या संस्कृतीत घोकंपट्टीला महत्त्व अपरंपार. वेद, उपनिषदे, महाकाव्ये ही आपल्या समाजाने पिढ्यान्‌पिढ्या हजारो वर्षे टिकवून ठेवली; ती केवळ ते सारे ज्ञान मुखोद्‌गत करण्याच्या पद्धतीने. ही गोष्ट अभिमानास्पद आहे. पण त्यामुळे घोकंपट्टीला शिक्षणाच्या क्षेत्रात अवाजवी महत्त्व निर्माण झाले, हेदेखील सत्य आहे. शिवाय 'श्रुती-स्मृती पुराणोक्त' अशा मानसिकतेत असलेल्या आपल्या समाजाला नव्या विचारांचे स्वागत करण्याची सवय नाही. ठरलेल्या वाटेवरून साचेबद्ध पद्धतीने विचार करणे आपल्याला जमते. अशा प्रकारे चाकोरीतल्या विचारांचेच या समाजात स्वागत होते. वेगळी वाट चोखाळण्यासाठी, वेगळ्या दिशेने विचार करण्यासाठीही एक मानसिक धैर्य लागते. ते आपल्याकडे अस्तित्वात नाही.

समाजातले हे दोन्ही गुण-विशेष आपल्या शिक्षणव्यवस्थेत आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करायला शिकवण्यात आपली शिक्षणव्यवस्था संपूर्ण अपयशी ठरली आहे आणि त्याची संपूर्ण जबाबदारी शिक्षणव्यवस्थेवरच आहे. समाजाची मानसिकता, आपली परंपरा अशा घटकांवर याची जबाबदारी टाकता येणार नाही. कारण यात बदल घडवणे हे शिक्षणाचेच कार्य आहे.

*'सा विद्या या विमुक्तये'*

जी मुक्त करते ती विद्या. हे मुक्त करण्याचे काम, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता आणि धैर्य विद्यार्थ्यांना देण्याचे काम हे शिक्षणव्यवस्थेनेच करायचे काम आहे.

या संबंधात एक आशेचा किरण मात्र जरूर आहे. आपल्याकडे शिकलेले तरुण जेव्हा इंग्लंड-अमेरिकेसारख्या समाजव्यवस्थेत जातात तेव्हा केवळ धोपट मार्गाने यशस्वी होत नाहीत. त्यातील अनेकजण स्वतंत्र मार्ग निर्माण करतात. वेगळा विचार करतात. अशांची संख्याही थोडीथोडकी नाही. याचा अर्थ इतकाच की स्वतंत्र विचार करण्याची बौद्धिक ताकद आपल्या तरुणांकडे आहे. त्यासाठीची क्षमताही आपल्या शिक्षणव्यवस्थेतून निर्माण होते. फक्त त्यासाठी लागणारे धैर्य तिथल्या समाजव्यवस्थेत सामावल्यानंतर त्यांना मिळते. आपल्या समाजव्यवस्थेत हे धैर्य मिळत नाही.

आपल्या शिक्षणव्यवस्थेला हे धैर्य देण्याचे काम करावे लागेल. हे कसे करता येईल? या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही. त्यावर गंभीर विचार करावा लागेल. मुख्य म्हणजे शिक्षणक्षेत्राकडून ही अपेक्षा आहे याची जाणीव या क्षेत्राला द्यावी लागेल. शिक्षकांना हे सांगावे लागेल. विशेषत: आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, तीव्र स्पर्धेच्या युगात या गोष्टीला तर अतोनात महत्त्व आहे.

आणखी एक गोष्ट टाळण्याची काळजी घ्यावी लागेल. 'स्वतंत्र विचार करण्याचे विद्यार्थ्यांना कसे शिकवावे' याचा एक साचा निर्माण होता कामा नये! आपल्याकडे ते होण्याचा धोका जरूर आहे. त्यातून मूळ उद्दिष्ट असफल होईल. किंबहुना असे

करता येईल की शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यातील शिक्षकांना 'विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करायला शिकवणाऱ्या पद्धती विकसित कराव्या' असे आवाहन करता येईल. मग या पद्धती कशा आहेत, त्या किती प्रभावी ठरल्या, त्यांचे चांगले-वाईट परिणाम काय झाले याचे निष्कर्ष सादर करण्याचे त्यांना सांगता येईल. या सर्व गोष्टीला खूप प्रतिष्ठा निर्माण करता येऊ शकेल. त्यासाठी विविध पातळ्यांवर आणि अखेरीस राष्ट्रीय पातळीवर बक्षिसे ठेवता येतील. या साऱ्यातून या विषयावर एक प्रचंड मंथन शिक्षणक्षेत्रात सुरू होईल. अनेक नव्या पद्धती विकसित होतील आणि 'विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करायला शिकवणे. ते मानसिक धैर्य त्यांच्यात निर्माण करणे' हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे ही गोष्ट दृढमूल होईल. आपल्या समाजाची मानसिकता बदलण्यास सुरुवात होईल. आपल्या शिक्षणक्षेत्राकडून हा आउटपुट मिळवण्यात जर आपण यशस्वी झालो तर त्याइतकी मोलाची गोष्ट कोणतीच असणार नाही.

शिक्षणक्षेत्राकडून आणखी एक अपेक्षा आहे आणि त्याबाबतही या क्षेत्राने स्पृहणीय कामगिरी केलेली नाही. सुशिक्षित झालेल्या तरुणांना आपल्या समाजाबद्दल, इथल्या प्रश्नांबद्दल आस्था वाटली पाहिजे. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी करण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. म्हणजे त्यांनी अगदी स्वत:च्या हिताला तिलांजली देऊन समाजासाठी कार्य करणारे फकीर-बैरागी व्हावे असे नाही. अशी अपेक्षा करणे व्यवहार्य नाही.

पण आज घडते असे की शिक्षणामुळे विद्यार्थी अधिकाधिक स्वकेंद्रित होत जातात. जेवढे शिक्षण उच्च व जितका विद्यार्थी यशस्वी तेवढे स्व-केंद्रित होण्याचे प्रमाण अधिक. त्याचे शिखराचे स्वरूप म्हणजे या शिक्षणाचा उपयोग करून इथून बाहेर पडावे व कोणत्याही प्रगत पाश्चात्त्य देशात जाऊन सुखात व श्रीमंतीत आयुष्य जगावे ही महत्त्वाकांक्षा. ते जमले नाही तर इथे राहून पण भरपूर पैसे कमावून श्रीमंतीत राहावे. इथल्या समस्या सोडवण्याशी आपला काही संबंध नाही. ते काम या समाजाचे आहे. आपण त्यापासून दूर आहोत. चार अंगुळे वर आहोत असे मानण्याची वृत्ती आजचे आपले शिक्षण निर्माण करते.

जागतिकीकरणाच्या जमान्यात ही वृत्ती वाढीलाच लागणार आहे. कारण आता बाजारपेठेची अर्थव्यवस्था चालवण्याची प्रेरणा म्हणजे चंगळवाद. त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. लोकांनी चंगळवाद स्वीकारावा म्हणून जाहिरातींच्या माध्यमातून मोहीम सुरू आहे. शिवाय या नव्या जमान्यात शिक्षण 'सेल्फ सपोर्टिंग' असावे याचा अर्थ शिक्षणाचा सारा खर्च विद्यार्थ्यांकडून शुल्काच्या स्वरूपात वसूल करावा असा लावला गेला आहे. त्यामुळे 'आम्ही आमचे पैसे खर्च करून शिक्षण घेतले आहे. या समाजाच्या

प्रश्नांशी आमचा काय संबंध?' या वृत्तीला अटकाव करणार कसा?

पण ही गोष्ट धोकादायक आहे. सभोवताली दारिद्र्याचा महासागर पसरलेला असताना आणि भ्रष्टाचाराची कीड वरपासून खालपर्यंत समाजजीवन पोखरून टाकीत असताना आपल्या आयुष्यातले सुबत्तेचे बेट कोणी टिकवून ठेऊ शकत नाही. हे विद्यार्थ्यांना पटवले पाहिजे. आपल्या ज्ञानाचा आणि शिक्षणाचा उपयोग समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी करणे हे आपल्या वैयक्तिक जीवनात अधिक आनंद निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे, ही जाणीव निर्माण केली पाहिजे. अखेरीस सभोवतालच्या सामाजिक वास्तवापासून कोणत्याही माणसाचे आयुष्य वेगळे काढता येत नाही. त्यांमुळे हे वास्तव अधिकाधिक चांगले करण्यासाठी प्रयत्न करणे, हा आपले जीवन समृद्ध करण्याचाच एक मार्ग आहे.

मात्र जागतिकीकरण, बाजारपेठेचे अर्थशास्त्र आणि तीव्र स्पर्धा असलेल्या आजच्या जमान्यात हे सारे विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचे काम अगदी बिकट आहे. शिक्षणक्षेत्राला हे आव्हानही पेलावे लागणार आहे.

# उच्च शिक्षणाचे अर्थकारण

जागतिकीकरणाच्या जमान्यात, जेव्हा बाजारपेठेचे अर्थशास्त्र स्वीकारले गेले आहे तेव्हा, 'सरकारी अनुदान' ही जवळ जवळ निषिद्ध गोष्ट आहे असे वारंवार ठासून सांगितले जात आहे. अनुदानाचा लाभ घेणारे क्षेत्र हे पंगू राहते. तिथे व्यावसायिक कार्यक्षमता येत नाही. त्याच्या गुणवत्तेत वाढ होत नाही. त्याला स्पर्धेला तोंड द्यावे लागत नाही. त्यामुळे आजच्या जगाच्या वास्तवापासून हे क्षेत्र दूर राहते. म्हणून सरकारने अनुदान-संस्कृती जोपासू नये. समाजातील सारी क्षेत्रे स्वयंनिर्भर होतील असे पाहावे अशी काहीशी विचारधारा बाजारपेठेचे अर्थशास्त्र मानते. गंमत अशी की बाजारपेठेच्या अर्थशास्त्राचा जगभर जोराने पुरस्कार करणाऱ्या आणि यासंबंधी विकसनशील राष्ट्रांना धडे शिकवणाऱ्या अमेरिकेत मात्र अनुदान-संस्कृतीला असे निषिद्ध मानले जात नाही. तिथे शेतीमालाला सरकारी अनुदान मिळत असते. वृद्धांना मदत देणारी 'सोशल सिक्युरिटी स्कीम'सारखी सरकारी अनुदानावर चालणारी योजना तिथे राबवली जाते.

याचा अर्थ इतकाच की बाजारपेठेच्या अर्थशास्त्रानुसारदेखील अनुदानावर सरसकट कुऱ्हाड चालवणे चूक आहे. अनुदान-संस्कृती कमी करायची असली तरी त्याचा निर्णय विचारपूर्वक घेतला पाहिजे.

अनुदान-संस्कृतीमध्ये काही दोष आहेत यात शंका नाही. त्यामुळे आर्थिक प्रगतीवर विपरीत परिणाम होतो हेदेखील खरे. अनुदानाच्या रूपाने किंवा अन्य प्रकाराने एखाद्या क्षेत्राला सरकारी संरक्षण मिळू लागले की तिथल्या कार्यसंस्कृतीचा (वर्क कल्चर) ऱ्हास होण्यास सुरुवात होते. किती कामांसाठी किती माणसांना नोकरीवर घ्यावे आणि पगारापोटी किती पैसे वाटावे याला काही हिशोब राहत नाही. त्यामुळे मग काम करण्याची जबाबदारी कोणावरच राहत नाही. कोणत्याही कार्यालयात वा अन्य क्षेत्रांत कोणतेही काम करण्यासाठी किती माणसे असावीत त्याची एक उचित संख्या असते. त्यापेक्षा कमी माणसे असली तर कामाची गुणवत्ता ढासळते, त्यापेक्षा अधिक माणसे असली तर काम होतच नाही. कामे फक्त रेंगाळत राहतात. अनुदान-संस्कृतीत हे घडते. काम वेळेवर व व्यवस्थितपणे पूर्ण करण्याची आवश्यकता कोणालाच राहत नाही. सारा आनंदच असतो.

एखाद्या वस्तूला अनुदान देऊन तिची किंमत कृत्रिमरीत्या कमी ठेवली की त्या वस्तूचे खरे मूल्य कोणालाच कळत नाही. त्या वस्तूचा मग बेदरकारपणे वापर होऊ लागतो. उधळपट्टी करताना काही वाटेनासे होते. जसे मुंबईत पाण्याच्या बाबतीत घडते आहे. त्या वस्तूचे उत्पादन मूल्य कमी करण्यासाठी संशोधन वा प्रयत्न करण्याची जरुरी राहत नाही. शिवाय त्या वस्तूचा वापर काही ठरावीक वर्गच करीत असेल तर साऱ्या समाजाकडून गोळा केलेला पैसा एका ठरावीक वर्गाच्या हितासाठी वापरला गेला, असा त्याचा अर्थ होतो. हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी विसंगत आहे.

त्यामुळे अनुदान-संस्कृतीची भलावण करण्याचा प्रश्नच नाही. सरकारी अनुदाने कमी कमी होत गेलीच पाहिजेत. फक्त प्रश्न इतकाच आहे की हे आंधळेपणाने सरसकट करून चालणार नाही. कोणत्या क्षेत्रात आणि कोणत्या बाबतीत हे करायचे त्याचा निर्णय विचारपूर्वक करायला हवा. त्यासाठी त्या समाजाचे स्वरूप, त्याची सांस्कृतिक मूल्यव्यवस्था आणि तिथल्या अर्थव्यवस्थेची बलस्थाने यांचा विचार व्हायला हवा.

उदाहरणार्थ, उच्च शिक्षणावर सरकार करीत असलेला खर्च. आधी एका प्रकरणात आपण पाहिल्याप्रमाणे शिक्षण — त्यातही उच्च शिक्षण — हीच इथल्या गरीब आणि मध्यमवर्गाची एकमेव आशा आहे. सध्याच्या अंधाऱ्या वर्तमानकाळातदेखील उज्ज्वल भविष्याची स्वप्ने दाखवू शकणारा एकमेव किरण इथल्या पालकांच्या आयुष्यात आहे, तो म्हणजे मुलाला चांगले शिकवता येईल. शालेय शिक्षणाचा प्रसार वाढला की अशा पालकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढतच जाईल. म्हणून इथले सामाजिक वास्तव हे आहे की सरकारने उच्च शिक्षणावर खर्च करायला हवा.

अन्य क्षेत्रांत सरकारने अनुदान दिले तर अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. पण उच्च शिक्षणावरचा खर्च अर्थव्यवस्थेला उपकारक ठरणारा आहे. याचे कारण आजच्या जागतिकीकरणाच्या आणि स्पर्धेच्या जगात ज्या एकमेव गोष्टीच्या आधारावर आपण आपले खास स्थान निर्माण केले आहे ती गोष्ट म्हणजे आपल्याकडील सुशिक्षित तरुण. आपल्या देशाला या स्पर्धेत टिकून राहण्याची आणि यशस्वी होण्याची आशा फक्त आपल्याकडच्या सुशिक्षित तरुणामुळेच आहे. म्हणजे देशांतर्गत वास्तवात जी गोष्ट इथल्या गरीब आणि मध्यमवर्गाच्या बाबतीत खरी आहे, तीच गोष्ट जागतिक संदर्भात आपल्या देशाच्या बाबतीत म्हणता येईल. सध्याच्या अंधाऱ्या वर्तमानकाळातदेखील उज्ज्वल भविष्याची स्वप्ने दाखवू शकणारा एकमेव किरण आपल्या देशासाठी आहे, तो म्हणजे आपल्या मुलांना चांगले शिक्षण देणे.

याचाच अर्थ उच्च शिक्षणावर होणाऱ्या आपल्या खर्चाकडे आपण अनुदान म्हणून न पाहता भविष्याची तरतूद म्हणून पाहिले पाहिजे. आपल्या देशाच्या दृष्टीने स्पर्धेच्या

जमान्यातली एक 'स्ट्रॅटेजी' म्हणून हा खर्च आवश्यक आहे. शिवाय या खर्चामुळे जितके जास्त उच्च शिक्षित तरुण आपण जगाच्या बाजारात ओतू तेवढा आपल्या अर्थव्यवस्थेला फायदाच अधिक होणार आहे.

अमेरिकेची उदाहरणे देण्याचा आपल्याकडे फार सोस आहे. याचे एक कारण म्हणजे आपल्याकडील अनेक उच्च शिक्षित तरुण अमेरिकेत वास्तव्याला गेले आहेत. तेथे यशस्वी ठरले आहेत. अमेरिकेसारख्या देशात ते यशस्वी झाल्यामुळे आपल्यालाही त्यांचे कौतुक आहे. अभिमान आहे. अशा मंडळींच्या मताला स्वाभाविकपणे फार किंमत आहे. इथली धोरणे ठरवण्यावर त्यांच्या मतांचा प्रभाव पडतो आणि अर्थातच त्यांच्या डोळ्यांसमोर अमेरिकेतील अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था आहे. तिथली धोरणे आणि तिथले वास्तव याची त्यांना माहिती आहे. कौतुक आहे. त्या सर्व गोष्टींची तरफदारी त्यांनी करणे व भारताने आपल्या विकासासाठी ती धोरणे अवलंबावीत असे त्यांना वाटणे स्वाभाविकच आहे.

अमेरिकेत उच्च शिक्षणावर सरकारचा खर्च नगण्य आहे. तिथे समाजाच्या आणि उद्योगधंद्यांच्या आधारावर शिक्षणसंस्था चालतात. तिथे उच्च शिक्षणाचे शुल्क भरमसाठ असते. तरी विद्यार्थी ते भरून शिकायला येतात आणि अर्थातच तिथे उच्च शिक्षणाचा दर्जा चांगला आहे. तेव्हा भारतातही असेच करावे म्हणजे इथे उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल. भारताची प्रगती होईल असे या मंडळींना वाटणे स्वाभाविक आहे. त्यामागची त्यांची तळमळ योग्यच आहे.

पण अनेक भारतीयांना आज अमेरिका जरी आपल्या घरासारखा वाटत असला तरी भारत आणि अमेरिका यांची कोणत्याही प्रकाराने तुलना होण्यासारखी नाही, हे वास्तव आपण स्पष्टपणे जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या आणि आपल्या सांस्कृतिक जडणघडणीत आणि मुख्य म्हणजे आर्थिक परिस्थितीत इतकी तफावत आहे की त्यांची उदाहरणे आपल्या बाबतीत गैरलागू आहेत. टाटा-बिर्ला यांच्या घरात काय चालते, त्या उदाहरणावरून इथल्या एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबाने आपल्या घराची घडी बसवण्यासारखा तो प्रकार आहे. तो हास्यास्पदही आहे आणि नुकसान करणाराही आहे. अमेरिकेत एखादा तरुण २-४ वर्षे नोकरी करून पुरेसे पैसे साठवू शकतो आणि त्या आधारावर उच्च शिक्षण घेऊ शकतो. समजा, त्या उच्च शिक्षणामध्ये तो अयशस्वी ठरला किंवा ज्या विषयात त्याने उच्च शिक्षण घेतले आहे त्या विषयाची बाजारातली मागणी घटली आणि त्या शिक्षणामुळे त्याला अपेक्षेप्रमाणे चांगली नोकरी मिळवता आली नाही अथवा अपेक्षेप्रमाणे पैसे देणारा धंदा सुरू करता आला नाही तरी त्यामुळे त्याचे आयुष्य उद्ध्वस्त होणार नाही. त्याला धक्का जरूर बसेल. कष्टही थोडे अधिक करावे लागतील. पण थोड्याच काळात तो दुसऱ्या एखाद्या नोकरीधंद्यात

स्थिरावेल व आपले आयुष्य परत उभे करू शकेल.

भारतातली परिस्थिती अशी आहे काय? एक तर उच्च शिक्षणाची फी भरमसाठ असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या आयुष्यभराची पुंजी खर्च करावी लागेल. त्यांच्या भविष्याचा आधार नष्ट होईल आणि त्या शिक्षणात विद्यार्थी अयशस्वी झाला किंवा ते शिक्षण पूर्ण केल्यावरही अपेक्षेप्रमाणे त्याला आयुष्यात स्थिरावता आले नाही, तर सारे संपलेच. त्याचे आयुष्य उद्ध्वस्तच होईल. कारण अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेमध्ये जी ताकद आहे त्याची आपल्या अर्थव्यवस्थेशी तुलनाही होऊ शकत नाही. त्यामुळे अमेरिकेची उदाहरणे आपल्या देशात गैरलागू आहेत. त्या आधाराने आपली धोरणे ठरवणे चूक आहे. बेडकीने फुगून बैलाची नक्कल करण्यासारखे आहे.

स्पर्धेच्या जमान्याच्या भाषेत बोलायचे झाले तर अमेरिकेशी आपली स्पर्धा नाहीच. अमेरिकेपासून आपल्याला सावध मात्र राहायला पाहिजे. कारण सध्याच्या व्यवस्थेत ते सर्वात बलशाली राष्ट्र आहे आणि स्वत:च्या फायद्याचे नियम बनवून ते आपल्याला (आणि अन्य सर्वांना) कमकुवत ठेवण्यासाठी धडपडणार हे उघड आहे. आपल्याशी स्पर्धा असू शकणारे राष्ट्र आहे चीन! त्यांच्या आणि आपल्या राजकीय पद्धतीत फरक जरूर आहे. पण चीनच्या आणि आपल्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत जमीन-अस्मानाची तफावत नक्कीच नाही. चीनचे उच्च शिक्षणासंबंधी धोरण काय आहे? चीनच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील शिक्षणखात्याचे उपमंत्री नुकतेच भारताच्या दौऱ्यावर येऊन गेले व इथल्या विद्यापीठांना त्यांनी भेटी दिल्या. ते मुंबई विद्यापीठात आले होते तेव्हा अन्य चर्चा झाल्यावर मी त्यांना प्रश्न विचारला, 'सध्या चीनमध्येही जागतिकीकरण आणि खाजगीकरण यांचे वारे वाहू लागले आहेत. अशा वेळेला उच्च शिक्षणाच्या बाबतीत चीनचे धोरण काय आहे? खाजगी क्षेत्राला तिथे मोकळीक आहे का? सरकार आपले अंग काढून घेते आहे का?' त्यांनी उत्तर दिले, 'खाजगी क्षेत्राला आता वाव दिला जातो आहे पण सरकारने शिक्षणातून बाजूला व्हावे असे आमचे धोरण नाही.'

चर्चेच्या ओघात नंतर त्यांनी सांगितले की, 'आमची लोकसंख्या ही आमची ठेव (ॲसेट) आहे असे आम्ही मानतो. त्यापासून पूर्ण लाभ मिळवायचा तर जास्तीतजास्त तरुणांना जास्तीतजास्त शिक्षण दिले पाहिजे अशी आमची भूमिका आहे.' चीनचे हे धोरण व त्यांची ही भूमिका याचा आपण बारकाईने विचार केला पाहिजे.

तसे खूपसे शहाणपण आपल्या जुन्या लोककथांमध्ये आणि लोकगीतांमध्येही आहे. अशीच एक छोटीशी कथा आहे. खेड्यातल्या एका शेतकऱ्याला शहरातला एक पंडित भेटला. तो शेतकऱ्याला खर्चाचे नियोजन कसे करावे, बजेट कसे करावे हे सांगू लागला. शेतकरी म्हणाला, 'मला हे तुमचे काही कळत नाही. पण मी सांगू

का? मला एक रुपया मिळाला की मी त्यातले चार आणे 'आज'वर खर्च करतो. चार आणे 'काल'वर खर्च करतो, चार आणे 'उद्या'वर खर्च करतो आणि चार आणे 'निरंतर काळा'वर खर्च करतो!' शहरी पंडित गोंधळला! म्हणाला, 'म्हणजे काय? मला काही कळत नाही.'

शेतकरी म्हणाला, 'सोपे आहे. चार आणे खर्च होतात घर चालवायला, घराची आजची जरुरी पूर्ण करायला. म्हणजे आजवर. चार आणे खर्च होतात आई-वडलांच्या औषधपाण्यावर, त्यांच्या देखभालीवर. म्हणजे कालवर. चार आणे खर्च होतात मुलांच्या शिक्षणावर म्हणजे उद्यावर. चार आणे खर्च होतात देवा-धर्मावर. देव आणि धर्म काल होता, आज आहे आणि उद्याही राहणार म्हणजे निरंतर काळावर! समजलं?'

या लोककथेत सांगितलेले शेतकऱ्याचे शहाणपण बघा. मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च हा उद्यावर खर्च आहे, त्यातूनच उद्यासाठीची आशा जिवंत राहणार आहे हे सत्य त्याने किती सहज सांगितले.

शिक्षणाचे उद्दिष्ट मूलत: 'उद्याची तरतूद' हे आहे. हे व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे तितकेच समाजाच्या बाबतीतही खरे आहे. उच्च शिक्षणातून समाजासाठी 'ॲसेट' निर्माण होतात. ताकद असणारी क्षेत्रे निर्माण होतात. आपल्यासारख्या विकसनशील राष्ट्राच्या बाबतीत तर ती गोष्ट अधिकच प्रकर्षाचे महत्त्वाची आहे. आता 'ॲसेट' निर्माण करण्याचे काम स्वयंनिर्भर कसे होऊ शकेल? त्या ॲसेटमधून, त्या ताकदीच्या क्षेत्रांमधून समाजाचा अन्य अनेक प्रकारे फायदा होईल. पण ते निर्माण करण्याचे कार्य स्वत:पुरते स्वयंनिर्भर कसे होईल? हे म्हणजे उद्याची तरतूद करण्याची योजना स्वयंनिर्भर असावी असे म्हटल्यासारखे झाले. माझ्या आजच्या मिळकतीतील कोणताही हिस्सा त्यासाठी न घालता माझी उद्याची तरतूद होत राहावी, वाढत राहावी असे म्हणण्यासारखे झाले! हे तर्कविसंगत आहे.

पण आपण आज इतके स्वयंकेंद्री झालो आहोत की विचार फक्त 'आज'चाच आहे. या क्षणाचा आहे. बाजारपेठेच्या संस्कृतीबरोबर चंगळवादी संस्कृती वाढते. माणसे फक्त आत्ताच्या या क्षणाचा विचार करतात हे खरे आहे. पण सरकारसुद्धा? सरकारदेखील उद्याचा विचार करणार नाही का? इथल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी आपली मानणार नाही का? यावर असे म्हटले जाते की, 'उच्च शिक्षण ही सरकारची जबाबदारी नाही. ती जबाबदारी समाजाने घ्यावी. उच्च शिक्षणावरचा खर्च समाजाने करावा. शैक्षणिक संस्थांनी, विद्यापीठांनी त्यासाठी प्रयत्न करावेत. माजी विद्यार्थ्यांकडून, दानशूर मंडळींकडून निधी गोळा करावा.'

असे म्हणणे ठीक आहे. पण प्रत्यक्षात त्यात एक मोठी अडचण आहे. शिक्षणाला मदत म्हणून पैसे उचलून देणे ही या समाजाची प्रवृत्ती नाही. मुळात शिक्षण

जंगलातल्या आश्रमात व्हावे ही आपली संस्कृती. शिक्षकाने गरिबीत राहून विद्यादानाचे पवित्र कार्य करावे ही आपली अपेक्षा. द्रोणाचार्यांच्या पत्नीला आपल्या मुलाला — अश्वत्थाम्याला — दूध म्हणून पाण्यात पीठ मिसळून द्यावे लागावे अशा आपल्याकडच्या पुराण कथा. कर्मवीर भाऊराव पाटलांनी खेड्यापाड्यांत शाळा काढून शिक्षणाचा प्रसार केला आणि त्यासाठी बायकोचे मंगळसूत्र विकले ही आहे आजच्या काळातली कथा.

या उलट देवा-धर्माचे बघा. तिथे दान करण्याची आपली परंपरा आहे. भटा-ब्राह्मणाला सढळ हस्ते दक्षिणा देण्याची आपल्याला सवय आहे. त्यामुळे आजदेखील तिरुपतीचा बालाजी, शिर्डीचे साईबाबा वगैरेंची मंदिरे व देवस्थाने अतिशय श्रीमंत आहेत. बाकी मंदिरांतही पैशाची चणचण कधीच नसते. अगदी खेड्यातल्या एखाद्या पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार करायचा म्हटले तरी पैसे लगेच गोळा होतात. नवे मंदिर अगदी थाटामाटात उभे राहते. पण खेड्याच्या शाळेची इमारत मात्र अशी उभी राहत नाही. तिथे पुरेसे शिक्षक नेमायचे म्हटले तर त्यांच्या पगारासाठी निधी असा उभा राहत नाही.

त्यातून शिक्षणसंस्थांना मदत करायला कोणी पुढे आलाच तर त्यात किती अटी-तटी! शिक्षणसंस्थांना गरज कसली आहे याचा विचार नसतो. देणाऱ्याच्या जे मनात असेल त्यासाठी तो निधी वापरण्याची तो अट घालणार. म्हणजे तो सांगेल त्या विषयाच्या परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस किंवा सुवर्णपदक! हळूहळू अशा देणग्यांचा फायदा होण्याऐवजी काळाच्या ओघात शिक्षणसंस्थांना त्याचे ओझेच वाटू लागते. मुंबई विद्यापीठात अनेक विषयांच्या सुवर्णपदकांसाठी ठेवीच्या रकमा देणग्या म्हणून ठेवण्यात आल्या आहेत. काळाच्या ओघात किमती इतक्या वाढल्या आहेत की ही पदके खऱ्या सोन्याची तर सोडाच, पण सोन्याचे पाणी दिलेल्या अन्य धातूंची द्यायची म्हटली तरी त्यासाठी विद्यापीठाला स्वत:चे पैसे घालावे लागतात. अनेक विषय इतके कालबाह्य झाले आहेत की त्याला विद्यार्थीच नाहीत. मग त्यासाठी देणगी दिलेली रक्कम व त्यावरचे व्याज नुसते पडून राहते. ते अन्यत्र कोठे वापरता येत नाही.

एखाद्या शिक्षणसंस्थेला खूप मोठी देणगी देणारा देणगीदार भेटला की लगेच त्या शाळेला किंवा महाविद्यालयाला कायमचे त्याचे नाव द्यावे लागते. त्या शाळेत किंवा महाविद्यालयात काही प्रवेश दरवर्षी त्याच्या मर्जीनुसार देत राहण्याचे मान्य करावे लागते. इतक्या अटी-तटी घालून दिली जाणारी मदत ही शिक्षणसंस्थांना मदत असते की देणगीदारांची हौस भागवण्याचे ते माध्यम असते, असाच प्रश्न पडतो.

याउलट देवस्थानांना आणि देवळांना दिले जाणारे दान बघा. त्याला काही अटी नसतात. या देणगीच्या व्याजातून दरवर्षी अमुक एक दिवशी सर्व भाविकांना साजूक

तुपातला शिरा करून दिला पाहिजे, अशी अपेक्षा नसते. देवस्थानाला कायमचे आमचे नाव असले पाहिजे असे म्हणण्याचे तर कोणी मनातही आणणार नाही. तिथे निरपेक्षपणे दान करण्याची आपली संस्कृती आहे. अशा परिस्थितीत समाजाची ही मानसिकता लक्षात न घेता 'तुम्ही समाजाकडून पैसे मिळवा' असे नुसते शिक्षणसंस्थांना सांगण्यात काय अर्थ आहे? ही मानसिकता बदलण्याची जबाबदारी ही शिक्षणसंस्थांची आहे काय? त्यासाठी समाजधुरिणांनी, राजकीय नेत्यांनी प्रयत्न करायला नकोत का? आणि नुसत्या बोलण्यातून आणि भाषणबाजीने हा बदल लगेच घडेल काय?

पण आज तर समाजाला याबाबतीत काही सांगण्याऐवजी शिक्षणसंस्थांनाच उपदेशाचे डोस पाजले जात आहेत. म्हणजे, 'तुम्ही तुमची प्रतिमा अशी वाढवा की ज्यामुळे तुम्हाला समाज मदत करायला पुढे येईल,' असे शिक्षणसंस्थांना सांगणे ठीक आहे. पण वस्तुस्थिती काय आहे? नाशिकच्या कुंभमेळ्याला जमलेले साधू राजेशाही थाटात राहतात. त्यांना समाजातून त्यासाठी पुरेसे पैसे मिळतात! त्या साधूंच्या मठांपेक्षा तरी नक्कीच आपल्या शाळा आणि महाविद्यालये अधिक चांगले काम करतात. त्या साधू-बैराग्यांपेक्षा नक्कीच आमची शिक्षक मंडळी जास्त मोलाचे कार्य करतात. पण शिक्षकांना पुरेसा पगार मिळण्याची मारामार आणि साधू बैराग्यांचा राजेशाही थाट! हे आहे आपल्या समाजाच्या मानसिकतेचे प्रदर्शन.

म्हणूनच या अशा मानसिकतेत असलेल्या समाजाला जेव्हा जागतिकीकरणाच्या आणि बाजारपेठेच्या अर्थशास्त्राच्या धडका बसू लागल्या तेव्हा शिक्षणक्षेत्रामध्ये विकृती शिरू लागल्या. आधी त्या होत्याच पण त्यांचे प्रमाण छोटे होते. कोचिंग क्लासेसच्या स्वरूपात या विकृती होत्या. पण आता त्याचे स्वरूप झपाट्याने वाढते आहे. आता उच्च शिक्षणाची दुकाने मांडणारे शिक्षणसम्राट आले आहेत. त्यांची साम्राज्ये झपाट्याने विस्तारत आहेत. शिक्षणसंस्था, महाविद्यालये यांनी विद्यार्थ्यांची काळजी घ्यायला हवी. पण आज त्यातीलच अनेक विद्यार्थ्यांचे शोषण करायला निघाली आहेत.

ही गोष्ट खरी आहे की अनेक शिक्षणक्रमांचे शुल्क अनेक वर्षांत अजिबात वाढवण्यात आलेले नाही. त्यामुळे शुल्काची पातळी कित्येक ठिकाणी इतकी कमी राहिली आहे की, ती रक्कम हास्यास्पद वाटावी. त्यातून विकृतीही जन्माला आल्या. खाजगी शिकवण्या आणि कोचिंग क्लासेसची बांडगुळे जोमाने वाढू लागली आणि शाळा-महाविद्यालयांची आवश्यक ती वाढ खुंटली. शाळा-महाविद्यालयांचे शिक्षण इतके स्वस्त झाले की, ते जणू कवडीमोलाचे वाटू लागले. त्याला काही महत्त्व राहिले नाही. त्यामुळे शिक्षणाचे शुल्क वाढवून योग्य त्या पातळीवर आणणे योग्य आहे. ते आवश्यकही आहे. पण याचा अर्थ लंबक दुसऱ्या टोकाला जाऊ द्यायचा असा नव्हे.

कारण असे करणे म्हणजे 'रोगापेक्षा औषध भयंकर' अशी परिस्थिती उद्‌भवेल. अर्थव्यवस्थेतील अन्य किमतींची पातळी लक्षात घेऊन शुल्क ठरवले पाहिजे, म्हणजे त्यामुळे शाळा-महाविद्यालयातले शिक्षण कवडीमोलाचे वाटणार नाही. पण याचा आधार घेऊन सरकारने शिक्षणक्षेत्रातून अंग काढून घेणे चूक आहे. शिक्षणाची संपूर्ण किंमत शुल्काच्या रूपाने वसूल करावी, असे दुसरे टोक गाठणे चूक आहे.

खरे तर, शिक्षणक्षेत्रातील विकृतींविरुद्ध ज्यांनी लढायला हवे ती सरकारे आणि न्यायालये त्याला खतपाणी घालीत आहेत. यात कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी फरक नाही. न्यायालये कोणतीही असोत किंवा सर्वोच्च असो त्यात फरक नाही. हे घडते याचे मूळ कारण एक चुकीची विचारधारा इथे दृढमूल होते आहे. बाजारपेठेच्या अर्थशास्त्रातल्या काही गोष्टींचे चुकीचे अर्थ उच्च शिक्षणाच्या संदर्भात लावल्यामुळे हे घडते आहे. ते चुकीचे अर्थ कोणते ते समजावून घ्यायला हवेत. ही विकृत विचारधारा कोणती हे समजून घ्यायला हवे.

'सरकारने त्याच्यावरच्या मूलभूत जबाबदाऱ्या पार पाडण्याचे फक्त काम करावे. त्याने बाकीच्या गोष्टींपासून दूर रहावे. सरकारने उद्योगधंदे अंगीकारू नयेत. त्यांचे खाजगीकरण करावे. त्यातूंन हे उद्योगधंदे स्पर्धाशील बनतील. त्यांच्यात व्यावसायिकता येईल व त्यातून आपण जागतिकीकरणाला सामोरे जाण्यास सज्ज होऊ.' ही ती विचारधारा. या विचारधारेचा अन्य ठिकाणी काय परिणाम झाला आहे हा आत्ता चर्चेचा विषय नाही. पण उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात काय झाले? सरकारची जबाबदारी शालेय शिक्षणाची आहे असे म्हटले की उच्च शिक्षण ही त्याची जबाबदारी राहत नाही. मग उच्च शिक्षण हे सरकारने स्वत:वर लादून घेतलेले नसते ओझे आहे असे ठरते. ज्याप्रमाणे निर्गुंतवणुकीचे धोरण अलंबून सरकारने उद्योगधंद्याच्या क्षेत्रातून बाजूला होणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातून सरकारने अंग काढून घेणे आवश्यक आहे असा निष्कर्ष यातून येतो. म्हणजे 'उच्च शिक्षणाच्या क्षेत्राने स्वयंनिर्भर व्हावे, सेल्फ सपोर्टिंग असावे' असे परवलीचे सूत्र यातून निघते.

या परवलीच्या सूत्राचा शिक्षणक्षेत्राच्या संदर्भात आपण लावलेला अर्थ चुकीचा आहे. स्वयंनिर्भर असण्याचा शिक्षणक्षेत्राच्या संदर्भातील आपण लावलेला अर्थ चुकीचा आहे आणि त्यामुळेच या साऱ्या विकृती जन्माला आल्या आहेत. झपाट्याने वाढत आहेत.

एक तर उच्च शिक्षण हे अन्य उद्योगधंद्यांप्रमाणे नाही. त्याचा उद्देश मोठ्या प्रमाणावर धंदा करून फायदा मिळवण्याचा असूच शकत नाही. अर्थात तत्त्वत: ही गोष्ट सध्या दृढमूल होत असलेल्या विचारसरणीतही मान्य करण्यात येते आहे. शिक्षणसंस्थांनी आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता आहे, पण त्यांनी नफेखोरी करू

नये अशी अपेक्षा आहे. नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निकालातही हे म्हटले आहे. पण एखाद्या व्यवसायाने आत्मनिर्भर होणे आणि नफेखोरी करणे यातली सीमारेषा किती धूसर आहे याचा विचार करायला हवा. इथे झपाट्याने शिक्षणसम्राट निर्माण होत आहेत; आपली साम्राज्ये वाढवीत आहेत. अनेक मोठे उद्योजक शिक्षणक्षेत्राकडे अपेक्षेने पाहत आहेत. कारण आता या क्षेत्रातदेखील नफा मिळवण्याची संधी निर्माण झाली आहे. पूर्वी कोचिंग क्लासेसच्या रूपाने जी विकृती छोट्या प्रमाणात होती, तीच आता सरळ सरळ शिक्षणसंस्थांची दुकाने टाकण्याच्या विस्तारित स्वरूपात पुढे आहे.

शिक्षणक्षेत्राने 'स्वयंनिर्भर' असावे असे म्हटले की त्यात नफेखोरीला प्रवेश मिळणे अनिवार्य आहे हे सत्य आपण स्वीकारलेच पाहिजे. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट अशी की स्वयंनिर्भर याचा अर्थ शिक्षणक्षेत्राच्या संदर्भात काय?

एखादा उद्योग स्वयंनिर्भर असतो याचा अर्थ आपल्या उत्पादनाची विक्री करून उत्पादकाला आपला धंदा चालवण्यासाठी पुरेसे पैसे मिळवता येतात. त्याच्या उत्पादनाची विकण्याची किंमतही त्याप्रमाणे ठरवली जाते. सेवा-उद्योगामध्ये (सर्विस इंडस्ट्री) त्या सवेचे दर असे असतात की, सेवा ज्यांना पुरवली जाते त्यांच्याकडून सारा खर्च वसूल केला जातो. स्वयंनिर्भर असण्याची ही पहिली पायरी आहे. जर उत्पादनाची किंमत यापेक्षा जास्त असेल किंवा सेवा पुरवण्याचा दर यापेक्षा जास्त असेल तर नफा मिळवण्यास सुरुवात होते.

शिक्षणसंस्था सेवा-उद्योग (सर्विस इंडस्ट्री) आहेत की उत्पादक (प्रॉडक्शन इंडस्ट्री) आहेत?

समजा, सेवा-उद्योग मानले तर त्यांची सेवा कोणासाठी पुरवली जाते? पण अनेकदा उच्च शिक्षित विद्यार्थ्यांना 'आय.आय.टी.' प्रॉडक्ट किंवा अमुक एका शिक्षणसंस्थेचे प्रॉडक्ट असेही ओळखले जाते. म्हणजे उच्च शिक्षित विद्यार्थ्यांचे उत्पादन करणारा असा हा उत्पादक-उद्योग आहे असे मानले तर त्याचे उत्पादन कोठे विकले जाते? त्यासाठीची बाजारपेठ कोणती?

प्रश्न कसाही मांडला तरी उत्तर एकच आहे, समाज! समाजात चालणारे सारे आर्थिक व्यवहार. आज समाजाच्या साऱ्या अर्थव्यवस्थेचा गाडा उच्च शिक्षितांच्या सहभागाशिवाय पुढे सरकू शकणार नाही. अर्थव्यवहाराच्या सर्वच पैलूंसाठीचे त्यांचे योगदान फार मोलाचे आहे.

उदाहरणार्थ, शेतीचे क्षेत्र घ्या. शेतकऱ्यांना शेतीसाठी खते, वीज, पाणी यांची आवश्यकता असते. यासाठी कारखाने लागतात. विद्युतनिर्मितीच्या योजना बनवाव्या लागतात. त्या कार्यान्वित कराव्या लागतात. चालू ठेवाव्या लागतात. पाणी

साठवण्यासाठी व त्यांचा योग्य पुरवठा व्हावा म्हणून योजना कराव्या लागतात.

व्यापाराचे क्षेत्र घेतले, तर त्यासाठी दळणवळणाची साधने लागतात. रस्ते बनवावे लागतात. वाहनांचे उत्पादन करावे लागते. ती चालू राहावीत याची व्यवस्था करावी लागते.

व्यापार-उदीम व उद्योगधंदे सुरळीत चालायचे तर कायदा-सुव्यवस्था लागते. त्यासाठी वकील हवेत, न्यायालये हवीत. साऱ्या खाजगी अथवा सरकारी कार्यालयात उत्तम अधिकारी हवेत. त्यांच्या हाताखाली चांगले व सुजाण सहायक हवेत. सरकारी यंत्रणा नीट कार्यरत असायला हवी.

समाजात ताण-तणाव उद्‌भवले तर शांतता बिघडते. दंगली आणि बाँबस्फोट होतात. म्हणून सामाजिक गोष्टींचा अभ्यास करणारे समाजशास्त्रज्ञ हवेत. इतिहासतज्ज्ञ हवेत. शिक्षणतज्ज्ञ हवेत. वृत्तपत्रांचे वार्ताहर हवेत. संपादक हवेत. विचार केला तर ही यादी आणखी कितीतरी वाढवता येईल.

आजच्या युगात समाजातल्या साऱ्या आर्थिक व्यवहारांसाठी अशी उच्च शिक्षितांची फौजच्या फौज असायला हवी. ती वेगवेगळ्या क्षेत्रांत असायला हवी. अशी फौज उच्च शिक्षणातून तयार होते व समाजात येते. उच्च शिक्षणाच्या उत्पादनाला अशा प्रकारे समाजातली सारी आर्थिक क्षेत्राची अंगे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विकत घेत असतात. किंवा दुसऱ्या प्रकारे शिक्षणक्षेत्राची सेवा ही समाजाच्या आर्थिक व्यवहाराला आवश्यक असणारी सेवा असते.

विकासाचे एक पर्यायी मॉडेल काही मंडळी मांडतात. त्यामध्ये खतांचे कारखाने नकोत, धरणे आणि विद्युतउत्पादनाची मोठी केंद्रे नकोत. मोठे रस्ते आणि फ्लाय ओव्हर नकोत. अशा मॉडेलमध्ये उच्च शिक्षितांची फौज लागणार नाही हे खरे आहे, पण मग त्या मॉडेलमध्ये जागतिकीकरणही नाही आणि बाजारपेठेचे अर्थशास्त्रही नाही.

पण जागतिकीकरण आणि बाजारपेठेचे अर्थशास्त्र या गोष्टी मनापासून पटल्यामुळे म्हणा किंवा त्या टाळता येणार नाहीत हे समजल्यामुळे म्हणा, जी मंडळी त्या चौकटीत विचार करीत असतील त्यांना हे मान्य करावेच लागले की उच्च शिक्षितांची संख्या जेवढी अधिक व त्यांची गुणवत्ता जेवढी चांगली तेवढी त्या समाजातली आर्थिक व्यवहाराची घडी अधिक भक्कम आणि सकस.

तेव्हा शिक्षण हा उत्पादन व्यवसाय मानला तर त्याचे उत्पादन या साऱ्या आर्थिक व्यवहारासाठी समाजात विकले जाते. तो सेवा-व्यवसाय मानला तर ती सेवादेखील आर्थिक व्यवहार चालविण्यासाठी समाजाला विकली जाते. साधारणपणे कोणत्याही व्यवसायात जी पद्धत अवलंबिली जाते ती वापरायची तर शिक्षणसंस्थांनी या बाजारात जाऊन सांगितले पाहिजे, 'हे बघा, आमच्याकडे शिकलेले तंत्रज्ञ, डॉक्टर्स, वकील,

ऑफिसर्स वगैरे वगैरे. त्यांची किंमत अमुक इतकी टाका.' किंमत पुरेशी लावून शिक्षणसंस्था स्वयंनिर्भर होतील. इतकेच नव्हे तर बक्कळ फायदा कमावतील.

पण असे घडणार नाही. ही कल्पनाही विचित्र वाटते. प्राचीन काळी गुलामांचा व्यापार होत असे. तितकीच ही कल्पनाही त्याज्य आणि घृणास्पद वाटते, याचे कारण काय?

शिक्षणक्षेत्राचे एक खास वैशिष्ट्य आहे. ते नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. एखाद्या शिक्षणसंस्थेत आत येणारा कच्चा माल म्हणजे विद्यार्थी — मनुष्यप्राणी. त्यावर प्रक्रिया करणारी यंत्रसामग्री म्हणजे शिक्षक. तोही एक माणूसच आणि त्यातून बाहेर पडणारे उपयुक्त उत्पादन म्हणजे उच्च शिक्षित पदवीधर. म्हणजे माणूसच. शिक्षण हा अन्य व्यवसायांप्रमाणे एक व्यवसाय आहे असे पूर्वी मानले जात नव्हते. आजच्या बाजारपेठेच्या अर्थशास्त्रात तसे मानले जात आहे. हे मान्य करायचे म्हटले, तरीदेखील हे लक्षात घेतलेच पाहिजे की ज्यात आत येणारा कच्चा माल माणूस आहे त्यावर प्रक्रिया करणारी यंत्रसामग्री म्हणजे माणसेच आहेत आणि बाहेर पडणारे अंतिम उत्पादन म्हणजेही माणूसच आहे असा हा व्यवसाय आहे. उत्पादकाने आपल्या उत्पादनाची विक्री करून योग्य किंमत वसूल करावी असे बाजारपेठेच्या अर्थशास्त्राचा नियम सांगतो. इथे ते चुकीचे वाटते. कारण हे म्हणजे एका माणसाची बाजारात विकण्याची किंमत लावून ती दुसऱ्या कुणीतरी वसूल करण्यासारखे झाले! ही गोष्ट मान्य करण्याजोगी वाटत नाही. जागतिकीकरणाच्या युगात बाजारपेठेचे अर्थशास्त्र या शिक्षणक्षेत्राला डोळे मिटून लावायचे म्हटले तर त्यातही एक गफलत होते.

मग यावर उपाय काढण्यासाठी या साध्या सरळ तार्किक साखळीची मोडतोड करावी लागते. स्वयंनिर्भर होण्यासाठी शिक्षणक्षेत्राने प्रथम विद्यार्थ्यांकडून किंमत वसूल करावी आणि शिक्षण संपल्यावर विद्यार्थ्याने बाजारात जाऊन आपले स्वत:चे ज्ञान, शिक्षण अथवा कौशल्य विकून मागाहून ती किंमत वसूल करावी. अशा प्रकारे हा घटनाक्रम मांडला जातो. म्हणजे यात बाहेर पडलेला उच्च शिक्षित तरुण स्वत:च स्वत:चे ज्ञान आणि शिक्षण विकायला बाहेर पडत असल्यामुळे जुन्या काळाच्या गुलामांच्या विक्रीसारखा तो प्रकार भयानक नाही असा आभास निर्माण होतो.

पण प्रत्यक्षात तो त्यापेक्षाही भयानक आहे. कारण या बाजारपेठेत विक्रीला येण्यासाठी त्याने आधीच किंमत मोजलेली आहे. बाजारपेठेत त्याला किती किंमत मिळणार हे त्याच्या हातात नाही. त्यावर अनेक घटकांचा प्रभाव आहे. 'मागणी आणि पुरवठा' या सनातन नियमाचा प्रभाव आहे. आज ज्याला खूप किंमत आहे ते कौशल्य आणि ज्ञान उद्या कवडीमोलाचे ठरण्याचा धोका आहे. बाजारपेठेत होणाऱ्या हेलकाव्यांचा परिणाम आहे. पण हे सारे धोके त्या विद्यार्थ्याने त्याचे त्याने बघावेत,

या अनिश्चिततेला त्याचे त्याने तोंड द्यावे असे धोरण आपण स्वीकारतो आहोत. शिक्षणसंस्थांनी आपली किंमत वसूल करून आपल्या उत्पादनांना म्हणजे उच्च शिक्षित तरुणांना बाहेरच्या तुफानी दर्यात सोडून द्यावे आणि 'आता तुमचे तुम्ही बघा!' असे त्यांना सांगावे अशी ही व्यवस्था आहे!

हे बाजारपेठेचेदेखील अर्थशास्त्र नव्हे. कारण यात शास्त्र कसलेच नाही. हा तर शुद्ध जुगार आहे. तोदेखील या समाजातल्या कोवळ्या विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळलेला. आर्थिक सुस्थिती असलेल्या घरातून आलेल्या विद्यार्थ्यांना हा जुगार थोडा तरी परवडेल, पण गरीब घरातल्या विद्यार्थ्यांचे काय? त्यांचे सारे आयुष्यच पणाला लागलेले असेल. या जुगाराला आपण 'बाजारपेठेचे अर्थशास्त्र' असे म्हणून स्वत:ची फसवणूक करून घेतो आहोत.

हा 'जुगार' वाटू नये म्हणून काही युक्त्या योजण्यात येत आहेत. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांना शिक्षणाचे शुल्क भरणे शक्य व्हावे म्हणून त्यांना कर्ज देण्याच्या सुविधा बँकांनी दिल्या आहेत. ही युक्ती फारच नामी आहे! म्हणजे शिक्षितांच्या फौजा निर्माण करून शिक्षणक्षेत्र समाजाला पुरवते, म्हणून इथल्या अर्थव्यवस्थेला गती मिळते. त्यातून ज्यांना फायदा मिळतो ते श्रीमंत होतात. अशा मंडळींचे पैसे आज बँकांमध्ये पडून आहेत. ते कर्ज म्हणून कोणी उचलत नाही. ते पडून राहिलेले पैसे विद्यार्थ्यांना कर्ज म्हणून द्यायचे. म्हणजे, 'आमचे आज पडून राहिलेले पैसे तू कर्ज म्हणून वापर व त्याआधारे शीक. मग तुझ्या शिक्षणाच्या विक्रीची किंमत ठरवायला तू आमच्या बाजारात ये आणि त्यातून तुला जो मोबदला मिळेल, तो तू कर्जफेड म्हणून आम्हाला परत दे. शिवाय तुझ्या शिक्षणाचा उपयोग करून तू आमच्या अर्थव्यवस्थेचा गाडा जोरात चालव आणि त्यातून आम्हाला फायदा मिळवून दे' असेच जणू आजचा श्रीमंतवर्ग आजच्या विद्यार्थ्यांना सांगतो आहे! इतिहासाच्या ओघात गुलामगिरीची पद्धत आली आणि गेली. वेठबिगारीची पद्धत आली. पण आजच्या जागतिकीकरणाच्या आणि बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेच्या युगात ही जी नवी पद्धत येते आहे, त्याला काय नाव द्यावे? गुलामगिरीच्या आणि वेठबिगारीच्या पद्धतीपेक्षाही ही क्रूर आणि भयानक आहे. वाईट गोष्ट म्हणजे तिचा चेहरा मात्र (चुकीच्या पद्धतीने) 'स्वयंनिर्भरतेचे' तत्त्व सांगणारा आणि व्यावसायिक कार्यक्षमतेचा आभास निर्माण करणारा आहे.

परत एकदा हे सांगितले पाहिजे की इंग्लंड-अमेरिकेची आणि प्रगत पाश्चात्त्य देशांची उदाहरणे देऊन चालणार नाही. त्यांच्या आणि आपल्या अर्थव्यवस्थेची तुलनाच होऊ शकत नाही. आपल्याकडे नजीकच्या भविष्यकाळात जीवनाची सुरुवात करतानाच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले अनेक उच्च शिक्षित तरुण असणार आहेत. हे कर्ज फेडण्याचा दबाव मनावर घेऊन ते आयुष्य सुरू करणार आहेत. मग त्यातले

अनेकजण हे कर्ज फेडण्यासाठी कोणत्याही मार्गाने पैसा मिळवण्याच्या मागे धावत सुटतील. काहीजण आत्महत्येच्या गर्तेकडे तरी ओढले जातील किंवा हातात चूड घेऊन समाज पेटवायला निघालेले जहाल बंडखोर तरी होतील. हे भविष्य दुर्दैवी असले तरी अटळ आहे.

'टायटॅनिक' या प्रसिद्ध इंग्रजी चित्रपटातील एका इंजिनियरच्या तोंडी असलेले वाक्य वापरून बोलायचे झाले, तर 'This is a methematical certainty!'

शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत ही सारी भयानक धोरणे अवलंबिण्यात येत आहेत, कारण जागतिकीकरणाच्या नियमांचे, बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेच्या नियमांचे आपण लावलेले चुकीचे अर्थ. शिक्षणक्षेत्राने 'स्वयंनिर्भर' असावे असे म्हटले तरी ती 'स्वयंनिर्भरता' कशी आणावी? शिक्षणाची किंमत कोणाकडून वसूल करावी?

जागतिकीकरणाच्या आणि बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेच्या जमान्यात एक सूत्र अतिशय उच्चरवाने उच्चारले जाते. 'There is no free lunch.' 'फुकटात जेवण मिळत नाही.' हे सूत्र अनेक गोष्टींच्या संदर्भात सांगितले जाते आणि ते खोटेही नाही. जगात कधीही कोठेही फुकट काहीही मिळण्याची शक्यता नाही. प्रत्येक गोष्टीची किंमत चुकवावीच लागते. खरे म्हणजे हे अगदी सनातन सत्य आहे.

प्रश्न असा आहे की ही किंमत चुकवणार कोण? म्हणजे एखाद्या गोष्टीचा ज्याला लाभ होतो, त्याने ती किंमत चुकवायची की अन्य कोणी? ज्याच्यासमोर जेवणाचे ताट आहे आणि ज्याच्या मुखात घास जातो आहे, त्याने किंमत चुकवायची ही न्याय्य व्यवस्था झाली. पण माझ्या जेवणाची किंमत अन्य कोणी चुकवणे ही अन्याय्य व्यवस्था झाली. संपूर्ण समाजाच्या दृष्टीने पाहता, कोणीतरी त्या जेवणाची किंमत चुकवतो आहे त्यामुळे 'जेवण फुकटात मिळत नाही' हे खरे झाले. पण मला मात्र जेवण फुकटात मिळाले!

शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत असे घडते आहे. शिक्षणक्षेत्रातून जी बौद्धिक संपदा निर्माण होते, त्याचे खरे लाभार्थी आहेत इथल्या आर्थिक क्षेत्रात यशस्वी ठरलेले सर्वजण! ते कारखानदार आहेत; कंपन्यांचे मालक आहेत; व्यापारी आहेत; दुकानदार आहेत; गलेलठ्ठ पगार घेणारे अधिकारी आहेत; एक्झीक्युटीव आहेत; मॅनेजर्स आहेत आणि असे आणखी अनेक आहेत.

पण जागतिकीकरण आणि बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेची विचारसरणी कशी उफराटी आहे बघा! या साऱ्या मंडळींना लाभ व्हावा यासाठी उच्च शिक्षित तरुण समाजात निर्माण व्हायला हवेत. त्याची किंमत मात्र भरायची आहे इथल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना! आणि हे घडणार आहे. 'There is no free lunch' या सूत्राचा आधार घेऊन! म्हणजे आज श्रीमंत असलेल्या मंडळींच्या जेवणाची किंमत

'उद्या तुम्हीही असेच यशस्वी होऊन असेच पैसे कमवाल' अशा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आश्वासनांवर विसंबून या विद्यार्थ्यांनी चुकवायची! याला न्याय्य व्यवस्था म्हणता येईल काय?

काही वर्षांपूर्वी कारखान्यांना आणि कंपन्यांना आपल्या कामांसाठी जी विशिष्ट कौशल्ये लागत; त्यासाठी ते नुकत्याच उत्तीर्ण झालेल्या पदवीधारकांना, इंजिनियर्सना ॲप्रेंटिस म्हणून घेत असत. त्यांना ती कौशल्ये शिकवली जात. त्यासाठी थोडेफार वेतन मिळे आणि नंतर नोकरीची शाश्वती असे. आता अशी सारी कौशल्ये शिकवण्याचे काम 'उपयोजित अभ्यासक्रमां'च्या द्वारे शिक्षणक्षेत्राकडे आले आहे. त्यामुळे हीच नोकरी-धंद्यांसाठीची आवश्यक कौशल्ये शिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी शुल्क भरावयाचे आहे. शिवाय नंतर त्या कौशल्याचा उपयोग होईल अशी नोकरीही त्यांना शोधीत हिंडायचे आहे.

'उपयोजित अभ्यासक्रम' विद्यार्थ्यांना शिकवण्याची कल्पना चुकीची नाही. त्यांची आवश्यकता आहे. फक्त प्रश्न एवढाच की ज्या ज्या उद्योगधंद्यांना अशी कौशल्ये शिकलेल्या तरुणांची आवश्यकता आहे, त्यांना आपण 'There is no free lunch' म्हणून सांगणार आहोत का? अशा उपयोजित शिक्षणासाठीची किंमत त्यांच्याकडून वसूल करणार आहोत का? आजचे धोरण तसे दिसत नाही. उद्योग-धंद्यांसाठी आवश्यक अशी कौशल्ये शिकण्याची किंमत विद्यार्थ्यांनी चुकवायची असे आजचे धोरण आहे.

जागतिकीकरणाच्या जमान्यात 'बौद्धिक संपदेचा अधिकार' हे फार मोलाचे सूत्र आहे. मग शिक्षणक्षेत्रामधून जी बौद्धिक संपदा तयार होते, त्याची किंमत ठरवायला नको काय? आणि या बौद्धिक संपदेचा उपयोग जर समाज आपल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चालवण्यासाठी वापरणार असेल, तर त्याचा मोबदला त्याने शिक्षणक्षेत्राला द्यायला नको काय? शिक्षणक्षेत्राला हा बौद्धिक संपदेचा मोबदला मागण्याचा अधिकार आहे की नाही?

हे खरे आहे की हा मोबदला समाजाकडून — त्यातील अर्थव्यहाराचा लाभ ज्यांना प्रत्यक्षात मिळतो आहे त्यांच्याकडून — वसूल करण्यासाठीची यंत्रणा शिक्षणक्षेत्राकडे नाही. ती निर्माण होण्याची शक्यताही नाही. कारण त्यासाठी आवश्यक असणारी सत्ता शिक्षणक्षेत्राकडे नाही. ती सरकारकडे आहे. म्हणून सरकारने शिक्षणक्षेत्रासाठी केलेला खर्च म्हणजे सरकारी 'अनुदान' नव्हे. खरे तर शालेय शिक्षण असो की उच्च शिक्षण असो, त्यासाठी सरकार जो खर्च करते तो या क्षेत्राचा बौद्धिक संपदेच्या अधिकाराचा मोबदला आहे. किंबहुना शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षणक्षेत्राने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेची किंमत काढली तर ती किती प्रचंड असेल? त्याचा मोबदला नेमका ठरवला

तर तो आज शिक्षणक्षेत्रावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या कितीतरी पटीने जास्त असेल.

सरकारी भूमिका ही एजंटाची आहे. सरकार हे माध्यम आहे. सरकारने शिक्षणावर केलेला खर्च हे उपकार नव्हेत. त्याकडे समाजकल्याणकारी खर्च म्हणूनही बघता कामा नये. ते अनुदानही नव्हे. तर सरकारकडे सत्ता आणि यंत्रणा असल्यामुळे त्याने शिक्षणक्षेत्राने निर्माण केलेल्या उत्पादनांची किंमत बाजारातून वसूल केली आहे व ती रक्कम शिक्षणक्षेत्राला देण्यात येते आहे. शिक्षणक्षेत्र 'स्वयंनिर्भर' असण्याचा खरा अर्थ विद्यार्थ्यांना भरमसाठ शुल्क आकारणे हा नाही, तर सरकारने या क्षेत्राने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचा योग्य मोबदला समाजाकडून वसून करून तो शिक्षणक्षेत्राला देणे हा आहे.

# एक दिवास्वप्न!

जागतिकीकरणाचे युग सुरू झाले, तीव्र स्पर्धेला तोंड देण्याचे युग सुरू झाले आणि चर्चा सुरू झाली ती कार्यक्षमतेने सर्व गोष्टी करण्याच्या आवश्यकतेची. सरकारने करांच्या रूपाने पैसा गोळा करून तो अनुदानांच्या रूपाने समाजासाठी उधळणे चूक आहे, हा विचार बळावत चालला. कल्याणकारी राज्याची कल्पना लयाला गेली. समाजाच्या कल्याणासाठी सरकारने योजना राबवणे कालबाह्य ठरले. याउलट 'समाजाने, त्यातील विविध घटकांनी व त्यातील व्यक्तींनी स्वत:चा विकास स्वत: साधावा. विकास साधण्याची जबाबदारी ज्याची त्याची स्वत:ची आहे, सरकारची नव्हे' असे सांगितले जाऊ लागले.

अर्थातच तीव्र, जीवघेण्या स्पर्धेच्या युगात विकास साधण्यासाठीची चढाओढ समाजाच्या अंतर्गत सुरू झाली. ज्यांना त्यात यशस्वी होणे जमले ते समाजाचे घटक आणि त्या व्यक्ती कर्तृत्ववान. ज्यांना जमले नाही ते सारे कर्तृत्वहीन! समाजाच्या विकासाचे गतिशास्त्र मोजण्याचे इतके साधे, सोपे सूत्र उदयाला आले.

अर्थात, मागे पडणाऱ्यांनीही आपले कर्तृत्व वाढवावे, परिश्रम वाढवावेत. त्यांना तो हक्क जरूर आहे. एवढेच नव्हे तर या स्पर्धेच्या तत्त्वज्ञानात त्यांना आपले कर्तृत्व अधिकाधिक वाढवण्याची प्रेरणा आहे. कारण फक्त कर्तृत्व आणि परिश्रम यांच्या आधारावरच विकास होत असल्यामुळे व सरकारी मदतीच्या आधारावर या गोष्टी 'आयत्या' मिळण्याची सोय नसल्यामुळे प्रत्येकजण अधिकाधिक कार्यतत्पर होत जाईल. अधिकाधिक परिश्रम करीत जाईल व त्यामुळे (जरी काही कर्तृत्वहीन व्यक्ती मागे पडल्या व समाजांचे कर्तृत्वहीन घटक नष्ट झाले) तरी एकूण समाजाची उन्नतीच होईल. तीव्र स्पर्धेचे समर्थन करणाऱ्या व कल्याणकारी राज्याची कल्पना ताज्य ठरवणाऱ्या आजच्या जागतिकीकरणाच्या युगाचे हे तत्त्वज्ञान आहे.

अगदी साध्या शब्दांत सांगायचे तर हे जंगलच्या कायद्याचे तत्त्वज्ञान आहे. याचे मूल्यात्मक विश्लेषण बाजूला ठेवा. हे तत्त्वज्ञान नैतिकदृष्ट्या योग्य की अयोग्य, चांगले की वाईट हे प्रश्न बाजूला ठेवा. पण जर या तत्त्वज्ञानाचा आपण स्वीकार केला असेल तर त्याचा नेमका अर्थ तरी समजावून घ्यायला नको का? त्यातून जे धोरणात्मक निर्णय आपण घेणार ते आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या हिताचे कसे

असतील हे आपण बघायला नको का? बाकी क्षेत्रांवर या नव्या तत्त्वज्ञानाचा परिणाम काय होतो आहे याचा विचार सध्या बाजूला ठेऊ. पण शिक्षणक्षेत्रावर कोणता परिणाम होतो आहे?

उच्च शिक्षण हे व्यक्तीच्या व समाजघटकांच्या विकासाचे साधन आहे. आपल्या समाजात तर ते सर्वांत महत्त्वाचे, किंबहुना एकमेव असे साधन आहे. या तत्त्वानुसार हे साधन कोणाला मिळणार? हे विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वावर ठरणार. हे कर्तृत्व कोणते?

या प्रश्नाचे आपण काढलेले उत्तर अजब आहे! हे कर्तृत्व मुख्यत: त्यांच्या पालकांचे असायला हवे. पालक जर श्रीमंत असतील तर याचा अर्थ ते कर्तृत्ववान आहेतच! मग त्यांच्या मुलांना उच्च शिक्षणाचे साधन हस्तगत करण्याचा हक्क असेल. किंवा आपल्या मुलाला शिक्षणासाठी कर्ज मिळवून देण्याइतकी ऐपत त्यांच्याकडे असेल आणि आयुष्याच्या सुरुवातीलाच कर्जबाजारी बनून नोकऱ्यांच्या बाजारपेठेत येण्याची त्या मुलांची तयारी असेल तर 'खास सवलत' म्हणून त्यांना शिक्षणासाठी कर्ज काढता येईल व हे विकासाचे साधन हस्तगत करता येईल.

विद्यार्थ्यांचे कर्तृत्व म्हणजे त्यांनी स्वत: मिळवलेले परीक्षेतील गुण हा मापदंड आता असा दुय्यम स्थानावर गेला आहे. निरर्थक झाला आहे. नाही म्हणायला नैवेद्य दाखवल्यासारख्या दोन-पाच टक्के जागांसाठी शिष्यवृत्या ठेवता येतील. गुणवंत आणि गरिबाघरच्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी चढाओढ करावी. पण बाकी बहुसंख्य विद्यार्थ्यांना विकासाचे हे साधन मिळण्याचा एकमेव निकष म्हणजे त्यांच्या पालकांची आर्थिक सुस्थिती. म्हणजेच पालकांचे कर्तृत्व!

याचे कारण हे की सरकारकडे पैसा नाही. अधिक नेमकेपणाने बोलायचे तर सरकारकडे शिक्षणासाठी — आणि त्यातूनही उच्च शिक्षणासाठी — पैसा नाही. नवीन जागतिकीकरणाच्या जमान्यात समाजाची उन्नती होत असेल; समाजातील पैसा आणि संपत्ती वाढत असेल, पण सरकार गरीब-गरीब होत जाते! मग त्याला प्रत्येक पैन्‌पै काळजीपूर्वक खर्च करावी लागते. खर्च होत असलेल्या आपल्या प्रत्येक पैशाचा आढावा घेऊन शक्य असेल तिथे खर्च वाचवणे सरकारला आवश्यक आहे. शैक्षणिकदृष्ट्या आणि समाजाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांचे उच्च शिक्षण बंद करण्याचे ठरवण्याचा अधिकार सरकारला आहे. कारण त्यासाठी सरकार पैसे खर्च करू शकत नाही. उच्च शिक्षणासाठी नेमावयाच्या शिक्षकांची संख्या कमी कमी करत जाण्याचा अधिकार सरकारला आहे; कारण सरकारकडे खर्च करायला पैसा नाही. शालेय शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर कंत्राटी पद्धतीने नेमण्याचा सरकारला अधिकार आहे; कारण सरकारकडे पैसा नाही. 'या धोरणामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होईल' असे या क्षेत्रातील धुरिणांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी कितीही ओरडून

सांगितले तरी त्याकडे दुर्लक्ष करण्याचा सरकारी अधिकाऱ्यांना अधिकार आहे. कारण खर्च कमी करण्याचे सरकारचे धोरण आहे, असा त्यांना आदेश देण्यात आला आहे. कारण सरकारकडे पैसा नाही.

शिक्षणावरचा खर्च कमी करण्याच्या सरकारच्या धोरणाबद्दल आपले काहीही मत असले तरी ज्या नेटाने सरकार हे धोरण राबवीत आहे ते पाहिले की कौतुक वाटल्यावाचून राहत नाही. सरकारी तिजोरीतील जी गंगाजळी शिक्षणाच्या दिशेने वाहते, तिच्या मार्गातल्या झिरपणाऱ्या अगदी छोट्या छोट्या वाटा शोधून त्या बुजवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची खटपट पाहिली की त्यांचे कौतुक वाटल्यावाचून राहत नाही. आपल्या निर्णयांमुळे भविष्यात शिक्षणक्षेत्रावर व समाजावर वाईट परिणाम होतील हे शिक्षणतज्ज्ञांकडून ऐकूनदेखील त्याकडे दुर्लक्ष करून सरकारने सांगितलेले धोरण धडाक्याने राबवण्याचा प्रयत्न करणारी मंडळी पाहिली की त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक वाटल्यावाचून राहत नाही!

पण मग एक मोठा प्रश्न पडतो. आपल्या खर्चाचा सतत आढावा घेत राहण्याचे आणि निरर्थक खर्च बंद करण्याचे हे सरकारचे धोरण सुसंगत का नाही? ते सर्वत्र तितक्याच नेटाने का अवलंबिले जात नाही? म्हणजे राजकीय सोयीसाठी आणि निवडणुकीच्या राजकारणासाठी समाजाच्या काही घटकांवर (विशेषत: निवडणुका जवळ येताच) सरकारी कृपेचा वर्षाव होत राहतो ते सोडा. लोकशाही राज्यव्यवस्थेत अशा गोष्टी घडणारच हे आपण समजून घेऊया. वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले असतील तर सरकारमधले मंत्री किंवा शासनाचे अधिकारी त्या ठिकाणी किती खर्च होतो याकडे डोळेझाक करतात हे आपण समजून घेऊया; कारण ही मानवी स्वभावाची कमतरता आहे.

पण एक गोष्ट अशी आहे की जिथे भलेथोरले भगदाड पडल्याप्रमाणे सरकारी तिजोरीतला पैसा धो धो वाहतो आहे; तिथे या पैशापासून समाजाला फायदा काय याचा विचारही केला जात नाही. हा खर्च होणारा पैसा वाचवता येईल का असा प्रश्नही कोणी उपस्थित करीत नाही. समाजानेही या खर्चाला मान्यता दिली आहे.

मी 'संरक्षण' या नावाखाली होणाऱ्या खर्चाबद्दल बोलतो आहे.

इथे केंद्र सरकारचा खर्च आणि राज्य-सरकारचा खर्च असा फरक करण्याचे काहीच कारण नाही. एकाचे धोरण पैन्‌पै वाचवण्याचे आणि एकाचे पैसे निष्कारण उधळण्याचे असण्याचे काहीच कारण नाही. केंद्राचा पैसा वाचला तर शिक्षणासाठी अधिक खर्च करण्याकरता त्यातून राज्य-सरकारांना मदत मिळू शकेल. पैसा शेवटी राष्ट्राचा आहे. समाजातून गोळा केलेला आहे.

पण याच पैशातून आपण कोट्यवधी रुपये संरक्षणाच्या नावाखाली खर्च करतो

आहोत. संहाराची साधने विकत घेतो आहोत. अशी साधने देशात निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. संहाराची नवी आणि अधिकाधिक प्रभावी साधने देशातच विकसित करावीत यासाठी संशोधनाचे प्रकल्प राबवीत आहोत. देशातील अनेक श्रेष्ठ संशोधकांची बुद्धिमत्ता या कामासाठी वापरीत आहोत. आपले पैसे आणि आपली बौद्धिक संपदा या कारणासाठी वापरीत आहोत. आपल्या जवानांची फौज अधिक सक्षम करण्यासाठी पैसा खर्चत आहोत. सीमेवरच्या खडतर वातावरणात त्यांना नेण्यासाठी पैसे खर्चत आहोत. तिथे त्यांनी लढण्यासाठी सक्षम राहावे म्हणून पैसे खर्चत आहोत. त्यांचे प्रशिक्षण उत्तम दर्जाचे असावे म्हणून पैसे खर्चत आहोत.

हे सारे आपण का करीत आहोत?

आपण हे सारे करीत आहोत याचे मुख्य कारण म्हणजे पाकिस्तान ते करीत आहे. पाकिस्तान हे सारे करीत आहे, याचे मुख्य कारण म्हणजे आपण ते करीत आहोत.

पाकिस्तानची परिस्थिती आपल्यापेक्षा काय वेगळी आहे? असलीच तर ती काकणभर वाईटच आहे. तिथेदेखील भूक आणि दारिद्र्य यांचेच साम्राज्य आहे. तिथेदेखील अकल्पनीय विषमता आहे. महालात राहणारे मूठभर आणि झोपड्यात राहणारे अगणित असे चित्र तिथेही आहे. जागतिकीकरणाच्या धडकांनी तिथली समाजव्यवस्थादेखील हादरते आहे. खिळखिळी होते आहे. शिक्षण आणि तत्सम योजनांवरच्या सरकारी खर्चाला कात्री लावण्याची परिस्थिती तिथेही आहे.

त्याचबरोबर भविष्यासाठी उच्च शिक्षण हाच एकमेव आधार सामान्यजनांना आहे, ही गोष्टदेखील दोन्हीकडे समान आहे आणि शिक्षणाच्या संधी सामान्यांपासून दुरावत जाण्याची अवस्था दोन्हीकडे समान आहे. आधी म्हटल्याप्रमाणे फरक असेल तर इतकाच आहे की पाकिस्तानची परिस्थिती आपल्यापेक्षा वाईट आहे. म्हणजे नापास होताना आपल्याला थोडे जास्त गुण मिळून आपण नापास झालो, एवढेच श्रेय कदाचित आपल्याला घेता येईल!

असे असूनही पाकिस्तान आणि आपण दोघेही संरक्षण खर्चाच्या नावाखाली प्रचंड खर्च करीत आहोत आणि याची खरोखर जरुरी आहे काय? हा प्रश्न दोन्हीकडे कोणीही विचारीत नाही. याचे कारण असे तर नाही की परस्परांविषयीच्या द्वेषाने आपण आंधळे झालो आहोत? इतिहासाच्या भुताने दोन्ही ठिकाणी लोकांना इतके झपाटले आहे की वर्तमानाच्या प्रश्नांकडे आपले लक्षच जात नाही? राजकीय स्वार्थासाठी समाजाला चुकीच्या मार्गाने नेणारे राजकारणी दोन्हीकडे आहेत आणि सामान्य जनता मेंढराप्रमाणे त्यांच्या मागे धावते आहे?

याचे कारण असे तर नाही की, इतिहासातल्या लढाया आजदेखील लढून त्यातले लुटुपुटीचे विजय आपल्याला विखारी उन्माद आणीत आहेत? आणि त्या प्राचीन

लढायांतील पराभवाचा सूड आज घेण्यांची कल्पना आपल्याला आजही झपाटून टाकते आहे? याचे कारण हे तर नाही की, राष्ट्रप्रेमाची चुकीची कल्पना आपण कवटाळून बसलो आहोत? युद्धज्वराची भाषा बोलणारे, शब्दातून आणि कृतीतून द्वेषाचे विष पेरणारे यांना आपण राष्ट्रभक्त समजतो आहोत?

याचे कारण हे तर नव्हे की वर्तमानातल्या वस्तुस्थितीचा व समस्यांचा विचार करणे आपल्याला कठीण वाटत असल्यामुळे दोन राष्ट्रांमधल्या, दोन धर्मांमधल्या द्वेषाची भावना चेतावून त्या आधारे आपण आपले मानसिक समाधान करून घेत आहोत?

खरे तर ज्ञानाच्या उद्योगधंद्यांचे युग आले आहे. 'नॉलेज इंडस्ट्री'चे युग आले आहे. त्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता आणि क्षमता दोन्हीकडे आहे. भारताने या क्षेत्रात लक्षणीय यश मिळवले, कारण शिक्षणाचा प्रसार इथे मोठ्या प्रमाणावर झाला होता. भारत आपले हे यश अधिक उज्ज्वल करू शकेल आणि या क्षेत्रात भारताच्या जोडीलाच पाकिस्तानही येऊ शकेल. जर भारतासारखी शिक्षणाचा प्रसार आणि विकास करण्याची धोरणे पाकिस्तानने अवलंबिली तर त्यालाही हे यश तितक्याच प्रमाणात मिळवता येईल. भारत-पाकिस्तान हा उपखंड या 'नॉलेज इंडस्ट्री'च्या जमान्यात साऱ्या जगात आघाडी घेऊ शकेल. त्यातून या उपखंडात सुबत्ता येऊ शकेल. भूक आणि दारिद्र्य मिटू शकेल.

पण या साऱ्या शक्यता आपण आपल्या हातांनी धुळीला मिळवतो आहोत. ज्या पैशांच्या साहाय्याने शिक्षणाच्या सुविधा पुरवता येतील त्याच पैशांच्या साहाय्याने आपण परस्परांच्या संहाराची साधने विकत घेतो आहोत; निर्माण करतो आहोत. एक कथा लहानपणी ऐकली होती. त्या वयात एक विनोदी कथा म्हणून ती हसून सोडून दिली होती. त्यात वस्तुस्थितीच्या जवळ जाणारे सत्य दडले असेल असे तेव्हा वाटले नव्हते. आज ते लक्षात येते आहे.

एका गावात दोन सख्खे भाऊ राहत होते. ते सतत भांडत असत. एकमेकांचा द्वेष करीत असत. दोघेही गरिबीत कसेबसे दिवस काढीत होते. पण त्यांचा बहुतेक वेळ एकमेकांशी भांडण्यातच जात असे. एकदा परमेश्वराला दोघांची दया आली. त्याला वाटले या दोघांच्या जीवनाचे भले करावे आणि त्यांना द्वेषबुद्धी सोडण्यासही शिकवावे.

परमेश्वर प्रकट झाला आणि त्यांना म्हणाला, 'भांडू नका. मी तुमच्यावर प्रसन्न आहे. तुमच्यापैकी प्रत्येकाची मी एक एक इच्छा पूर्ण करेन. मात्र एक लक्षात ठेवा. एकाला मी जितके देईन त्याच्या दुप्पट दुसऱ्याला मिळेल.'

दोघा भावांनी विचार केला. 'माझा एक डोळा फोड!' एक भाऊ म्हणाला. तो

एका डोळ्याने आंधळा झाला, दुसरा दोन्ही डोळ्यांनी आंधळा झाला. 'माझा एक पाय लुळा कर!' दुसरा भाऊ म्हणाला. पहिल्याचे दोन्ही पाय लुळे झाले. प्रत्यक्ष परमेश्वर वर देण्यासाठी समोर आला पण दोघेही भाऊ आंधळे आणि लुळे-पांगळे झाले! भारत आणि पाकिस्तान आज तीच चूक करीत आहेत.

'नॉलेज इंडस्ट्री'च्या जमान्यात आपण आघाडी घेऊ शकतो. पहिली औद्योगिक क्रांती युरोपात झाली. तिची फक्त वाईट फळेच आपल्यापर्यंत पोचली. इलेक्ट्रॉनिक्समधली क्रांती आपल्याला हुलकावणी देऊन गेली. तिचे फायदे जपान, कोरिया, बँकॉक या क्षेत्राला मिळाले. आता पुढची क्रांती आली आहे. तिथे आपल्याला संधी आहे. भारत-पाक या भूखंडाला संधी आहे. आपण ती साधणार की गमावणार हा प्रश्न आहे.

पण ज्या वेळेला 'नॉलेज इंडस्ट्री'चा जमाना आला आहे, त्याच वेळेला जागतिकीकरणाचा जमानाही आला आहे. जंगलचा कायदा उघडपणे जगात स्वीकारला जाण्याचा जमाना आहे. अशा जगात फारच काळजीपूर्वक वागावे लागते. विचारपूर्वक धोरणे ठरवावी लागतात. स्ट्रॅटेजी ठरवावी लागते. कारण जंगलचा कायदा असलेल्या जगात चुकीला क्षमा नाही. दुसरी संधी मिळण्याची शक्यता नाही. 'एक तर यशस्वी व्हा किंवा नष्ट व्हा' असे दोनच पर्याय तिथे असतात. म्हणून आता मिळालेली संधी आपल्या कर्माने घालवणे दोन्ही देशांना फार महाग पडेल. कदाचित ही शेवटची संधी असेल.

भारत-पाकिस्तान संबंधांचा विचार करताना काश्मीर प्रश्नाचा उल्लेख टाळून चालणार नाही. तो कळीचा मुद्दा बनला आहे. दोन्ही बाजूंच्या त्यावरच्या भूमिका ठाम आहेत. या प्रश्नावर दोन्हीकडच्या लोकांच्या भावना तीव्र आहेत. या प्रश्नावरून युद्धे लढली गेली आहेत. दोन्ही बाजूंची माणसे मारली गेली आहेत. बाँबस्फोट झाले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर एकमेकांच्या विरोधात डावपेच केले गेले आहेत. राजनैतिक दडपणाचे शस्त्र वापरून एकमेकांना नामोहरम करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या प्रश्नाची गुंतागुंत फार विचित्र आहे.

पण या प्रश्नाचे आजच्या घडीला खरे स्वरूप काय आहे? काश्मीरमधील जनतेने हिंदुस्थानातील दारिद्र्यात पिचत रहावे की पाकिस्तानातील गरिबीत खितपत आयुष्य काढावे असा तो प्रश्न आहे! दोन्ही बाजू म्हणत आहेत की आमच्या देशातील दारिद्र्य काश्मीरमधील जनतेला उपभोगू द्या!

या प्रश्नाचा वेगळ्या पद्धतीने विचार करायला काय हरकत आहे? पन्नास वर्षे या प्रश्नावर एवढा वेळ आणि पैसा खर्च झाला; इतक्या माणसांचे प्राण खर्च झाले; रक्त वाहिले; युद्धे झाली. सामान्य माणसांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली. पण त्यातून निष्पन्न काय झाले? परिस्थिती आहे तशीच आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी

जितके प्रयत्न करावे तेवढा तो बिकट होत चालला आहे आणि आज तर असे घडण्याची शक्यता आहे की या प्रश्नाचे ऑबसेशन दोन्ही देशांनी कायम ठेवले तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून हाताशी आलेली एक संधी दोन्ही देश गमावून बसतील.

त्यापेक्षा हा प्रश्न बाजूला ठेऊन पुढची पंचवीस-तीस वर्षे वाटचाल करण्याचे दोन्ही देशांनी का ठरवू नये? काश्मीर प्रश्नाबाबतच्या आपआपल्या भूमिका कायम ठेवून, त्यात कोणतीही तडजोड न करता दोन्ही देशांनी असे का ठरवू नये की पुढची पंचवीस वर्षे आम्ही 'नॉलेज इंडस्ट्री'तील आमचे स्थान आघाडीवर राहावे यासाठी वापरू: त्यानंतर परिस्थिती बदलेल; सुधारेल. नवी अधिक सुजाण पिढी दोन्ही देशांचे नेतृत्व करीत असेल. त्या वेळेला हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पन्नास वर्षे वितुष्ट जोपासत ठेवून हा प्रश्न सुटला नाही. पंचवीस वर्षे तो बाजूला ठेवून आमचे अन्य प्रश्न सोडवण्यासाठी झटू आणि मग या प्रश्नात पुन्हा डोके घालू.

खरे तर माणसे आणि माणसांनी बनलेले समाज असा निर्णय अनेकदा घेत असतात. कधी जाणीवपूर्वक, कधी अजाणता. समाजांच्या प्रगतीचा आलेख कधीच एका सरळ रेषेत नसतो. वाटेत येणारे सर्व प्रश्न सोडवीत जणू आखीव मार्गावर चालल्याप्रमाणे इतिहास कधीच पुढे जात नाही. कधी कधी अवघड प्रश्नांना वळसा घालून पुढे जावे लागते आणि मग अचानक तो अवघड प्रश्नदेखील सोडवण्याचा मार्ग सापडून जातो.

मानवी समाजाच्या प्रश्नांचे सोडा, विज्ञानाची सारी प्रगती तार्किक पद्धतीने व्हायला पाहिजे. कारण प्रयोग आणि तर्क हाच विज्ञानाचा आधार आहे. तिथे तरी प्रगती सरळ रेषेत होत असेल असे आपल्याला वाटेल. समोर दिसणारा एक एक प्रश्न सोडवून वैज्ञानिक पुढे सरकत असतील असे वाटत असेल. पण आश्चर्य म्हणजे हे वैज्ञानिक प्रगतीच्या बाबतीतदेखील खरे नाही.

सोडवण्यासारखे प्रश्न घेऊन वैज्ञानिक त्यावर काम करीत राहतात आणि मग अचानक एखादा मोठा प्रश्न सुटतो. लुई पाश्चरने लस टोचण्याचे तंत्र शोधले आणि जंतुसंसर्गापासून होणाऱ्या साऱ्या भयानक रोगांपासून मानवजातीची मुक्तता केली. पण 'मी आता मानवजातीला भेडसावणारा हा जटिल प्रश्न सोडवतो' असे म्हणून तो कामाला लागला नाही! त्याचे काम सुरू झाले दारू आंबण्याच्या प्रक्रियेतील काही समस्यांमधून. मग त्याने रेशमाच्या किड्यांवर काम केले. शेळ्यांना होणाऱ्या 'अन्थ्रॅक्स' रोगावर काम सुरू केले आणि त्यातून त्याला माणसाला जंतुसंसर्गापासून होणाऱ्या रोगांच्या साथीतून मुक्त करणारा 'लस टोचण्या'सारखा सोपा आणि स्वस्त मार्ग सापडला.

अशा अनेक कथा विज्ञानाच्या प्रगतीच्या मार्गावर आहेत. मानवी समाजांच्या

प्रगतीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे काश्मीर प्रश्नासारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नाच्या मागे न लागता जो दारिद्र्याचा आणि भुकेचा प्रश्न दोन्ही देशांना आज सोडवता येण्यासारखा आहे तिकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. 'नॉलेज इंडस्ट्री'च्या जमान्यात हा प्रश्न सुटण्यासारखा आहे म्हणून तो सोडवण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

मात्र त्यासाठी दोन्हीकडच्या सत्ताधाऱ्यांना व राजकारण्यांना हे पटले पाहिजे. त्यासाठी दोन्हीकडच्या सामान्य जनतेला हे पटले पाहिजे. संरक्षणखर्चाच्या नावाखाली संहाराची साधने जमा करण्याचा जो खर्च आपल्याकडून जमा केलेल्या पैशातून सत्ताधारी करीत असतात, त्यातून फक्त शस्त्रास्त्रांच्या दलालांची धन होते व आपल्याला कोणताही फायदा होत नाही, हे दोन्हीकडच्या लोकांना उमजले पाहिजे. हा खर्च कमी केला तर आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाची चांगली सोय होईल व आपल्या देशातील दारिद्र्याचा प्रश्न सुटू शकेल हे सामान्य माणसांना पटले पाहिजे.

हे सत्य सांगणारे सुजाण नेते आणि विचारवत दोन्हीकडे निर्माण झाले पाहिजेत आणि हे सत्य सांगण्याचे धैर्य त्यांना प्राप्त झाले पाहिजे. आगखाऊ विखारी भाषणे करणारे नेते हे राष्ट्रभक्त असा राष्ट्रभक्तीचा अर्थ न लावण्याचे दोन्हीकडच्या समाजांना कळले पाहिजे. उलट राष्ट्रभक्तीचा अर्थ देशाच्या उद्धाराचा मार्ग चोखाळणे, शांतता प्रस्थापित करणे, सुबत्ता आणणे हा आहे. राष्ट्रभक्ती सुजाण विचारात आहे हे दोन्हीकडच्या लोकांना पटले पाहिजे.

हो! ही गोष्ट अशक्य वाटते आहे. हे आज एक दिवास्वप्न वाटते आहे. पण प्राणिमात्रांनासुद्धा आपल्या अपत्यांचे हित-अहित कळते आणि त्यांच्या हितासाठी प्राणीसुद्धा जरूर असेल तर संघर्ष करतात. मग दोन्हीकडच्या सामान्य जनतेने द्वेषभावनेच्या पोटी सुजाणपणाला इतकी सोडचिठ्ठी दिली आहे का की आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाचीसुद्धा त्यांना फिकीर वाटणार नाही? आपल्या देशातल्या पुढल्या पिढ्यांची काळजीसुद्धा त्यांना वाटणार नाही का? मला तसे वाटत नाही. म्हणूनच मी हे दिवास्वप्न बघतो आहे. भारत-पाकिस्तान या दोन देशांत शिक्षणाच्या — विशेषत: उच्च शिक्षणाच्या — पातळीवर सहकार्य व्हायला हवे. दोन्हीकडचे विद्यार्थी आणि शिक्षक यांची देवाणघेवाण व्हायला हवी. दोन्हीकडची विद्यापीठे जवळ यायला हवीत. त्यांच्यात अनुभवांचे आदानप्रदान व्हायला हवे. विद्यापीठांच्या संघांचे आपापसात सामने भरवायला हवेत. 'प्रश्न मंजूषे'सारखे बुद्धीला आव्हान देणारे उपक्रम व्हायला हवेत. शिक्षकांचे प्रशिक्षण करण्याच्या कार्यक्रमात त्यांनी एकमेकांचे सहकार्य घ्यायला तयार व्हावे. भारत-पाकिस्तान यांना जवळ आणू इच्छिणारी मंडळी क्रिकेटसारख्या खेळाच्या क्षेत्राची नेहमी भलावण करतात. सिनेमा व सिनेकलावंत किंवा गायक वगैरे कलाकारांच्या साहाय्याने सेतू उभारू पाहतात. कला आणि क्रीडा

या प्रकारांमध्ये हे सामर्थ्य जरूर आहे.

पण शिक्षणक्षेत्रातही·हे सामर्थ्य आहे. किंबहुना त्यातून जे सामंजस्याचे वातावरण निर्माण होईल ते कदाचित अधिक टिकाऊ असेल. असे वातावरण निर्माण करण्यासाठी शिक्षणक्षेत्राला कदाचित जास्त वेळ लागेल. पण त्यातून मिळणारे लाभ अधिक चिरस्थायी असतील. हे समंजस वातावरण निर्माण झाले तर दोन्ही देशांमधली वितुष्टाची भावना कमी होत जाईल. सरंक्षणासाठीचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी करता येईल आणि हा वाचलेला पैसा शिक्षणासारख्या विधायक कामासाठी वापरता येईल. सरकारकडे पैसा नाही म्हणून शिक्षणावर पैसा खर्च करताना पैन्पैचा हिशेब करण्याच्या आणि अशैक्षणिक धोरणे अवलंबून या खर्चात काटकसर करण्याच्या आजच्या परिस्थितीत फरक पडेल.

हे आहे माझे एक दिवास्वप्न!

# काय करायला हवे?

जागतिकीकरण आणि बाजारपेठेची अर्थव्यवस्था या दोन्ही गोष्टी हातात हात घालून एकत्रितपणे आलेल्या गोष्टी आहेत. बाजारपेठेचे अर्थशास्त्र योग्य की अयोग्य या प्रश्नाची चर्चा आपण इथे करीत नाही. जागतिकीकरण स्वीकारावे की नाही, या प्रश्नाची चर्चा इथे आपण करीत नाही. कारण व्यवहारात अशी चर्चा निरर्थक आहे.

एक नावाडी एका प्रकांड पंडिताला नावेतून घेऊन चालला होता. थोड्या वेळाने पंडिताने त्या नावाड्याला विचारले, 'तुला काव्यशास्त्र येते काय?' नावाडी म्हणाला, 'नाही, ब्राह्मणदेवता.' पंडित म्हणाला, 'अरेरे! तुझे पाव आयुष्य फुकट गेले!' जरा वेळाने पंडिताने विचारले, 'तुला तर्कशास्त्र येते काय?' नावाडी म्हणाला, 'नाही ब्राह्मणदेवता.' पंडित म्हणाला, 'अरेरे! तुझे अर्धे आयुष्य फुकट गेले!' जरा वेळाने पंडिताने नावाड्याला विचारले, 'तुला नीतिशास्त्र येते काय?' नावाडी म्हणाला, 'नाही ब्राह्मणदेवता.' पंडित म्हणाला, 'अरेरे! तुझे पाऊण आयुष्य फुकट गेले!'

तेवढ्यात सोसाट्याचा वारा सुटला. नाव हेलकावे खाऊ लागली. आकाशात ढग दाटून आले. वादळांची आणि पावसाची लक्षणे दिसू लागली. नाव तर प्रवाहाच्या मध्यावर होती. नावाड्याने विचारले, 'ब्राह्मणदेवता तुम्हाला पोहायला येते काय?' पंडित म्हणाला, 'नाही बाबा!' नावाडी म्हणाला, 'अरेरे! तुमचे सारे आयुष्य फुकट गेले!'

आज जेव्हा जागतिकीकरणाचे आणि बाजारपेठेच्या अर्थशास्त्राचे वादळ साऱ्या जगभर घोंघावते आहे, तेव्हा ते योग्य की अयोग्य, स्वीकारावे की नाही असे पर्याय अस्तित्वातच नाहीत. बाजारपेठेच्या अर्थशास्त्राची उभारणी 'माणसांना जास्तीतजास्त कर्तृत्व दाखवण्यासाठी वाव देण्यात यावा' या संकल्पनेवर आधारलेली आहे. असे कर्तृत्व दाखवण्याला अडथळे असणार नाहीत, विरोध होणार नाही अशा प्रकारे अर्थव्यवहाराचे नियम हवेत अशी बाजारपेठेच्या अर्थशास्त्राची मागणी आहे. व्यक्तीला आपले कर्तृत्व दाखवण्याला प्रोत्साहन मिळावे अशा पद्धतीने समाजव्यवहाराचे नियम असावेत अशी या अर्थशास्त्राची अपेक्षा आहे.

यात चुकीचे काहीच नाही. ज्याला विरोध करावा, जी स्वीकारण्यासाठी खळखळ करावी असे या विचारसरणीत काय आहे? कर्तृत्ववान व्यक्तींनी आपले कर्तृत्व

दाखवले, त्यांना तशी संधी मिळाली, तेव्हाच याआधी समाजाची प्रगती झाली होती ना? त्यातूनच तर मानवी संस्कृती फुलत गेली ना? मग व्यक्तीच्या कर्तृत्वाला जास्तीतजास्त वाव देणारी आणि त्यावर निर्बंध नसावेत असे मानणारी अर्थव्यवस्था नि:संशय चांगलीच आहे; असे म्हणण्यात अडचण कोणती?

अडचण आहे ती पुढे आहे! कारण या बाजारपेठेच्या अर्थशास्त्राच्या विचारसरणीचा पुढचा भाग असा आहे की 'नफा मिळवण्याची प्रेरणा हीच माणसाला अधिकाधिक कर्तृत्व दाखवण्यासाठी असणारी प्रेरणा आहे.' अर्थातच, जास्तीतजास्त कर्तृत्व दाखवण्यासाठी वाव असणारी व त्यासाठी कमीतकमी अडथळे असणारी अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था म्हणजे अनिर्बंध नफेखोरीला वाव देणारी व्यवस्था होय. समाजाच्या कल्याणासाठी किंवा समाजातील दुर्बल घटकांना विकासाची संधी देण्यासाठी काही नियम करणे हे कर्तृत्ववान माणसांच्या कर्तृत्व दाखवण्यावर बंधने आणण्यासारखे असते. म्हणून असे नियम न करणे योग्य असे या विचारसरणीत अनुस्यूत आहे. स्वार्थाची प्रेरणा, नफा मिळवण्याची प्रेरणा यातूनच समाजाच्या विकासाचा गाडा पुढे सरकत असतो असे या विचारसरणीत गृहीत आहे.

खरे म्हणजे हे चुकीचे आहे. स्वार्थ आणि नफा मिळवण्याची प्रेरणा या गोष्टी माणसाला काम करण्यासाठी प्रोत्साहन देतात. हे खरे असले तरी माणसाच्या कर्तृत्वाला खरा बहर केव्हा येतो? माणसे जेव्हा नफ्यातोट्याच्या हिशोबापलीकडे जातात, स्वार्थ्याच्या पलीकडे जातात आणि एखाद्या कल्पनेने, एखाद्या स्वप्नाने झपाटून जाऊन काम करू लागतात, तेव्हाच त्यांच्या कर्तृत्वाला खरा बहर येतो. अशा प्रकारे काम करणारी माणसेच मानवी संस्कृतीत भर घालतात. जेव्हा समाज अशा प्रकारे एखाद्या स्वप्नाने झपाटून जातो तेव्हाच तो कर्तृत्वाच्या शिखरावर पोचतो अशी इतिहासाची साक्ष आहे.

आपल्या संस्कृतीतदेखील जे पुरुषार्थ सांगितले आहेत; ज्या प्रेरणा सांगितल्या आहेत त्यातील पहिली आहे 'अर्थ' व दुसरी आहे 'काम'. पण या प्रेरणा अनिर्बंध असाव्यात हे आपल्या संस्कृतीला मान्य नाही. कारण 'अर्थ' आणि 'काम' या दोन प्रेरणांना संयमित करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवून त्यांचे अस्तित्व स्वीकारणे हाच तर मानवी संस्कृतीचा आधार आहे. स्वार्थ आणि नफेखोरी यांना अनिर्बंध वाव देणाऱ्या व्यवस्थेतून फक्त चंगळवादच फोफावू शकतो. जीवघेणी स्पर्धा बळावू शकते. जंगलचा कायदा प्रस्थापित होऊ शकतो आणि आज तेच घडते आहे.

पण म्हणून 'बाजारपेठेचे अर्थशास्त्र आम्हाला मान्य नाही. ते आम्ही स्वीकारणार नाही' असे म्हणून चालणार नाही. कारण जागतिकीकरणाच्या नावाखाली या अर्थशास्त्राचा रथ साऱ्या जगभर हिंडतो आहे. कोणालाही त्यापासून मुक्तता नाही.

सुटका नाही. आणि या अर्थव्यवस्थेची विचारसरणी इतकी निर्दय आणि क्रूर आहे की वाटेत येणाऱ्या कोणालाही चिरडून पुढे जायला तिला काही वाटणार नाही.

म्हणून आता प्रथम गरज आहे ती या वादळाला तोंड देण्याची. या जंगलचा कायदा उघडपणे प्रस्थापित होत असलेल्या जगात स्वत:ला टिकवून ठेवण्याची, सबळ करण्याची. नाव प्रवाहाच्या मध्यावर आलेली असताना जर वादळ सुटले असेल तर काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र यांच्या अभ्यासाचा उपयोग नाही. तिथे पोहण्याची विद्या यावी लागते! त्यामुळे या जागतिकीकरणाच्या जमान्यात, तीव्र जीवघेण्या स्पर्धेच्या युगात आपल्या देशाने कोणते धोरणे अवलंबावे हे विचारपूर्वक ठरवले पाहिजे. कारण त्यावाचून पर्याय नाही. जर जगात जीवघेण्या स्पर्धेचे युग चालू राहणार असेल, तर ठीक आहे! त्या स्पर्धेत आपण यशस्वी होऊन दाखवू. जर इथे जंगलचा कायदा अंमल गाजवणार असेल तर त्यात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याइतके आपण सबळ होऊ.. जर जागतिकीकरणाचा रथ जगभर रोंरावत पुढे जाणार असेल तर त्या रथामध्ये स्वार होण्याचे, त्याच्यावर नियंत्रण मिळवण्याचे कौशल्य आपण हस्तगत करू. मग त्यानंतर आणि त्यानंतरच या जंगलचा कायदा मानणाऱ्या जगाविरुद्ध आपण आवाज उठवला तर त्याला अर्थ असेल. कारण तो आवाज एका दुर्बलाचा नसेल.

...आणि आपल्याला हे जमणार आहे. जगाच्या या नव्या व्यवस्थेत सबळ समाज म्हणून स्थान प्राप्त करणे आपल्याला शक्य आहे. इतिहासाने आपल्याला इतक्या वेळा अपयशाचा सामना करण्याला भाग पाडले आहे की असे घडू शकेल याच्यावर कदाचित आपला विश्वास बसणार नाही. हे केवळ स्वत:च्या मनाला दिलासा देण्यासाठी रंगवलेले भविष्यकाळाचे आशादायी चित्र नव्हे. अत्यंत शांतपणे विचार करून आणि परिस्थितीचे विश्लेषण करून हा निष्कर्ष आपण काढू शकतो. इतकेच नव्हे तर या समाजाला सबळ बनविण्यासाठी, या देशाला महासत्ता बनविण्यासाठी कोणता मार्ग अवलंबता येईल, नेमके काय करावे लागेल हे ठरवू शकतो.

एक लक्षात घ्यावे लागेल की आपल्या देशासमोर अनेक पर्याय उपलब्ध नाहीत. परिस्थिती अशी नाही की अनेक क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकू. परिस्थिती अशीही नाही की आता आपण संधी गमावली तर लगेच दुसरी संधी समोर उभी राहील. त्यामुळे चर्चा, विचार यांची आवश्यकता आहे, हे मान्य करूनदेखील असे म्हणावे लागेल की अशा गोष्टींमध्ये फार काळ गमावून चालणार नाही. 'संधी गमावली आणि मग जाग आली' असे होऊ देऊन चालणार नाही. 'काय करावे' हे ठरवण्यासाठी, त्यामुळेच विचारांची योग्य दिशा निश्चित करावी लागेल. बदलणारे पॅराडाईम्स स्वीकारण्यापूर्वी आणि त्यांचा वापर सर्वत्र करण्यापूर्वी काळजी घ्यावी लागेल. यातूनच मार्ग निश्चित

करता येईल. म्हणून काय करावे? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यापूर्वी आपण या पूर्वी ज्या गोष्टी मांडल्या त्या सूत्ररूपाने ओळीने मांडून पाहू. त्यातून मार्ग सापडेल.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की जीवघेण्या स्पर्धेत जिंकण्यासाठी विरोधकांची बलस्थाने माहीत हवीत. तशीच त्यांच्या कमजोरीची स्थाने माहीत करून घ्यायला हवीत. आपल्या कमकुवत बाजू माहीत हव्यात, तशीच आपली बलस्थाने जाणून घेतली पाहिजेत. दुसऱ्यांची नक्कल करून किंवा त्यांच्या बलस्थानांची आंधळी आरती गाऊन स्पर्धेत कधीच यशस्वी होता येत नाही. लक्ष केंद्रित करावे लागते ते आपल्या बलस्थानांवर. त्यांचा विकास करण्यावर. स्पर्धेत यशस्वी होण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' हाच जिथला नियम आहे त्या जंगलच्या राज्यातदेखील अगदी लहान मुंगी-माशीपासून ते अक्राळविक्राळ सिंहापर्यंत प्राण्यांच्या सर्व जमाती आपले अस्तित्व टिकवून असतात. पण त्यातले कोणीही दुसऱ्या कोणाची नक्कल करीत नाहीत. 'बल ज्याचे त्यास ते' हे समजणे हाच जीवघेण्या स्पर्धेत यशस्वी होण्याचा मार्ग आहे आणि जागतिकीकरणातही हाच यशाचा मंत्र आहे.

भारताचे बलस्थान कोणते आहे याची तपासणी त्यामुळे फार महत्त्वाची आहे आणि या प्रश्नाचे उत्तर सहज सापडण्यासारखे आहे. उच्च शिक्षित तरुण हेच भारताचे बलस्थान आहे. आज अगदी अत्यंत पुढारलेल्या जगात आपल्या उच्च शिक्षित तरुणांनी आपले स्थान निर्माण केले आहे. भारताची ओळख जगाला त्यांच्यामुळेच आहे. निरपवादपणे आपले उच्च शिक्षित तरुण अत्यंत तीव्र स्पर्धा असलेल्या अमेरिकेसारख्या देशांमध्ये यशस्वी होत आहेत. याचे कारण हे बलस्थान आपल्या शिक्षणव्यवस्थेत आहे. जागतिकीकरणाच्या युगात भारत आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करून आघाडी घेऊ शकेल, ती केवळ शिक्षणक्षेत्राच्या बळावर.

भारताच्या या बलस्थानाची मुळे त्याच्या संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत. प्राचीन काळातील समाजात असलेल्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणांना असलेले उच्च स्थान त्यांच्या ज्ञानाच्या मक्तेदारीमुळे होते. इतिहासकाळात गौतम बुद्धापासून ते अलीकडील काळात फुले-आंबेडकरांपर्यंत ज्याने ज्याने त्या व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले त्यांतील प्रत्येकाचा भर ज्ञान आणि शिक्षण याच गोष्टींवर होता. आताच्या जमान्यात 'नॉलेज इंडस्ट्री'ला महत्त्व आले आहे आणि काळाच्या ओघात ते वाढत जाणार हे स्पष्ट आहे. अशा वेळी आपल्या या बलस्थानाचा आपल्या समाजाला नक्की फायदा होणार आहे.

संगणकाचे क्षेत्र आणि माहिती-तंत्रज्ञान यांची वाढ 'नॉलेज इंडस्ट्री'ची पहिली पदचिन्हे होती. त्यात आपल्या तरुणांनी मिळवलेले यश आणि आपल्या देशाला मिळालेले आघाडीचे स्थान हा एक सुखद धक्का होता. त्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले नव्हते व इतक्या मोठ्या यशाची अपेक्षा केली नव्हती. पण यापासून धडा

घेऊन आपण यापुढची पावले टाकली पाहिजेत.

जागतिकीकरणाच्या जमान्यात विचारसरणी बदलते आहे. 'पॅराडाईम' बदलत आहेत. त्यात एक विचारधारा ही आहे की सरकारने लोककल्याणकारी योजना आखून स्वत:वरच्या जबाबदाऱ्या वाढवू नयेत. गुणवत्ता वाढवण्यासाठीची स्पर्धा समाजात होऊ द्यावी. त्यातून आपोआप समाजाचा विकास होईल. तसेच शालेय शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे. उच्च शिक्षणावरचा खर्च सरकारने करू नये. असा खर्च म्हणजे सरकारने शिक्षणक्षेत्राला दिलेले अनुदान आहे आणि अनुदान-संस्कृतीमुळे गुणवत्ता वाढीला लागण्याला अडथळा निर्माण होतो. म्हणून सरकारने अनुदान देणे बंद करावे; उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातून सरकारने अंग काढून घ्यावे. त्यावरचा खर्च कमी कमी करीत जावे व हे शिक्षणक्षेत्र स्वयंनिर्भर होईल असे बघावे.

या विचारधारेत, या तार्किक साखळीत अनेक चुका आहेत, त्याही आपण बघितल्या. एक तर उच्च शिक्षण हे समाजकल्याणाचे कार्य म्हणून त्याकडे बघणे चूक आहे. जागतिकीकरणाच्या जमान्यात आपण ज्याच्या आधारावर स्पर्धेत यशस्वी होऊ शकतो असे ते क्षेत्र आहे. त्यामुळे एक स्ट्रॅटेजी म्हणून हे क्षेत्र बळकट करणे व त्यासाठी खर्च करणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यातून समाजकल्याणही साधेल. हा एक आनुषंगिक लाभ आहे. असा आनुषंगिक लाभदेखील आपल्या धोरणांमधून होऊ नये, इतकी समाजकल्याणाविषयी ॲलर्जी निर्माण होण्याचे कारण नाही.

शिवाय उच्च शिक्षणाच्या संधी हाच इथल्या बहुसंख्य गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना आशेचा आधार आहे. शालेय शिक्षणाचा प्रसार वाढवीत नेला की अशी आशा बाळगणाऱ्या कुटुंबांच्या संख्येत वाढ होत जाणार. अशा वेळी उच्च शिक्षणावरचा खर्च कमी करीत जाण्याने तिथल्या संधी कमी होतील व सामाजिक शांततेला तडा जाईल. तणाव निर्माण होतील. असे तणाव निर्माण करण्याचे टाळणे ही कोणत्याही सरकारची जबाबदारी असते.

'उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित ठेवून त्यावरचा खर्च कमी करावा व लहानपणीच हुशार विद्यार्थी निवडून त्यांनाच चांगले शिक्षण द्यावे' असे म्हणणे हे सामाजिकदृष्ट्या अशास्त्रीय आहे. उष्मागतिशास्त्राच्या दुसऱ्या नियमाच्याही ते विरोधात आहे. इनपुट कमी करून कार्यक्षमता वाढत नाही. नेमके हुशार विद्यार्थी निवडता येतील ही कल्पना व्यवहार्य नाही. अशा प्रकारच्या यंत्रणेतून सामाजिक हितसंबंध जोपासण्याला व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या भ्रष्टाचार करण्याला प्रोत्साहन मिळेल.

या सर्व मुद्द्यांचा निष्कर्ष हाच आहे की शिक्षणावरचा—अगदी उच्च शिक्षणावरचा— खर्च सरकारने वाढवत नेला पाहिजे. तो कमी कमी करण्याचे धोरण

आर्थिकदृष्ट्या देशाचे नुकसान करणारे, सामाजिकदृष्ट्या समाजात तणाव निर्माण करणारे व शास्त्रीयदृष्ट्या चुकीच्या पायावर आधारलेले आहे.

आपण याचादेखील विचार केला की उच्च शिक्षणाचे क्षेत्र स्वयंपूर्ण असावे, असे मान्य केले तरी त्याचा नेमका अर्थ काय? विद्यार्थ्यांकडून अथवा त्यांच्या पालकांकडून शिक्षणाची सारी किंमत वसूल करावी व तितक्या प्रमाणात अभ्यासक्रमांचे शुल्क वाढवावे असे म्हणणे चूक आहे. कारण शिक्षणसंस्थांमधून शिकून बाहेर पडणारे विद्यार्थी म्हणजे शिक्षणसंस्थेचे उत्पादन आहे. त्यांना खरेदी करणारी बाजारपेठ म्हणजे समाज. समाजातील आर्थिक व्यवहाराची सारी क्षेत्रे. या आर्थिक व्यवहाराचा लाभ घेऊन जे श्रीमंत झाले आहेत ते खरे म्हणजे शिक्षणक्षेत्राचे लाभार्थी आहेत. काही प्रत्यक्षरीत्या काही अप्रत्यक्षरीत्या.

शिक्षणाचे क्षेत्र स्वयंनिर्भर करायचे तर या लाभार्थींकडून त्याची किंमत वसूल करायली हवी. हे काम शिक्षणसंस्थांना करणे शक्य नाही. त्यांच्याकडे ती यंत्रणा नाही. त्यासाठीचा अधिकार नाही. यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा व अधिकार सरकारकडे आहेत. म्हणून सरकारने ही किंमत समाजाकडून वसूल करून ती शिक्षणावर खर्च करावी.

बौद्धिक संपदेचा अधिकार हे जागतिकीकरणाचे महत्त्वाचे सूत्र आहे. समाजात निर्माण होणारी व अर्थव्यवस्थेचा गाडा चालवणारी सारी बौद्धिक संपदा शिक्षणक्षेत्रातून निर्माण होते. त्याचा मोबदला घेण्याचा शिक्षणक्षेत्राला नक्कीच अधिकार आहे. सरकारचे काम एजंटसारखे आहे. त्याने हा शिक्षणक्षेत्राचा अधिकार असलेला मोबदला समाजाकडून वसूल करून शिक्षणक्षेत्राला दिला पाहिजे.

आपण मांडलेल्या विचारसरणीचा हा सूत्ररूपाने आढावा घेतल्यावर आता आपण काय करावे या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतो. या उत्तराची १० कलमे आहेत. आपण त्याला शिक्षणक्षेत्राच्या हक्काची सनद असे म्हणू शकतो. 'प्रत्येक मुलाला शालेय शिक्षण घेण्याचा हक्क आहे, एवढेच नव्हे तर त्याची इच्छा असेल तर उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे' असे जरी म्हटले व अगदी संसदेत तसा कायदाही जरी मंजूर केला, तरी जोवर शिक्षणक्षेत्राच्या हक्काची प्रतिष्ठापना होत नाही, तोवर हे मुलांचे शिक्षणाचे सारे हक्क फक्त कागदावर राहतील. त्यांना व्यवहारात किंमत राहणार नाही, म्हणून शिक्षणक्षेत्राचे हक्कदेखील तितकेच महत्त्वाचे आहेत. शिक्षणक्षेत्राच्या हक्कांची सनद पुढीलप्रमाणे आहे.

**शिक्षणक्षेत्राच्या हक्काची सनद :**

१. शिक्षणक्षेत्र आपल्या देशातील सर्वांत यशस्वी क्षेत्र आहे. आर्थिक उन्नतीच्या क्षेत्रात आपल्या देशाने जिथे जिथे लक्षणीय यश मिळवले आहे त्या सर्व ठिकाणी

शिक्षणक्षेत्राचे योगदान सर्वांत मोलाचे आहे. हे श्रेय समाजाने मोकळ्या मनाने शिक्षण क्षेत्राला द्यावे हा या क्षेत्राचा हक्क आहे. हे श्रेय शालेय शिक्षण व उच्च शिक्षण या शिक्षणक्षेत्राच्या दोन्ही अंगांना आहे. किंबहुना शिक्षणक्षेत्राची ही दोन्ही अंगे इतकी एकजीव आणि अभिन्न आहेत की त्यांचा विचार एकत्रितपणेच केला पाहिजे.

२. शिक्षणक्षेत्र हेच फक्त भारताला जागतिकीकरणाच्या युगात बलशाली बनवू शकते. भारताचे आशेचे स्थान म्हणून या क्षेत्राचे असलेले महत्त्व समाजाने व सरकारने ओळखले पाहिजे व 'सर्वांत लाभदायी क्षेत्र' म्हणून हे क्षेत्र घोषित केले पाहिजे.

३. शालेय शिक्षणावरची गुंतवणूक वाढवीत जाणे अत्यंत आवश्यक आहे. शालेय शिक्षण हा प्रत्येक मुलामुलीचा हक्क आहे आणि ज्या प्रमाणात शालेय शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींची संख्या वाढेल त्या प्रमाणात उच्च शिक्षणाच्या संधी त्यांना उपलब्ध होणे हादेखील त्यांचा हक्क आहे. शालेय शिक्षणावरचा खर्च जसा वाढत जाईल त्याप्रमाणात उच्च शिक्षणावरचा खर्च वाढत गेला पाहिजे.

४. 'आपला मुलगा-मुलगी खूप शिकेल आणि चांगले दिवस येतील व आपला भविष्यकाळ चांगला असेल' असे स्वप्न पाहण्याचा इथल्या प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबाला हक्क आहे. कोणत्याही विचारसरणीच्या प्रभावाखाली आणि कोणत्याही परकीय संस्थांच्या दबावाखाली हे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे स्वप्न चुरगळून टाकण्याचा अधिकार इथल्या कोणत्याही सरकारला नाही.

५. शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण ही शिक्षणक्षेत्राचीच दोन अंगे असली तरी त्यांच्या गरजा व त्यांची समाजात येणारी उत्पादने (शालेय शिक्षण घेतलेले विद्यार्थी व उच्च शिक्षण घेतलेले पदवीधर) यांच्यातील फरक लक्षात घेता शालेय शिक्षणाची जबाबदारी राज्यसरकारांची असेल व देशभरच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी केंद्रसरकारची असेल असे धोरण निश्चित होणे आवश्यक आहे.

६. शिक्षणक्षेत्रातून दरवर्षी किती बौद्धिक संपदा निर्माण होते व समाजाच्या आर्थिक उलाढालीतील तिचा हिस्सा किती असतो याचे शास्त्रशुद्ध मोजमाप होणे आवश्यक आहे. त्यासाठी एक तज्ज्ञांची समिती नेमणे आवश्यक आहे. बौद्धिक संपदेचा योग्य मोबदला शिक्षणक्षेत्राला समाजाकडून मिळावा हा शिक्षणक्षेत्राचा हक्क आहे. समाजाकडून हा मोबदला योग्य प्रकारे गोळा करून शिक्षणक्षेत्राच्या स्वाधीन करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

७. जोपर्यंत शिक्षणक्षेत्राने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे नेमके मापन होत नाही, तोपर्यंत राष्ट्रीय ठोक उत्पन्नाच्या निदान ८ ते १० टक्के रक्कम शिक्षणक्षेत्रावर खर्च झाली पाहिजे. (सध्या ती ३ टक्कांच्या जवळपास आहे.). कारण अनेक यशस्वी विकसनशील देशांमध्ये हे सूत्र अवलंबिले आहे. शिक्षणक्षेत्रासाठी ही रक्कम गोळा

करण्याचे काम ही सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी निव्वळ शिक्षणावर खर्च करण्यासाठी म्हणून सरकारने खास कर लावावा—जो फक्त शिक्षणक्षेत्रावरच खर्च व्हावा.

८. शिक्षणक्षेत्रासाठी गोळा केलेला पैसा कशा प्रकारे खर्च व्हावा हे ठरवण्याचा अधिकार शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींनाच असला पाहिजे. कारण हा पैसा म्हणजे सरकारने शिक्षणक्षेत्राला दिलेले अनुदान नव्हे. शिक्षणक्षेत्रावर खर्च कसा व्हावा, शालेय शिक्षणाला व उच्च शिक्षणाला त्यातला किती हिस्सा द्यावा व गुणवत्ता वाढवण्यासाठी या पैशांचा विनियोग कसा व्हावा हे ठरवण्यासाठी केंद्राच्या पातळीवर व राज्यांच्या पातळीवर शिक्षणतज्ज्ञांच्या व या क्षेत्रातल्या अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्तींच्या समित्या नेमण्यात याव्यात. त्या राजकीय प्रभावापासून आणि अनावश्यक सरकारी नियंत्रणांपासून मुक्त असाव्यात.

९. शिक्षणक्षेत्र स्वयंनिर्भर असावे या कारणासाठी गुणवान विद्यार्थ्यांच्या डोक्यावर आयुष्याच्या सुरुवातीलाच कर्जाचा बोजा लादणे किंवा त्यांच्या पालकांची आयुष्यभराची पुंजी लुबाडून घेणे हे केव्हाही न्याय्य नव्हे. अशी धोरणे ताबडतोब बदलली पाहिजेत.

१०. शिक्षणावर केलेला खर्च ही कोणत्याही समाजाने उद्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. किंबहुना समाजाच्या पातळीवर एवढी एकच खरी गुंतवणूक आहे, हे सनातन सत्य कधीही विसरले जाता कामा नये.

शिक्षणक्षेत्राच्या हक्काची ही सनद साऱ्या समाजासाठी आहे. ती कोणत्याही एका वर्गासाठी आणि जातीसाठी नाही. कारण शिक्षणक्षेत्राचा संबंध साऱ्या समाजाशी आहे. इथल्या प्रत्येक सुशिक्षित माणसाशी आहे. आपल्या मुलांना उत्तम शिक्षण देण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या सर्व पालकांशी आहे. मुलांना शिकवल्यामुळे आपले दिवस पालटतील; चांगले दिवस येतील असे मानणाऱ्या साऱ्या गरीब पालकांशी आहे. शिक्षणक्षेत्राच्या हक्काची सनद म्हणजे काही शिक्षकांच्या आणि प्राध्यापकांच्या हक्काची सनद नव्हे. ती अशा असंख्य पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या आणि साऱ्या समाजाच्या हक्काची सनद आहे. तिच्यातील सूत्रे मान्य व्हावीत ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

'शिक्षणावर खर्च करण्यासाठी सरकारकडे पैसा नाही' असे जेव्हा राज्यकर्ते म्हणतात तेव्हा ते अर्ध सत्य सांगत असतात. कारण पैसा सरकारकडे असावा लागत नाही. तो समाजात असतो. सरकारकडे असावी लागते राजकीय इच्छाशक्ती. पैसा गोळा करण्याची आणि अमुक एका कारणासाठी खर्च करण्याची तयारी. ही इच्छाशक्ती सरकारला येते ती समाजाच्या इच्छाशक्तीतून; लोकांच्या चळवळीतून. लोकशाहीत

सरकारची धोरणे आणि त्याची राजकीय इच्छाशक्ती ही लोकांच्या इच्छाशक्तीवर ठरते. शिक्षणक्षेत्राच्या हक्कासाठी असे समाजाच्या इच्छाशक्तीचे विराट दर्शन राजकारण्यांना व्हायला हवे. त्यासाठी चळवळी उभ्या राहायला हव्यात.

हे राजकारणच आहे, पण ते राजकीय पक्षांच्या पलीकडचे आहे. समर्थ रामदासस्वामींनी म्हटले आहे, 'पहिले ते हरिकथा निरूपण, दुसरे ते राजकारण.' अध्यात्माच्या खालोखाल त्यांनी राजकारणाला महत्त्व दिले आहे. त्या अर्थाने हे राजकारण आहे.

आणि लोकशाहीत कोणत्याही राजकारणाचा संबंध हा अखेर निवडणुकांशी असतो. राजकीय पक्ष कोणताही असो पण शिक्षणक्षेत्राच्या हक्काची ही सनद ज्याला मान्य असेल, त्याच्याविषयी ज्याला प्रामाणिक कळकळ असेल त्यालाच लोकांची मते मिळतील असे वातावरण निर्माण होणे जरुरीचे आहे. ते निर्माण करणे ही विद्यार्थ्यांची, त्यांच्या पालकांची, शिक्षणक्षेत्रातल्या साऱ्या घटकांची जबाबदारी आहे. असे घडले तरच आज शिक्षणक्षेत्राबद्दल अवलंबिण्यात येणारी घातक धोरणे बदलली जाऊ शकतील. सत्ताधाऱ्यांपासून ते न्यायालयांपर्यंत सर्वांवर अधिराज्य गाजवू पाहणारी नवी चुकीची विचारसरणी बदलली जाऊ शकेल. त्यातूनच समाजाची, या देशाची, इथल्या गरीब आणि मध्यमवर्गातल्या कुटुंबांची आशा जिवंत राहू शकेल.

आणि असे घडले नाही तर... तर एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला आलेली एक सुवर्णसंधी या देशाने कशी गमावली याचे विश्लेषण भविष्यकाळातले इतिहाससंशोधक करीत राहतील!

ꣲ

# उपसंहार

मानवी संस्कृतीची गेल्या हजारो वर्षांत झालेली प्रगती दूर फेकून देऊन परत एकदा जंगलच्या कायद्याचे उघडेवागडे राज्य स्थापन कारणारी जागतिकीकरणाची आणि बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेची लाट साऱ्या जगाला व्यापून टाकीत आहे. या लाटेचा आणि शिक्षणक्षेत्राचा परस्परसंबंध तपासण्याचा प्रवास आपण सुरू केला, तेव्हा जंगलातल्या ससा आणि सिंह यांच्या गोष्टीपासून सुरुवात केली. आता उपसंहारही जंगलातल्या एका गोष्टीने करणे योग्य होईल.

ती गोष्ट लहानपणी ऐकली होती. ती अनेक पिढ्या चालत आली आहे. ही गोष्ट नवी आहे. अलीकडेच ऐकलेली आहे.

नव्या सिमेंट-काँक्रीटच्या जंगलात, संगणकांच्या साम्राज्यात, मोबाईल फोनच्या आणि सुसाट धावणाऱ्या मोटार गाड्यांच्या किंवा अशाच असंख्य वैज्ञानिक-यांत्रिक करामतींच्या कलकलाटात प्रस्थापित होत असलेल्या आधुनिक जंगलच्या कायद्याचे मर्म सांगणारी ही कथा आहे.

आफ्रिकेच्या जंगलातल्या कोण्या एका कोपऱ्यात सकाळचा सूर्य उगवतो आणि नवा दिवस सुरू होतो.

तेव्हा हरणांचा एक कळप जागा होतो.

त्यातल्या प्रत्येक हरणाला माहीत असतं की त्याला सक्षम राहायला पाहिजे. जोरात पळण्याची क्षमता प्राप्त केली पाहिजे.

कारण थोड्या वेळाने वाघ-सिंह या कळपावर हल्ला करतील.

तेव्हा वेगाने धावणारी हरणे वाचतील. सर्वात कमी वेगाने धावणारे हरीण मागे राहील व सिंहाच्या भक्ष्यस्थानी पडेल

त्याच जंगलातल्या त्याच कोपऱ्यात सूर्य उगवतो आणि तोच दिवस सुरू होतो.

तेव्हा सिंहांचा एक कळप जागा होतो.

त्यातल्या प्रत्येक सिंहाला माहीत असतं की त्याला सक्षम राहायला पाहिजे. वेगाने पळता आले पाहिजे.

कारण थोड्या वेळाने हा सिंहांचा कळप हरणांच्या कळपावर हल्ला करेल, तेव्हा हरणे सुसाट पळत सुटतील.

ज्या सिंहाला वेगाने पळता येईल तो त्यातल्या कमी वेगाने पळणाऱ्या हरणाला पकडेल. त्याला शिकार मिळेल.

कमी वेगाने पळणाऱ्या सिंहाला शिकार मिळणार नाही. त्याची भुकेने उपासमार होईल.

तुम्ही हरीण असा किंवा सिंह असा, भक्ष्य असा किंवा भक्षक असा, तुम्हाला जिवंत राहायचे असेल तर सर्वाधिक वेगाने पळता आले पाहिजे.

मी ऐकलेली आधुनिक जंगल कथा इथे संपली. मुंबईतील एका प्रतिष्ठित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी एका शैक्षणिक परिसंवादात ती सांगितली. नव्या युगाचा कोणता अर्थ आपल्याला जाणवतो आहे व तो नव्या पिढीपर्यंत आपण कसा पोचवतो आहोत याचे नेमके प्रतिबिंब या कथेत उमटले आहे.

खरे म्हणजे या कथेला आणखी एक भाग जोडावा असे मला वाटते.

त्याच आफ्रिकेच्या जंगलात त्याच कोपऱ्यात सूर्य उगवतो आणि तोच दिवस सुरू होतो.

तेव्हा एक हत्तींचा कळपही जागा होतो.

त्यातल्या प्रत्येक हत्तीला हे माहीत असतं की त्याला जगण्यासाठी कोणत्याही हरणांच्या कळपावर हल्ला करायचा नाही. सुसाट धावणाऱ्या हरणांचा पाठलाग करण्याची त्याला जरुरी नाही. आजूबाजूच्या वनस्पतींच्या समृद्ध साम्राज्यातून त्याला पुरेसे अन्न मिळणार आहे.

त्याला हेदेखील माहीत असतं की जर सिंहांच्या कळपातल्या एखाद्या छाव्याने एखाद्या हत्तीवर हल्ला करण्याचा विचार केला, तर त्याची आई त्याला म्हणेल, 'बाळा रे! असा अविचार करू नकोस. कारण

*यस्मिनकाले तदुत्पन्ने, गजः तत्र न हन्यते!*

(ज्या कुळात तू जन्म घेतलास त्यात हत्तीवर हल्ला करीत नाहीत)

त्यातल्या प्रत्येक हत्तीला माहीत असतं की कोणत्याही सिंहाइतकी किंवा हरणाइतकी जोरात पळण्याची क्षमता आपल्यात आहे.

पण कोणाचा जीव घेण्यासाठी किंवा स्वतःचा जीव वाचविण्यासाठी आपल्याला असे पळण्याची जरुरी नाही.

जंगलात सिंह असतात, हरणे असतात तसे हत्तीही असतात.

जंगलचा कायदा प्रस्थापित करणाऱ्या या जमान्यात आपण आदर्श सिंहाचा ठेवणार की हरणांचा ठेवणार की हत्तींचा ठेवणार हे आपले आपणच ठरवायचे आहे.

124289
31-3-08
८०

...जागतिक पातळीवर 'ज्ञाना'च्या निर्मितीचा जो यज्ञ चालू आहे त्यात वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय ज्ञानाची भर घालणे आणि त्याला सुजाणपणाची जोड देऊन मानवतेच्या भल्यासाठी या ज्ञानाचा उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न करणे हेच आजच्या जागृत भारत देशासमोरचे नियत कार्य आहे असे मी मानतो.

उघड आहे की यात शिक्षणक्षेत्राचे कार्य फार मोलाचे आहे. आपला समाज नुसता 'डाटा' गोळा करणारा समाज राहणार की, त्याचे 'माहिती' आणि 'ज्ञान' यात रूपांतर करणारा समाज होणार व त्यापुढे जाऊन सुजाणपणाचे नेतृत्व जगाला देणारा आपला देश होणार की नाही, हे शिक्षणविषयक आपण कोणती धोरणे अवलंबितो यावर ठरणार आहे.

डॉ. सुधीर पानसे यांचे प्रस्तुत पुस्तक म्हणूनच फार महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. यातील अनेक मुद्दे फार लक्षणीय आणि विचार करण्यासारखे आहेत.

विचारांच्या क्षेत्रात अंतिम शब्द कधीच लिहिला जाऊ शकत नाही. त्यात मत-मतांतरे नेहमीच संभवतात. चर्चेला नवे मुद्दे पुढे येऊ शकतात. प्रस्तुत पुस्तकाच्या बाबतीतही हे खरे आहे. असे घडणे हे योग्यच आहे आणि आवश्यकदेखील आहे. पण शिक्षणक्षेत्रासारख्या महत्त्वाच्या विषयात असे चर्चेचे अनेक नवे मुद्दे या पुस्तकातून पुढे आले आहेत हे महत्त्वाचे आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणविषयक धोरण ठरवणारी मंडळी नक्कीच त्यांची दखल घेतील असे मला वाटते.

पण डॉ. सुधीर पानसे यांचे एका गोष्टीसाठी खास अभिनंदन केले पाहिजे. त्यांचे पुस्तक हे फक्त शिक्षणतज्ज्ञांसाठी आणि शिक्षणविषयक धोरणे ठरवणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांसाठी नाही. त्यांनी या चर्चेच्या परिघात विद्यार्थ्यांना, पालकांना आणि शिक्षणक्षेत्राविषयी कळकळ असणाऱ्या अन्य सामान्य नागरिकांनाही आणले आहे. कारण हे पुस्तक त्या साऱ्यांसाठीदेखील आहे. शिक्षणक्षेत्राच्या धोरणांसंबंधी चर्चा अशा विस्तारित परिघात नेणे हे निकोप वाढीच्या दृष्टीने यं[illegible]

महाराष्ट्रातील विद्यार्थी, पालक आणि अन्य सर्व [illegible]
[illegible] भाषांतरे होऊन भारतातील अ[illegible]

घेतील, तसेच [illegible]
पुस्तक जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

— रघुनाथ माशेलकर

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 1952 J
00124289

ISBN 81-88284-30-0

मूल्य : ६० रुपये